# सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसुर्ले गावातील लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास

# SATTARI TALUKYATIL ADVOI ANI PISURLE GAVATIL LOKGITANCHA VIVECHANATMAK ABHYAS

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**

अभ्यासक

**स्नेहल सुरेश परवार**

हजेरी क्र. 22P0190020

ABC ID 418251594069

पी. आर न  201900839

मार्गदर्शक

विनय मडगांवकर

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा

गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# SATTARI TALUKYATIL ADVOI ANI PISURLE GAVATIL LOKGITANCHA VIVECHANATMAK ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature
**Goa University**

by


**Snehal Suresh Parwar**

Seat No: 22P0190020
ABC ID: 418251594069
PRA: 201900839

Under the supervision of
**Dr. Vinay Madgaonkar**
(Assistant Professor)
**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**
**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, **'सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले गावातील लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास'** is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of **Dr. Vinay Madgaonkar** and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Parwar

Snehal Suresh Parwar

Seat no: 22P0190020

Date: 16/04/2024

Place: Goa University

**COMPLETION CERTIFICATE**

This is to certify that the dissertation report **'सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले गावातील लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास'** is a bonafide work carried out by Ms Snehal Suresh Parwar under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

Vinay

Dr. Vinay Madgaonkar

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the School

School Stamp

Date: 23/4/2024

Place: Goa University

# मनोगत

एम. ए मराठी भाग एकच्या वर्गात असताना सत्र ४ च्या अंतर्गत असलेल्या प्रबंधिकेच्या संबंधी सांगण्यात आले होते. त्याचवेळी मी लोकसाहित्य या विषया संदर्भात विचार केला. भाग एकच्या वर्गात असताना आम्हाला लोकसाहित्य हा विषय अभ्यासकरण्याकरिता होता. तो विषय आम्हाला प्रा. जयेश गावकर शिकवत होते. त्यामुळे या विषयी संदर्भात मनात आवड निर्माण झाली. पूर्वीच्या अनेक प्रथा, परंपरा, लोकगीते, लोक कथा समजल्या आणि वर्गात मी शिकत असताना माझ्या मनात पूर्वीची प्रथा, परंपरा जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. तेव्हाच मी निर्णय केला की लोकसाहित्यातील लोकगीतांचा अभ्यास करायचा.

त्याचप्रमाणे मी सत्तरी तुलुक्यातील अडवई गावातील रहिवासी असल्यामुळे माझ्या गावातील प्रथा, परंपरा, लोकगीते टिकविण्याचा आणि इतर गावाला आपल्या गावा बद्दल परिचय व्हावा हा हेतू मनात बाळगून मी ‘ सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले गावातील लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास ‘ असा विषय निवडण्याचे ठरविले. अजून अडवई आणि पिसूर्ले सारख्या गावात लोकगीतांवर आजवर संकलन किंवा संशोधन झाले नव्हते. आपल्या गावातील परंपरा, लोकगीते टिकविण्याचे भाग्य मला या विषयामुळे लाभले .

प्रस्तुत विचाराचा प्रस्ताव मी डॉ. विनय मडगांवकर यांच्याकडे मांडला. त्यांना हा प्रस्ताव आवडला आणि त्यांनी या विषयाला मान्यता दिली. त्यानंतर मी व्याप्ती आणि मर्यादा पाहून केवळ अडवई आणि पिसूर्ले गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास करण्याचे ठरविले. जेणे करून आपल्या गावातील प्रथा, परंपरा, सण, उत्सव, लोकांचे आचार विचार स्पष्ट झाले. त्याचप्रमाणे लोकगीतातील लग्न गीते, फुगडी गीते, अंगाई गीते या सर्व लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास करण्याचे ठरविले. सर्व प्रथम मी गोवा विद्यापीठातील ग्रंथालयात लोकसाहित्य विषयक पुस्तक घेऊन वाचण्यास सुरवात केली. मुळात लोकसाहित्य म्हणजे काय, संकल्पना, व्याप्ती, लक्षणे, भाषा हे सगळे विषय समजून घेतले. त्यानंतर एकूण प्रकरणाची मांडणी केली एकूण ६ प्रकरणे केली.

माझ्या प्रबंधिके संबंधी मी सर्व प्रथम मार्गदर्शक डॉ. विनय मडगांवकर यांची आभारी आहे. त्यांनी माझ्या विषयाला न्याय देऊन मला प्रोत्साहित केले. गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागातील सर्व शिक्षकांचेही वेळोवेळी मला मदत केल्याबद्दल आभारी आहे. माझ्या संशोधन कार्यात मला मदत केल्याबद्दल कुटुंबियांचेही आभारी आहे. अडवई आणि पिसूर्ले गावा बद्दल माहिती दिल्या बद्दल मी माझ्या वडिलांचे सुरेश अडवईकर यांचेही आभारी आहे. त्याचप्रमाणे माझी आई सुचिता सुरेश अडवईकर यांनी मला पूर्वीची लग्न पद्धत कशी होती याची सर्व माहिती दिल्या बद्दल आभारी आहे. त्याचप्रमाणे गावातील वृद्ध महिला लक्ष्मी सीताराम अडवईकर यांचे मनापासून आभार. यांच्यामुळे माझा प्रबंध पूर्ण झाला. विषयात असलेल्या सगळया गीताची माहिती किंवा गीते म्हणून दाखवण्या बद्दल खूप आभारी आहे. माझे कुलदैवत देवी शांतादुर्गा आणि व्यग्रेश्वर यांच्या आशीर्वादाने माझा प्रबंध पूर्ण झाला आहे.

**सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले गावातील लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास**

# अनुक्रमणिका


| अनु.क्र | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion certificate | | |
| मनोगत | | |
| प्रस्तावना | | 1-2 |
| १ | लोकसाहित्याची व्याख्या, संकल्पना, व्याप्ती आणि स्वरूप | 3-20 |
| २ | अडवई आणि पिसूर्ले गाव सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास | 21-47 |
| ३ | अडवई आणि पिसूर्ले गावातील लग्न गीतांचा अभ्यास | 48-60 |
| ४ | अडवई आणि पिसूर्ले गावातील फुगडी गीतांचा अभ्यास | 61-70 |
| ५ | अडवई आणि पिसूर्ले गावातील अंगाई गीतांचा अभ्यास | 71-77 |
| ६ | लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास | 78-83 |
| ७ | समारोप, निष्कर्ष | 83-109 |
| परिशिष्ट | | 110-113 |
| संदर्भ | | ११४ |

# प्रस्तावना

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात ‘folklore’ या ज्ञानशाखेचा  अभ्यास जागतिक पातळीवर सुरु झाला . दैवतकथाशास्त्र, पुरातत्वशास्त्र, समाजशास्त्र , मानसशास्त्र, भाषाशास्त्र, इतिहास  अशा विविध मानव्यवंशशाखीय अभ्यासकांनी आपल्या गरजेनुसार व उपयुक्ततेनुसार ‘Folklore’ मधील विविध घटक पडताळून पाहिले. ज्या सामग्रीला ‘popular Antiquities’ असे संबोधले जात असे. त्या सामग्रीला विल्यम थॉम्सने ‘Folklore’ अशी संज्ञा दिली. कालांतराने या ज्ञानशाखेची व्यापकता अभ्यासकांच्या नजरेत आली आणि या ज्ञानशाखेला आपले असे एक स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले.

समाज अस्तित्वात येऊन त्यांचे सामूहिक जीवन सुरु झाले. तेव्हापासूनच लोकगीतांची परंपरा अव्याहतपणे सुरु झाली पाहिजे. जेव्हापासून लिखित वाङ्मय आहे तेव्हापासूनच्या सगळ्याच वाङ्मयात लोकगीतांचे  उल्लेख सापडतात. त्यावरून त्याकाळी लोकगीते समाजात प्रचलित होते असे दिसते. लोकगीतांतर्गत फुगडी गीते, धालो गीते, लग्न गीते, अंगाई गीते असे प्रकार आढळतात. सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले या गावातील लोकसाहित्यातर्गत लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न इथवर करणार  आहे.

### संशोधन विषयक समस्या

लोकगीतांचा अभ्यास करत असताना सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले या गावात लोकगीतावर आजवर संकलन , संशोधन  झालेले  दिसून येत नाही.

लोकसाहित्य लुप्त होताना दिसून येते, त्याच्या संवर्धनाची आणि संशोधनाची आवश्यकता आहे.

### संशोधनकार्याची उपयुक्तता / आवश्यकता

लोकगीते  हि समूहसहसबंधाचे चित्रण या गीताद्वारे होत असल्याने सर्वात्मकतेत ऐकतेचे तत्व मानणाऱ्या भारतासारख्या देशात अशा अभ्यासाला महत्व आहे. लोकांचे समूह जीवन त्यांचे आचार - विचार , श्रद्धा, समजुती देवाविषयी असलेली श्रद्धा, भीती व गीताच्या माध्यमातून पूर्वीची परंपरा, विधी या सर्वांचा पडताळ घेणे  हि या काळाची गरज आहे. हि लोक समजुती, रूढी, परंपरा  टिकवण्यासाठी त्याचा अभ्यास करणे उपयुक्त ठरतो.

### संशोधनकार्यमागची उद्दिष्टे

१) अडवई आणि पिसूर्ले गावातील लोकगीत आणि भौतिक संस्कृती यातील सहसंबंध पडताळणे.

२) लोकगीतांचे वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेणे .

३) लोकगीतांचा सामाजिक अंगाने अभ्यास करणे.

४) लोकगीतातून आविष्कृत झालेला लोकजीवनाचा अभ्यास करणे.

५) अडवई आणि पिसूर्ले गावातील लोकगीतांची वर्गवारी करणे.

**गृहीतकाची मांडणी**

१) लोकगीतात वाङ्मयीन मूल्ये दडलेले आहे.

२) लोकसाहीत्यामध्ये धार्मिक, कुटुंबिक, समाजिक  विषयाचे विवेचन दिसून  येते.

३) लोकगीतातून लोकजीवनाचे दर्शन घडते.

४) लोकगीते लोकसंस्कृतीचे समालोचन करतात .

५) लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या व प्रचलित असलेल्या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्यात होतो.

**व्याप्ती आणि मर्यादा**

गोमंतकात विपुल प्रमाणात लोकगीते आहेत. मी केवळ सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले या गावातील लोकसाहित्यातर्गत लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न इथवर करणार आहे.

**संशोधन पद्धती**

लोकसाहित्याचा अभ्यास हा समाजिक अंगाने पुढे जाणारा असल्या कारणाने आम्हाला त्यांची मौखिक परंपरा आणि संस्कृती  जाणून घेण्यासाठी  क्षेत्रीय अभ्यास पद्धती व वर्णनात्मक अभ्यास पद्धती महत्वाची ठरते. तर अशा पद्धतींचा प्रबंधिका लेखनासाठी वापर करणार आहे.

१) क्षेत्रीय अभ्यास पद्धती

२) वर्णनात्मक अभ्यास पद्धती

**१) क्षेत्रीय अभ्यास पद्धती**

सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले या गावातील लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास करण्यासाठी क्षेत्रीय अभ्यास पद्धती अभिप्रेत ठरते . यामध्ये प्रत्यक्ष भेटी , मुलाखत , छायाचित्रे जाऊन घेतली जातात किंवा आवश्यक असते. यामुळे क्षेत्रीय अभ्यास पद्धती प्रबंधिकेसाठी महत्वाची ठरते.

**२) वर्णनात्मक अभ्यास पद्धती**

लोकसमाजातून मिळालेल्या साहित्याच्या निकषावर आधारलेले वर्गवारी करून त्याचे समालोचन , विवेचन करून वर्णनात्मक स्वरूप लाभले आहे. मिळालेले निष्कर्ष हे वर्णनात्मक पद्धतीमुळे स्पष्ट होते म्हणून वर्णनात्मक अभ्यास पद्धती महत्वाची ठरते.

**प्रकरणाची मांडणी**

| | |
|---|---|
| **प्रकरण -१** | **लोकसाहित्याची व्याख्या, संकल्पना, व्याप्ती आणि स्वरूप** |
| **प्रकरण – २** | **अडवई आणि पिसूर्ले गावा: सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास** |
| **प्रकरण – ३** | **अडवई आणि पिसूर्ले गावातील लग्न गीतांचा अभ्यास** |
| **प्रकरण – ४** | **अडवई आणि पिसूर्ले गावातील फुगडी गीतांचा अभ्यास** |
| **प्रकरण -५** | **अडवई आणि पिसूर्ले गावातील अंगाई गीतांचा अभ्यास** |
| **प्रकरण – ६** | **लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास** |
| **प्रकरण – ७** | **समारोप, निष्कर्ष** |

**समारोप**

'सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले गावातील लोकगीतांचा विवेचनात्मक अभ्यास 'असा विषय निवडला आहे. तर मी अडवई आणि पिसूर्ले गावापर्यंत मर्यादित राहून अभ्यास करण्याचा प्रयत्न इथवर करणार आहे. त्याचप्रमाणे  अडवई आणि पिसूर्ले गावाचा सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास करण्याचा प्रयत्न इथवर करणार आणि लग्न गीते, फुगडी गीते, अंगाई गीते आणि लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार आहे.

# प्रकरण – १

## लोकसाहित्याची व्याख्या, संकल्पना, व्याप्ती आणि स्वरूप


**प्रास्ताविक** ........................................ 6

**१.१ लोकसाहित्याची संकल्पना** ........................................ 6

**१.२ लोकसाहित्याचे प्रकार** ........................................ 7

**१.३ लोकसाहित्याची लक्षणे** ........................................ 7

**१.४ लोकसाहित्याची भाषा** ........................................ 7

**१.५ लोकसाहित्याची व्याख्या** ........................................ 8

**१.६ लोकसाहित्याची व्याप्ती** ........................................ 9

१.६.१ मौखिक आविष्कार ........................................ 9

१.६.२ भौतिक संस्कृती ........................................ 9

१.६.३ लोकरूढी, विधी, समजुती ........................................ 9

१.६.४ प्रयोगसिद्ध लोककला ........................................ 9

**१.७ समारोप** ........................................ 10

**१.८ निष्कर्ष** ........................................ 10

# प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात लोकसाहित्याची व्याख्या , संकल्पना , स्वरूप आणि व्याप्ती यांचा आढावा घेतलेला आहे. लोकसाहित्य म्हणजे एका पिढीपासून संचित ज्ञान दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित होते त्याला लोकसाहित्य म्हणतात.'लोकसाहित्य ' हा शब्द इंग्रजीतील folklore या शब्दाचा मराठी पर्यायी म्हणून वापरला जातो . folk आणि lore हे दोन्ही शब्द मिळून लोकसाहित्य हा शब्द बनला आहे . लोकसाहित्याची संकल्पना व्यापक आहे . लोकसाहित्याची भाषा ही बदलत असते . लोकसाहित्य हे लिखित स्वरूपात असत नाही तर ते मौखिक स्वरूपात असते .

### १.१ लोकसाहित्याची संकल्पना

'लोकसाहित्य ' हा शब्द इंग्रजीतील 'Folklore ' या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय म्हणून वापरला जातो. 'Folk' या शब्दासाठी 'लोक' आणि 'Lore' या शब्दासाठी 'साहित्य' या दोन शब्दाच्या संयोगाने 'लोकसाहित्य' हा शब्द वापरला जातो. लोकसाहित्याची संकल्पना ही व्यापक आहे. लोकसहित्यामध्ये लोकगीत, लोककथा, दंतकथा, लोकनाट्य, लोकनृत्य या सर्वांचा समावेश असतो.

या प्रकारानुसार अभ्यासकांनी लोकसाहित्याचा अभ्यास करताना दिसून येते. लोकसाहित्याला मर्यादा नसते आणि ही पिढ्यान पिढी चालत आलेली लोकपरंपरा असते. विशिष्ट प्रकारासाठी ही संज्ञा स्वीकारण्यात येते. दत्ता वामन पोतदार यांनी इंग्रजितील 'Folklore' चे भाषांतर म्हणून ' लोकविद्या' हा शब्द वापरला पण 'लोकविद्या' हा शब्द तितका रूढ झाला नाही. नंतरच्या काळात 'लोकसाहित्य' हा शब्द वापरण्यात आला.

तसेच 'Folklore' साठी 'वाङ्मय' आणि 'लोकसाहित्य' हे दोन्ही वापरण्यात येऊ लागले. त्याचप्रमाणे हिंदी मध्ये अनेक अभ्यासकांनी 'Folklore' साठी ' लोकवार्ता' असा पर्यायी शब्द सुचवीला. परंतु दुर्गा भागवत यांनी 'Folklore' साठी ' लोकसाहित्य' हा शब्द सुचवीला आणि तो रूढ झाला.

**१.२ लोकसाहित्याचे प्रकार**

लोकसाहित्य हे व्यापक असल्यामुळे त्याचे विविध प्रकार आहेत

१. लोकगीत

२. लोककथा

३. लोकनाट्य

४. वाक्यप्रचार

५. म्हणी

६. दंतकथा इत्यादी.

**१.३ लोकसाहित्याची लक्षणे**

१. लोकसाहित्य हे मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.

२. लोकसाहित्य हे संचित ज्ञान एका पिढी पासून पुढील पिढीकडे सुपूर्त केले जाते.

३. लोकसाहित्य हा लोकमानसाचा आविष्कार आहे.

४. लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा आरसा असल्याने लोक संस्कृतीच्या अध्ययनासाठी सुलभ ठरते.

५. लोकसाहित्य हे समूहमनाची निर्मिती असते. त्याचा कर्ता अज्ञात असतो.

६. लोकसाहित्य हे व्यक्तीविशिष्ट न राहता समष्टीचे असते.

**१.४ लोकसाहित्याची भाषा**

समाजात प्रत्येक माणसाचे आपले विचार, भावना प्रकट करण्यासाठी भाषा ही महत्वाची असते व भाषेच्या माध्यमातून आपली भावना, विचार व्यक्त करू शकतात. लोकसाहित्य हे लिखित स्वरूपात असत नाही तर मौखिक स्वरूपात असते. प्रत्येक प्रकारांची भाषा ही बोली भाषा असते .त्याचप्रमाणे भोगोलिक पद्धतीने भाषा ही बदलत जाते. वेगवेगळ्या देशात, भागात भाषेचे बदल होताना दिसून येतात. त्याचप्रमाणे भाषेत अदला बदल होत असतो.

**१.५ लोकसाहित्याची व्याख्या**

लोकसाहित्य म्हणजे जे प्राचीन काळापासून चालत आलेली प्रथा , परंपरा व संचित असलेले ज्ञान हे एका पिढीपासून दुसऱ्यापिढी पर्यंत संक्रमित होते त्याला लोकसाहित्य म्हणतात.

काही अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या व्याख्या केल्या आहे त्या अशा आहेत.

**डॉ. गंगाधर मोरजे**

"लोकसाहित्य हे केवळ मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेला नाही. उलट मौखिक आशय विधिसंबधी कृती व अभिनय यांच्याद्वारे सादर केलेला तो प्रयोग असतो तो प्रयोग श्राव्य व दृश्य असतो,म्हणजे लोकसाहित्य होय."

**डॉ. प्रभाकर मांडे**

'लोकसाहित्याचे स्वरूप' या पुस्तकात दुर्गा भागवत यांनी लोकसाहित्याची व्याख्या मांडली आहे.

"लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजे लोकसाहित्य असते. लोकसाहित्य लोकांचे असते. ते व्यक्तीचे कधीही नसते."

**गास्टर याच्या मते**

"लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक महत्वाचा घटक असून तो लोकांकडून विचारपूर्वक किंवा अजाणता संरक्षीला जातो. लोकसाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असते. लोकजीवनाचे सर्वसंग्राहक असा घटक असतो . लोकसाहित्य हे कला व यांचा स्रोत असते. ते लोकांचे लोकानी निर्माण केलेले आणि लोकांसाठी असते."

**मारियस बार्डो**

"विविध व्यवसायचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी आणि रूढी तसेच व्यवहार यासंबधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत जे चालत येते त्या सर्वांस लोकसाहित्य म्हणतात."

एकूण या चार लेखकांची व्याख्या पाहिले तर या व्याख्यातील मला अभिप्रेत होणारी व्याख्या म्हणजे डॉ. प्रभाकर मांडे यांची. एकूण यांच्या व्याख्यातून लोकसाहित्य म्हणजे जे प्राचीन काळातील प्रथा, रूढी,परंपरा आहे जी मौखिक परंपरा आहे ती एका पिढीपासून संचित ज्ञान हे दुसऱ्या पिढीपर्यंत पोचवणे म्हणजे लोकसाहित्य. परंतु त्याचा कर्ता जो असतो तो अनामिक असतो जरी एखाद्या माणसाकडून निर्मिती झाली असली तरी त्या व्यक्तीचे आपल्याला नाव सांगता येत नाही. तर प्रभाकर मांडे याची व्याख्या मला पटते.

**१.६ लोकसाहित्याची व्याप्ती**

लोकसाहित्याची व्याप्ती ही मर्यादित न राहता ती व्यापक आहे व त्यातील काही व्याप्तीचा विचार खालील प्रमाणे केलेला आहे.

**१.६.१ मौखिक आविष्कार**

यामध्ये पारंपरिक लोकजीवनाच्या शब्दबद्ध आविष्कारांचा समावेश होतो. परंपरेने चालत आलेले मौखिक आविष्कार, बोललेल्या किंवा गायलेल्या स्वरूपात असल्यामुळे त्याला expressive literature असे म्हणतात.

**१.६.२ भौतिक संस्कृती**

लोकसहित्याचा दुसरा मोठा विभाग भौतिक संस्कृतीचा असतो. याचे स्वरूप मौखिक किंवा शब्दबद्ध लोकसाहित्यापेक्षा म्हणजे लोक वाङ्मयपेक्षा अगदी निराळे असते. यांत्रिकिकरणापूर्वी लोकजीवनात जे विशेष प्रचलित होते आणि अजूनही परंपरेने चालत आलेले आहेत. त्या सर्वांचा समावेश भौतिक संस्कृती मध्ये होतो. यात परंपरागत चालत आलेली कुंभार, सोनार, सुतार, लोहार इत्यादी. कौशल्ये, तंत्र यांचा अंतर्भाव होतो.

१.६.३ लोकरूढी, विधी, समजुती

लोकवाङ्मय आणि भौतिक संस्कृती या दोघांशी संबंध असणारा, परंतु त्यापेक्षा निराळा असा तिसरा महत्वाचा विभाग लोकरूढी, विधी, समजुती इत्यादी.

१.६.४ प्रयोगसिद्ध लोककला

यामध्ये लोकनृत्य, नृत्यखेळ, विधीनाट्य आदी गोष्टीचा समावेश केलेला आहे.

**१.७ समारोप**

एकूण या पहिल्या प्रकरणात लोकसाहित्याची संकल्पना पाहिली. लोकसाहित्य हे एकूण काय आहे हे संकल्पनाद्वारे आपल्या लक्षात आले. त्याचप्रमाणे त्यातील लोकसाहित्याचे विविध प्रकार आपल्या लक्षात येते. लोकसाहित्याची लक्षणे, व्याप्ती याचा देखील विचार केला आहे. लोकसाहित्याची व्याख्या त्याचप्रमाणे अनेक अभ्यासकांनी केलेली व्याख्या मांडलेली आहे. त्यामुळे आपल्याला समजते कीं अभ्यासकांच्या मते लोकसाहित्य म्हणजे काय? हे आपल्या लक्षात येते. त्याचप्रमाणे लोकसाहित्याची भाषा. भाषेमुळे आपल्याला लोकसाहित्य हे पूर्णपणे समजते व याचे उत्तम आकलन होते. तर अशाप्रकारे या पहिल्या प्रकरणात या सर्व विषयाची चर्चा केलेली आहे.

**१.८ निष्कर्ष**

१) लोकसाहित्य या विषयाचे संशोधन करणार असून मुळात लोकसाहित्य म्हणजे काय? हे जाणून घेणे महत्वाचे ठरते

२) या विषयाचे मुळ काय आहे याचा सैद्धांतिक भाग महत्वाचा ठरतो. त्यामुळे पुढील अभ्यास करण्यास सुलभ ठरते .

३) लोकसाहित्य हे एका पिढी पासून दुसऱ्या पिढी पर्यंत संक्रमित होत असते .

४) लोकसाहित्याची व्याप्ती ही व्यापक असते .

५) समाजात प्रतेक माणसाचे आपले विचार , भावना प्रकट करण्यासाठी भाषा ही महत्वाची असते .

६) लोकसाहित्य हे लिखित स्वरूपात नसून ते मौखिक स्वरूपात असते .

७) वेगवेगळ्या देशात , भागात भाषेचे बदल होताना दिसून येतात .

**संदर्भ**

१)मांडे प्रभाकर , लोकसाहित्याचे स्वरूप , प्रकाशन –गोदावरी प्रकाशन ‘मंगलप्रभा’

## प्रकरण -२

# गोमंतकीय लोकसाहित्याचा आढावा आणि अडवई आणि पिसूर्ले गाव : सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास

प्रस्तावना 14

**२.१ गोमंतकीय लोकसाहित्याचा आढावा.....14**

**२.३ अडवई गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास.....16**

**२.४ पिसूर्ले गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास.....19**

**२.५ समारोप.....20**

**२.६ निष्कर्ष.....20**

**प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणात गोमंतकीय लोकसाहित्याचा आढावा घेतला आहे. गोमंतकात कोणकोणते सण, उत्सव होतात त्याचप्रमाणे प्रमुख पदार्थ, वाद्य यांचा विचार यात केला आहे. त्याचप्रमाणे अडवई आणि पिसूर्ले गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास करण्याचा प्रयत्न इथवर करून या गावातील सण, उत्सव, लोकांचे आचार, विचार स्पष्ट झालेले आहे.

**२.१ गोमंतकीय लोकसाहित्याचा आढावा**

गोमंतकीय लोकसाहित्याचा विचार केला तर ते मर्यादित न राहता व्यापक आहे. अनेक अभ्यासकांनी या विषया संदर्भात अभ्यास केलेला आहे.

लेखक विष्णू विनायक खेडेकर हे गोमंतकीय लोकसाहित्याचे जेष्ठ आहे व संशोधक आहे .लोकसमाज, लोकजीवन आणि लोककला हे खेडेकर सरांचे आस्थेचे विषय आहे. गोमंतकीय लोकभाषा, गोवा लग्नख्यान, लोकसरिता, गोमंतकीय जनजीवन यांचा समग्र अभ्यास त्यांनी केला आहे. त्याचप्रमाणे गोमंतकीय संशोधक रघुनाथ पंडित यांना गोमंतकीय लोकगीते व लोककथाचे अभ्यासक म्हणून ओळखले जाते व त्यांनी लोकगीतांचा, लोककथांचा सखोल अभ्यास केला आहे.

गोमंतकाच्या संदर्भात विचार केला तर मोठ्याप्रमाणात लोकसाहित्य उपलब्ध असलेले आपल्याला दिसून येते. एकूण गोमंतकातील लोकसाहित्य हे व्यापक आहे. आपला गोमंतक हा अनेक मंदिरासाठी, समुद्रकिनाऱ्यासाठी प्रसिद्ध आहे. मंदिरांना खास भेट देण्यासाठी बाहेरून अनेक लोक आपल्या गोव्यात येतात.

आपल्या गोमंतकात अनेक सण, उत्सव, लोकनाट्य सादर केले जातात. आमच्या गोमंतकातील प्रत्येक तालुक्यात गणेश चतुर्थी, दिवाळी साजरी करतात. मुळात गोमंतकीय लोकसाहित्य म्हणजे गोमंतकीय लोकांनी निर्मिलेले साहित्य असे आपणास अभिप्रेत आहे. गोमंतकात वेगवेगळ्या प्रकारच्या जाती जमाती , धर्माचे लोक एकत्र राहतात. गोमंतकातील प्रत्येक माणसाची देवावर श्रद्धा, विश्वास असलेला दिसून येतो. जसे की, प्रसाद पाकळी घेणे, घाडी, गाराणे घालणे, नवें, सुता पुनव अशा काही गोष्टीवर श्रद्धा गोमंतकीय लोकांची आहे.

त्याचप्रमाणे गोमंतकातील प्रमुख देव म्हणजे वारूळ रूपातील सातेरी, रवळनाथ, शांतादुर्गा देवी, वेताळ, राखणदार, देवचार, चंद्रेश्वर, फातर्फेकारीण शांतादुर्गा, लईरायी आई, बोडगेश्वर इत्यादी त्यांची पूजा, उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

गोमंतकातील खाद्य पदार्थ म्हणजे सत्व, अळू, खतखते, सोजी, इत्यादी. क्रिस्ती धर्माचे प्रमुख अन्न सान्ना, धोदेल, दोस, इत्यादी.

गोमंतकात होणारे सण उत्सव म्हणजे जत्रा, धोंडाची जत्रा, गड्याची जत्रा, धालो, चोरउत्सव, दिवजाउत्सव, दसरा, तरंगउत्सव असे अनेक उत्सव गोमंतकात साजरे केले जातात.

गोमंतकातील लोककथा, लोकगीते, लोकनृत्य आणि लोकवाद्य, उखाणे, म्हणी, वाक्यप्रचार आणि लोकश्रद्धा, व्रतवैकल्ये, विधी - विधाने आणि अन्य लोककला या सर्व घटकांचा समावेश होते.त्याचप्रमाणे लोकनृत्य त्यात घोडीमोडणी, वीरभद्र,मोरूले, तालगडी, तोणयामेळ इत्यादीचा समावेश होतो.

गोमंतकीय लोकगीतात श्रमगीते, जात्यावरील ओव्या, लग्नगीते, फुगडी, शिगमोउत्सवाचे गीत इत्यादी गोमंतकात आढळतात. कौटुंबिक जीवनातील सुख दुःखाची आंदोलने गोमंतकीय लोकगीतात स्त्रियांनी रेखाटली आहेत. क्रिस्ती जागर, शिवोलीचा जागर, गौळण काला, संकासुर, दशावतार, रणमाले, पेरणी, गोपाळ काला हे गोमंतकात प्रचलित आहे. शिगमा हा गोमंतकातील लोकप्रिय उत्सव आहे.विविध वाद्यांचा वापर केला जातो. ढोल, ताशा, घुमट, समेळ, कासाळे ही वाद्य असतात.

गोमंतकात विविध अशा माध्यमाद्वारे लोकसाहित्याची ही परंपरा अखंडितपणे चालू राहिली आहे. यामुळे आपल्याला गोमंतकातील लोकसाहित्य समजून घेणे आवश्यक होते.

गोमंतकाच्या पूर्वेला सह्याद्रीच्या कुशीत व म्हादय या जीवनदायी नदीच्या सानिध्यात सत्तरी प्रांत वसलेला आहे. सत्तरी हे नाव सत्तरीचे वतनदार राणे यांचे पूर्वज सत्रोजी राणे यांच्या नावावरून पडले असे म्हटले जाते. या प्रांतात सत्तर गावे आहेत म्हणून सत्तरी असे म्हटले जाते.

## २.३ अडवई गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास

### अडवई गावातील सांस्कृतिक अभ्यास

अडवई हा गाव खूप मोठा आहे विविध जातीचे लोक राहतात.त्यात महार, कुंभार, गावकार, भट, ब्राह्मण इत्यादी. या गावात श्री शांतादुर्गा देवीचे सुबक आणि सुंदर मंदिर गावच्या मधोमध आहे. देवळाच्या खिडक्यावर शिल्प कोरलेले आहे, बाजूला लहान लहान देवांच्या घुमट्या आहे त्यात गणपती, मारुती, म्हारिंगण अशा देवाची घुमटी तिथे आहे. एक विहीर आहे. देवीचा वर्धापन लईरायी देवीची जत्रेच्या दुसऱ्या दिवशी असते. अनेक भागातून लोक देवीची ओटी भरण्यासाठी येतात.या अडवई गावात जे प्रत्येक सण, उत्सव होतात ते सण, उत्सव शांतादुर्गा देवीच्या देवळात होतात. सगळ्यात आदी देवळात करतात त्यानंतर गावात साजरा करतात. ही परंपरा अजून चालत आहे. त्याचप्रमाणे या देवळात विविध कार्यक्रम होतात. दर दिवशी पूजा करतात तसेच गुरुवारच्या दिवशी भजन केले जाते. देवीची जत्रा,'काला' हा तिथीनुसार होतो. गुढीपाडवा, दसरा, कोजागिरी पौर्णिमा हे सण साजरी करतात. नवरात्रीचे नऊ दिवस श्री शांतादुर्गा देवीला अभिषेक करून पूजा करतात. कीर्तन, भजन, दांडिया, नाटक असे नऊ दिवस कार्यक्रम करतात.

दसऱ्याच्या दिवशी देवीला विविध फुलांनी सजविली जाते. अलंकार धारण केले जातात. देवीला सुंदर साडी नेसवली जाते व दसऱ्याच्या दिवशी रात्री पावणी असते.काही मंडळी आनंदाने पावणी घेतात. त्यानंतर भजन करतात देवीची आरती करतात.

दसऱ्यादिवशी देवळाच्या बाजूला आपट्याचे झाड लावले जाते व पूजा केली जाते व प्रत्येक भाविकांना ते एक एक पान वाटले जाते. या पानाला 'सोन्याचे पान' किंवा 'सोने' असे म्हटले जाते. दसऱ्याच्या दिवशी या पानाला खूप महत्वाचे मानले जाते. प्रत्येक माणूस ते पान आपल्या सोबत घरी नेतात. आपल्या आयुष्यात पैशांची कमी होणार नाही पैसाचा लाभ होणार हा लोकसमज पूर्वी लोकांचा होता. परंतु आता देखील त्याचप्रमाणे करतात. अडवई गावात कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी देवळात फराळ केला जातो त्यात दूध, फळे व इतर खायचे पदार्थ असतात. सत्यनारायणाची पूजा करतात .

होळीच्या दिवशी देवीकडे गाराणे घालून शिमगोउत्सवाला सुरवात करतात. सात दिवसाचा शिगमोउत्सव संपल्यावर देवीच्या चरणी असलेला कळस कळशातील तीर्थ त्याला आपण ' न्हावाण' असे म्हणतात. ते सर्वांना देतात. त्यानंतर या देवळात लग्न कार्य देखील करतात अडवई गावातील लोक विशेषतः करून शांतादुर्गा देवीच्या देवळात लग्न लावतात व अजून देखील त्या देवळात लग्न लावतात. नवीन लग्न झालेले जोडपे देवीची ओटी भरण्यास येतात नवीन गाडी सुद्धा घेतली तर देवीकडे घेऊन येतात. पूर्वीपासून चालत आलेले आहे. शांतदुर्गा देवीचा ज्या दिवशी काला असतो त्या दिवशी गावातील लोक सगळयात आदी घर साफ करतात, अंगणात शेण काढतात व फराळ केला जातो ' मुगाचे गोडशे ' करतात आणि आपल्या नातेवाईकांना बोलवतात अशी काल्याच्या दिवशी गावात रीत आहे. ही परंपरा अजूनही चालत आहे. पूर्वीपासून चालत आलेली परंपरा आजही पाळली जाते. देवळाच्या बाजूला देवीला बसविण्यासाठी एक जागा केलेली असते त्या जागेला ' चौकी' असे म्हणतात.

पूर्वी काल्याच्या दिवशी सकाळी देवीचा कळस बाहेर काढून त्या चौकीवर आणून बसवीत होते व म्हार जातीतील लोक ढोल वाजवून त्याला संध्याकाळी देवळात नेत असत त्यानंतर रात्री काला केला जातो.

परंतु म्हार जातीतील लोकांना देवळात प्रवेश देत नसायचे त्यांना फक्त ढोल त्याला ' ढोलूक' असे म्हणतात ते वाजवीण्यापूरतीच देवळाच्या मंडप पर्यंत प्रवेश देत असत. जो पर्यंत म्हार लोक ढोल वाजवीत नाही तो पर्यंत देवीच्या उत्सवाला सुरवात करत नव्हते.वाजवत असताना म्हार खाली कपडा घातला जातो व येणारे जाणारे लोक त्या कपड्यावर पैसे घालतात व म्हार हा खाली एक कपडा घालून बसलेला असतोत. ही प्रथा अजून अडवई गावात आहे. अजून देखील अशी रीत आहे.

अडवई गावाचा सांस्कृतिक अभ्यास करत असताना लक्षात आले की, अडवई गावातील लोकांनी आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतात. देवा विषयी त्यांचा मानत, प्रेम, भावना, विश्वास असलेला दिसून येतो. देवासाठी वेळ काढून पूर्वीची परंपरा जपत आहे. सणासुधीच्या निमित्ताने गावातील पाच पिळगी म्हणजे, देसाई, कुंभार, गावकार, म्हार, भट हे पाच पिळगी गावातील एकत्रित येतात आणि गावातील उत्सव व देवळात होणारा उत्सव एकत्र मिळून साजरे करतात व आपली प्रथा, परंपरा, संस्कृती टिकविण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

**अडवई गावातील सामाजिक अभ्यास**

सामाजिक अंगाने अभ्यास : अडवई गावात अनेक लोक राहतात. राणे, देसाई, गावकार, भट, कुंभार, म्हार जातीचे लोक या अडवई गावात राहतात. अडवई गाव हा पूर्वी डोंगरी भाग होता. सगळीकडे हिरवळ होती. पूर्वी पोर्तुगीज काळात बाटाबाटीच्या वेळी शांतादुर्गा अडवई गावात आणण्यात आली असे सांगितले जाते. समाजात प्रत्येक माणसाचा देवावर जास्त विश्वास होता त्यामुळे ती देवी स्थापन करण्यासाठी घाडी कडे जायचे 'प्रसाद पाकळी' घ्यायचे. पूर्वी समाजात अशा गोष्टीवर आणि घाडिंवर जास्त विश्वास असायचा.

जेव्हा पोर्तुगीज लोकांनी सत्तरी तालुक्यावर कब्जा केला होता त्यावेळी अडवई येथील ' दीपाजी राणे' हे सत्तरीला वाचवण्यासाठी बंडात लढत होते व त्यांना हाकलून लावले होते. अडवई येथील त्यांचे घराणे अजून आहे व त्याचे नाव त्याच्या नातवाला दिले आहे ' दीपाजी राणे' असे. त्यांचा घरात तलवारी वैगरे अजून उपलब्ध आहे. यांचावरून आपल्याला लक्षात येते की पूर्वी समाजात परिस्थिती जशी होती त्याला मात करण्याचे काम या दीपाजी राणे यांच्या घराण्याचे आहे. अडवई गावात त्यांच्या घराण्याला मान देतात.

त्याचप्रमाणे समाजात म्हार लोकांना पूर्वी देवळात वैगरे प्रवेश नसायचा. पूर्वी लोकांना देऊळात जेवणाच्या पंगतीत त्यांना बसवत नसे. तुच्छ मानत होते. परंतु देवाने म्हार या जातीतील लोकांना पहिले स्थान दिले आहे म्हणजे जो पर्यंत म्हार लोक ढोल अडवई गावात ढोल याला ' ढोलूक' म्हणतात वाजवीत नाही तो पर्यंत देवाच्या कोणत्याही उत्सवाला सुरवात होत नाही. अडवई गावात अशी प्रथा आहे कीं म्हार लोक ढोल ज्यावेळी वाजवतो त्यावेळी तो खाली जमनिवर कपडा घालतो आणि प्रत्येक येणारे जाणारे लोक त्यात पैसे घालतात. व ते माहित नसलेल्या लोकांना मुद्दामहून सांगतात कीं म्हार लोक आहे त्यांना पैसे घाला तर ते घालायचे. ही प्रथा अजून अडवई गावात चालते.

देवाने म्हार जातीतील लोकांना स्वीकारले आहे परंतु समाजात काहीकडे अजून स्वीकारले नाही. तर अडवई सारख्या गावात अजून म्हार लोकांना देवळात जास्त प्रवेश करायला देत नाही. अजून त्यांचा विचार बदलेला नाही. परंतु जे पूर्वीपासून चालत आलेले त्याचा ते मान ठेवत आहे. व त्यानुसार वागत आहे. समाजात लोकांची समजुती आहे कीं,ज्याप्रमाणे समाजात विधी, रीत असते त्यानुसार प्रथा पुढे नेतात. केली नाही तर अशुभ होईल अशी समजूत समाजातील लोकांची झालेली आहे. सत्तरी तालुक्यातील अडवई गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास

करत असताना अडवई गावात अनेक प्रकारचे उत्सव साजरी करतात त्यात काही आधुनिक विचारांची भर पडलेली दिसून येते.

अजून आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न अडवई गावातील लोक करताना दिसून येतात. सामाजिक अभ्यास करत असताना समाजात ज्याप्रमाणे सण, उत्सव साजरी करतात जी रीत आहे त्याच पद्धतीने साजरी केले जातात. समाजात अनेक जातीचे, धर्माचे लोक एकत्रित राहतात. चाली रीत जशी आहेत त्याप्रमाणे आपले जीवन जगतात. परंतु समाजात नवीन पिढी शिकलेली असल्या कारणाने आधुनिक विचारांची समाजात भर पडलेली दिसून येते. दुसऱ्या संस्कृतीच्या संपर्कामुळे त्यांचा थोडा प्रभाव आपल्या संस्कृतीवर पडत आहे परंतु अडवई सारख्या गावात ते जपण्याचा प्रयत्न ते आजवर करतात आणि करताना दिसून येतात.

त्याचप्रमाणे म्हार जातीतील समाजाने जरी स्वीकारले नसले तरी सरकारने त्यांना अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षणासाठी पैसे दिले जातो किंवा शिक्षणाची फी त्यांच्या मुलांना कमी असते. तरी देखील अजून अडवई गाव तितक विकसित झालेला दिसत नाही.अजूनही पूर्वीचे विचार बदलेले दिसून येते नाह. सणाच्या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येतात परंतु बाकीचे दिवस ते आपल्या विचारा प्रमाणे वागतात.समाजात ज्या प्रमाणे आधुनिकतेचा प्रभाव पडला आहे त्याप्रमाणे आपल्या संस्कृतीत बदल होताना दिसून येतो.

## २.४ पिसूर्ले गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास

### पिसूर्ले गावातील सांस्कृतिक अभ्यास

सत्तरी तालुक्यात पिसूर्ले हा गाव आहे. अडवई गावापासून जवळ असलेला गाव म्हणजे पिसूर्ले गाव. या गावात अनेक उत्सव साजरे करतात. दसरा, दिवजा, देवळाचा वर्धापन.

पिसूर्ले येथील दसऱ्याच्या दिवशी भुते वैगरे काढली जातात. दुपारी १२ च्या सुमारास भुते काढतात व अनेक लोक जमतात. संध्याकाळी त्यागावातील लोक त्याचबरोबर अनेक भागातून लोक संध्याकाळी देवीचे कौल घेण्यासाठी येतात. लोक आपले अनेक प्रश्न किंवा आयुष्यात होणारा त्रास या संबंधीचे प्रश्न ते कौल घ्यायला जातात तेव्हा देवीपुढे मांडतात. नवदुर्गा देवी जे काही त्यांच्यावर निवारण करण्यास सांगते तेव्हा ते लोक देवीने सांगल्याप्रमाणे करतात.

त्याची श्रद्धा असलेली दिसून येते. शेवटी सगळे लोकाना कौल दिल्यावर पिसूर्ले गावातील म्हार या लोकांना कौल दिले जाते. ह्या देवळात म्हार जातीच्या लोकांना आत प्रवेश देत नाही सक्त मनायी आहे. जर म्हार लोक देवळाच्या आत गेले गर्भकुडी पर्यंत तर काही ना काही अशुभ होते व होणार अशी समजुती आहे. सगळयात शेवटी म्हार जातीच्या लोकांना कौल दिल्यावर देवीचा कळस देवळात आत नेला जातो. त्या गावात दिवजा उत्सव होतो. तो नवदुर्गेच्या देवळात न होता त्याच्या बाजूला असलेले देवळात होते. आमवाशेच्या दिवशी रात्री दिवजा पेटवली जातात.

**पिसूर्ले गावातील सामाजिक अभ्यास**

पिसूर्ले गावातील समाजिक अभ्यास करत असताना लोकांची श्रद्धा, समजुती असलेली दिसून येते. त्याचप्रमाणे पूर्वी लोक म्हार लोकांना ज्याप्रमाणे वाईट वागायचे हे आपल्याला यावरून दिसून येते. तसे पाहिले तर अडवई गावात आणि पिसूर्ले गावातील संस्कृती तर एक सारखीच आहे. पूर्वी पासून चालत आलेली प्रथा, समजुती त्यानुसार या 'अडवई' आणि 'पिसूर्ले' गावातील लोक आपले जीवन जगताना दिसतात व आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतात. परंतु दोन्ही गावात म्हार जातीतील लोकांना ते स्वीकारत नाही समाजात अजून गावात म्हार लोकांना तुच्छ समजतात. सरकारने म्हार या जातीतील लोकांसाठी काही सोय केली आहे. परंतु काही ठिकाणी अजून म्हार जातीतील लोकांना देवळात प्रवेश दिला जात नाही. त्यानां फक्त ढोल वाजवण्याकरिता बोलवतात इतकाच मान त्यांना समाजात दिला जातो.

**२.५ समारोप**

एकूण या प्रकरणात अडवई आणि पिसूर्ले गावातील सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास इथवर केला आहे. कशा प्रकारे अडवई गावात सण,उत्सव साजरे करतात या बद्दल मांडले आहे.

**२.६ निष्कर्ष**

१. प्रस्तुत प्रकरणात केलेला सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यासामुळे लक्षात येते की अडवई आणि पिसूर्ले गावात काहीप्रमाणात जातीभेद करताना दिसून येतात.

२.महार जातीचा उल्लेख जास्त सापडतो. कशाप्रकारे अडवई आणि पिसूर्ले गावातील महार लोकांना त्रास भोगावा लागतो व लागायचा हे यावरून लक्षात येते.

३. त्याचप्रमाणे गावातील सण, उत्सव कशाप्रकारे साजरे केले जातात, प्रथा, परंपरा टिकविण्याचा प्रयत्न करताना दिसून येते.

**संदर्भ**

कोमरपंत सोमनाथ, गोमंतकीय लिकसाहित्य

# प्रकरण -३

# अडवई आणि पिसुर्ले गावातील लग्न गीतांचा अभ्यास

**प्रास्ताविक** .......... 24

**३.१ लोकगीत : संकल्पना** .......... 24

**३.२ लोकगीताची लक्षणे** .......... 24

**३.३ लोकगीतांचे प्रकार** .......... 25

३.३.१ स्त्रीगीते .......... 25

३.३.२ पुरुषगीते .......... 25

३.३.३ बाळगीते .......... 25

**३.४ लोकगीताची व्याख्या** .......... 25

**३.५ लग्नविधी आणि लग्न संबंधी लोकगीते** .......... 26

**३.६ लग्न विधीचे बदलते स्वरूप** .......... 38

**३.७ लग्न गीतांचे महत्व** .......... 42

३. ८ लग्न गीतांचा आशयनिष्ठ अभ्यास .......... 42

३.८.१ लग्न गीतांच्या माध्यमातून दिसून येणारे अन्न विषयक उल्लेख .......... 43

३.८.२ लग्न गीताच्या माध्यमातून कपड्यांचा परिचय .......... 44

३.८.३ लग्न गीतातील चित्रमय शैली .......... 44

**३.९ लग्न गीताचा सामाजिक अंगाने अभ्यास .......... 46**

**३.१० समारोप .......... 47**

**३.११ निष्कर्ष .......... 48**

## प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात अडवई आणि पिसुर्ले गावातील लग्न गीतांचा अभ्यास केलेले आहे. लग्न गीताच्या माध्यमातून दिसून येणारे देव दैवत, अन्नाचा उल्लेख , नातेवाईकांचा उल्लेख या सर्वांचे चित्रण या प्रकरणात केलेले आहे . त्याचप्रमाणे लग्न गीतातील चित्रमय शैली केलेली असून लोकगीतांचा आशयनिष्ठ अभ्यास केला आहे .

## ३.१ लोकगीत : संकल्पना

मौखिक परंपरेने चालत आलेल्या अनेकविध गीतप्रकारचा निर्देश या संज्ञेने केला जातो . सर्व लोकसाहित्याप्रमाणे लोकगीते ही समुहमनाची व समुहप्रतिभेची निर्मिती आहे . निसर्गाच्या लयबद्धतेशी व तालबद्धतेशी संवाद साधीतच ही गीतनिर्मिती झाली.

प्रभाकर मांडे यांनी लोकगीतांची लक्षणे स्पष्ट केली आहे.

## ३.२ लोकगीताची लक्षणे

१. लोकगीते परंपरेने चालत असून त्याचे कर्तृत्व कोणत्याही एका व्यक्तीला देता येते नाही. या दृष्टीने ती अनामिकांची असतात.

२. लोकगीतांची निर्मिती होणे व लोप पावणे या दोन्हीही क्रिया एकाच वेळी चालू असतात. लोकगीतांची जडण घडण सतत चालू असते. ते जुनेही नसते आणि नवेही नसते.

३. लोकगीताचा प्रत्येक पाठ हा अधिकृत असतो. त्याचा शुद्ध मौलिक पाठ शोधता येते नाही .

४. लोकगीतात गेयता असते. ती स्वरप्रधान असतात. लोकगीतांच्या म्हणण्याच्या काही विशिष्ट पद्धती असतात. या चाली परंपरेने चालत आलेल्या असतात.

५. ओवीगीते स्वतंत्र, स्वयंपूर्ण अशी असतात. त्यात कधी कधी सलग आशय व्यक्त केलेला असतो.

६. लोकगीतात स्त्रीगीतांची संख्या अधिक प्रमाणात असते.

७ .लोकगीतात लोकसमुहाच्या भाव विश्वाचा, विचार विश्वाचा आणि कल्पनाविश्वाचा अविष्कार असतो. त्यात लोकमानसाची अभिव्यक्ती झालेली असते.

**३.३ लोकगीतांचे प्रकार**

**३.३.१ स्त्रीगीते**

स्त्रीगीते - या प्रकारात प्रत्येक स्त्री आपले श्रम कमी करण्यासाठी किंवा श्रम कमी व्हावा म्हणून गीते गायली जातात.

उदा : दळण, कांडण, फुगडी गीत, ओवी

**३.३.२ पुरुषगीते**

उदा : मुसळ नृत्य, तोणयामेळ, तालगडी इत्यादी.

**३.३.३ बाळगीते**

बाळांची बडबड गीते

यांसर्वांचा समावेश या प्रकारात केलेला आहे किंवा केला जातो.

**३.४ लोकगीताची व्याख्या**

लोकगीत म्हणजे, लोकसमूहाने निर्मिलेले गीत होय. हे गीत लोकजीवनविषयक गीत असते आणि ते लोकसमूहात प्रचलित असते. लोकगीत हे लोकसाहित्याचा आत्मा मानला जातो. लोकगीताचा उगम निरक्षरांत झालेला असून त्याचा कर्ता अज्ञात, अनामिक असतो. लोकगीते त्या त्या समाजाच्या बोली भाषांतच असतात आणि पुनरावृत्ती हे लोकगीतांचे वैशिष्ट्ये आहे.

गोमंतकात लग्न विधीशी संबधित लोकगीतांचा साठा मोठ्या प्रमाणात आहे. ही गीते लग्नाच्या विविध विधिशी संलग्न असल्याने पूर्वीच्या लग्न विधीचे स्वरूप जाणून घेणे आवश्यक आहे.

### ३.५ लग्नविधी आणि लग्न संबंधी लोकगीते

पूर्वीच्या काळी लग्न ठरवायचे म्हणजे एक वेगळीच पद्धत होती घरात मुलगी किंवा मुलगा लग्नाचा झाला की त्यांच्यासाठी योग्य स्थळ पाहण्यासाठी घरातल्यांना सतत काळजी असायची. मुलासाठी मुलगी पसंत करायचे म्हणजे खूप मोठे काम असायचे. कुणी एखादी मुलगी सांगितली तर, ती मुलगी कशी आहे, घरात कोण कोण आहे, किती भावंडे आहे ते काय करतात , त्यांचे घराणे आणि ती किती भावाच्या पाठीवरची म्हणजे जसे तीन मुलाच्या पाठीवरती झालेली चौथी मुलगी ( तिकली ) म्हणजे वाईट असते असे समजायचे आणि त्याच्या पाठीमागे पाचवी मुलगी म्हणजे ( निकळी ) ती त्याहून वाईट समजायचे .

हे वारंवार विचारपूस करून खात्री करून घ्यायचे. तसेच त्यांच्या घरच्यांचे शेजाऱ्यापाजाऱ्याकडे संबंध कसे आहे त्यांना गावात लोक कसे वागवतात हे सर्व माहिती करून घ्यायचे. मगच मुलगी किंवा मुलगा बघण्याचा कार्यक्रम ठरवायचे . घराणे बघून झाले ते योग्य आहे असे पटले तर मग मुलगा, मुलगीची पत्रिका बघण्यासाठी पुरोहिताना भेटायचे . दोघांचे गुण किती जुळतात हे विचारून खात्री करून घ्यायचे . इतकेच नव्हे तर पूर्वी गावच्या कुळ मंदिरात पुजारी देवाच्या मूर्तीला कौल लावायचे म्हणजे एक प्रकारच्या 'पिटकोळीची फुलाची' कळी देवीच्या मूर्तीला डाव्या व उजव्या बाजूला लावायचे व देवीला सांगणे करायचे की कुणाचे जे काम असेल त्यासाठी त्यांना देवीचा कौल मागायचे. उजवी कळी पडली म्हणजे चांगले होणार व डावीकडची कळी पडली म्हणजे ते काम वाईट किंवा ते काम करूच नये असा संकेत समजायचे . तेव्हा लोकांची देवावर फार श्रद्धा व विश्वास होता. ते जसा कौल मिळेल तसा निर्णय घ्यायचे .

पत्रिका बघून झाली की मग देवीच्या कौलासाठी दोघांच्या घरची वडिलधारी माणसे देवळात जाऊन आपापल्या देवीचा कौल घ्यायचे व दोघांना देवीचा कौल चांगला मिळाला तरच होकार ठरवायचे . एकीचा जरी कौल देवीकडून नाही मिळाला तर ती लग्न ठरवत नसायचे . दोघांना चांगला कौल मिळाला म्हणजे लग्नाला देवीचा आशीर्वाद आहे. हे कार्य चांगल्यारीतीने पार पाडण्यासाठी त्यांचे आशीर्वाद मागायचे. देवाची सर्व प्रकारची चांगली बातमी मिळाली की मुलगी बघण्याचा कार्यक्रम असायचा. तेव्हा मुलगी ज्या घरात देणार किंवा ज्याघरातील मुलगी मुलाला आणणार हे सर्व तपासून म्हणजे घरातल्याचे गुण, वागणूक आपुलकी

माहिती करून घेत होते. जेणेकरून आपली मुलगी त्या घरात कशी खुश राहणार की नाही असे समजत असे. घरातली माणसे आई, वडील, भाऊ, बहीण आपल्या मुलीला कसे वागवतील हे कळते. तिला काही त्रास तर होणार नाही ना, यासाठी माणसांची चांगली ओळखकरून घ्यायची व देवीचा होकाराचा कौल यावर विश्वास ठेवून पुढे सारायचे.

आई वडिलांचा आपल्या मुलांवर असलेलं प्रेम यावरून स्पष्ट दिसते की आपल्या मुलाला दुसऱ्याच्या घरात कोणतेही दुःख मिळू नये कोणत्याही वाईट घराण्यात पडू नये या विचारात आपल्या हातून कोणतीच चूक किंवा कुठेच दुर्लक्ष होऊ नये असे त्यांना वाटायचे. पूर्वी जास्त तर मामाची मुलगी व आत्याचा मुलगा असे नात्यातच लग्न जुळवली जायची. जेणे करून आपली मुलगी नात्यातच राहील व घरातले बहीण भावोजी ओळखीचेच असेल. पण कोणाचे नात्यातले नसेल तर बाहेर मुलगी किंवा मुलगा बघण्याची पाळी येई. असे म्हणतात कीं तेव्हा मुलगी शोधण्यासाठी वडिलांची चप्पल झिझायची.

मुलगी बघणे हे सोपे नसायचे सर्व नातेवाईकांना सांगायला लागायचे म्हणजे काका, काकी,मामा, मामी, आत्या, बहीण, भावोजी. तसेच शेजारी म्हणजे तेव्हाचे ( वार्शी ) जे आपल्या कुठल्याही नात्यात येत नाही पण एकाच गावात राहतात. त्यांना पण खास आवर्जून सांगायचे व त्याचाही मान असायचा असे हे ( वार्शी ). मुलगी बघण्यापासून लग्न पूर्ण होईपर्यंत त्यांची गरज असायची.

प्रत्येक लग्नाच्या विधित ते एक जण तर असायलाच पाहिजे असा तेव्हा गावातला नियम होता. मुलगी बघायला जाण्यासाठी एकूण दहा, पंधरा लोक असायचे. त्यांना गाडी करून न्यायचे. वाटेत चहा पाण्याचे सर्व नवर मुलाने बघायचे.

मुलीच्या घरी पोहचले की त्याचे स्वागत झाल्यावर त्यांना बसायला द्यायचे .सगळ्यात आधी पाणी द्यायचे मग मुलगी साडी नेसून जे काही दागिने असतील ते घालून गजरा माळून सुंदर तयार होऊन हातात चहाचे ताट घेऊन बाहेर यायची व तिच्या मागून कुणी लग्न झालेली नातेवाईक बाई असायची व तिला चहा देण्यास मदत करायची.

सर्व प्रथम नवऱ्याला व त्याचा सर्व आलेल्या नातेवाईकांना द्यायची कुणी ओळखीचा उठून प्रत्येकाची ओळख सांगायचा व तशी ती वाकून त्यांना नमस्कार करायची. मुलीला आलेल्या दहापंधरा जणांना वाकून नमस्कार करायला सांगायचे तेव्हा नवऱ्याला व मुलीला बघायला मिळायचे. तेव्हा ती ऐकमेकांना बघायचे व मुलगी सुंदर व सर्वगुण असली की नवऱ्याने चहा घ्यायचा व ताटात पैसे किंवा साडी ठेवायचे. मुलगी तेव्हा ते ताट घेऊन आत जायची ती परत बाहेर येत नसे. मुलगी पसंत करून सर्व मंडळी चहा फराळ करायची व साखरपुढ्याची तारीख ठरवायची व घरी यायचे. घरी आल्यावर साखर पुढ्याची तारीख सगळ्या राहिलेल्या इतर नातेवाईकांना सांगायचे. गावात तेव्हाच लोकांना मुलगी कोणत्या गावात किंवा कोणत्या घरात दिली हे कळायचे. तेव्हा मुलगी, मुलगा पसंत असूनही त्यांना ऐकमेकांना भेटण्याची बोलण्याची परवानगी नसायची. पाहण्याच्या कार्यक्रमांपासून एका महिन्यात साखरपुढा ठरवायचे.

साखरपुढा म्हणजे तेव्हा वेगळयात पद्धतीचा असायचा. साखरपुढ्यासाठी नवऱ्याकडची मंडळी नवरी मुलीसाठी सर्व साज शृंगार त्यात साडी, कुंकू, आरसा, फणी, फुले, बांगडी, हे सर्व घेऊन मुलीच्या घरी जायचे. साखरपुड्याला सर्व प्रथम नवऱ्याने आणलेले सर्व सामान नवरी मुलीला द्यायचे. तसेच देवाचे सामान त्यात नारळ, फुले, अगरबत्ती, गूळ, साखर, खजूर, फळे, ठेवलेली असतात हे सामान तुळशीच्या पुढे चटई घालून त्यावर हे सर्व सामान ठेवायचे. पाट. तुळशीपुढे ठेवून त्यावर पाच पानाचा विडा, फुले, फळे, अगरबत्ती, व समई पेटवून ठेवायचे.

नवरी मुलगी साडी नेसून जे काही दागिने आहे ते घालून सुंदर तयार होऊन बाहेर घेऊन येतात व नवरा - नवरीला तुळशीच्या पुढे उभे करतात . त्याच्या बरोबर दोघांकडचे आईवडील व शेजारी, नातेवाईक सर्व मंडळी असतात. सर्वजण हात जोडून देवाला सांगणे करतात व हे कार्य चांगल्या प्रमाणे पार पाडण्यासाठी पार्थना करतात. नंतर नारळ फोडतात व नारळाचे शिरनी करून त्यात गूळ घालून सर्वाना देतात.

नवरा मुलगा नवरीला आपण आणलेली शृंगार सामानाचे ताट नवरीला देतो. ते ताट घेऊन देवा समोर जोड्याने हात जोडतात व दिलेला शृंगाराचे ताट घेऊन आत जाते. नवरी मुलगी नेसून बाहेर येई पर्यंत वडीलधारी मंडळी देण्याघेण्याचे बोलतात, मुहूर्त व लग्नाची तारीख तेव्हाच ठरवतात. लग्न कुठे करायचे, लग्नात नवऱ्या

मुलीला मुलीकडून काय द्यायाचे, मुलीच्या घरच्यांना कपडे त्याचप्रमाणे नवरीच्या मामा, मामीला, बहिणीला, आजीला, मुलीचा शालू देवीचे कापड असे सात नग द्यावे लागायचे. गाडीचा खर्च, जेवणाचा खर्च असे सर्व काही सर्वांच्या समोर बोलले जायचे. लग्न तेव्हा जास्त तर मुलीच्या घरी होत असे .

मुलगी तयार होऊन बाहेर येते त्यानंतर दोघांना एकत्र बसवतात व जर कुणाची तेव्हा अंगठी घालायची ऐपत असेल तर ते ऐकमेकांना सोन्याची अंगठी घालायचे कोणाला झेपत नसेल तर घालत नसे. त्यानंतर नवरीची आई मुलीची पाच नारळानी ओटी भरायची. तेव्हा अंगठी घातली नाही तरी चालायची पण देवापुढे सांगणे करून देवाला नारळ फोडणे याला जास्त महत्व द्यायाचे. नंतर सर्व शेजारी, नातेवाईक दोघांना कुंकू व तांदूळ लावायचे व दोघेजण उठून वडिलधारी माणसांना नमस्कार करायचे.

साखरपुढ्याला आणखी एक रीत होती ती म्हणजे मुलीकडच्याकडून फुलांची खास मागणी असायची म्हणजे त्यांना जेवढ्या हव्या असतील तेवढ्या फुलाच्या वेण्या आणून द्यावे लागे. त्यावर सांगेल तेवढे पैसे पण द्यावे लागे . गावच्या बायकांचा एक हक्क असायचा ते कुणीही नाही म्हणू शकत नव्हते व त्यांना द्यावेच लागत असे. नंतर सर्वांना जेवण वैगरे करून आलेल्या सुवासिनीना हळदपिंजर लावायचे व आलेल्यांचा मान म्हणून त्यांना काही द्यायाचे व ख़ुशी ख़ुशीने परत पाठवायचे.

लग्नाचे कपडे म्हणजे त्याला (धडवत ) असे म्हणतात. नंतर कपडे काढण्यासाठी घरातले, नातेवाईक व काकीं, बहीण, मामी, यांना आवर्जून बोलवायचे. धडवत काढत असताना दोन्ही कडच्या देवीला कापड घ्यायचे नंतर कपडे बघायचे. नवरीला शालू त्यांना द्यायचे सात शृंगार घ्यायचे व बहिणीला खास साडी असायची नवऱ्याला कपडे काढायचे.

दुकानदार ते कपडे एका कपड्यात गुंडाळून आईच्या हातात मानाने द्यायाचे व ते बाकीचे कपडे कोणीही घेतले तर चालायचे. तर अशा प्रकारे धडवत काढायचे.

लग्नपत्रिका छापण्याचे काम त्यावर सगळ्या देवांची नावे, आईवडिलांचे नाव, विवाह स्थळ, हळदी समारंभ लिहितात. नातेवाईकांची नावे घालतात. पत्रिकेत नाव लिहिणे म्हणजे ज्याच्या त्याच्या मान दिल्यासारखं असायचा.

पत्रिका छापून घरी आणली की ती सर्वप्रथम देवाची पूजा करताना देवा समोर ठेवतात व त्यावर हळदकुंकू, तांदूळ, फुले वाहतात व देवापुढे ठेवतात व आशीर्वाद मागतात. सांगणे करतात की लग्न एकदम निर्विघ्न पार पडू दे मगच पत्रिका नातेवाईकांना देतात. तरीसुद्धा पहिली पत्रिका नवऱ्या किंवा नवरीच्या मामालाच द्यायची असते मगच बाकीचे नातेवाईकांना लग्नाच्या पंधरा दिवस अगोदर पत्रिका वाटून झालेली असते.

नवऱ्याच्या व नवरीच्या गावात पत्रिका वाटली जातात. लग्नाला देवाच्या पूजेला लागणारे बांबूचे साहित्य लागते जसे की 'दाली' कुळ पूजण्यासाठी बारीक ती परात सारखी खोल व रुंद असते. मग छोटी 'वल्ली' चौकोनी पण उंच असते त्यात देवाचे साहित्य असते. मोठी 'वल्ली' जी लग्न लागताना वापरतात त्यात नारळ, फुले हे साहित्य घालून नेतात व तीन नग होतात म्हणून वारा घालण्यासाठी एक खास प्रकारचा बांबूचा पंखा करतात. पण नवऱ्याकडच्या एवढ्या सामानात आणखी एक पर्स सारखी वस्तू ज्याला 'सामळी' म्हणतात ती घ्यावी लागते व त्यात नवरीसाठी फणी, पिंजर व दोरे ठेवलेले असतात असे एकूण हे पाच नग नवऱ्याला देतात.

बांबूच्या साहित्याला 'म्हारवत' असे म्हणतात हे म्हारवत लग्नाच्या अगोदर पंधरा दिवस सांगितलेले असते व त्यांना हे ही सांगावे लागते की म्हारवत कुणासाठी नवरा की नवरी त्याप्रमाणे त्यांचे नग व पैसे वेगळे असतात. हे म्हारवत ती हळदीच्या आदल्या दिवशी घेऊन लग्नाच्या घरी येते. तेव्हा कुठल्याही मोठ्या जातीचा माणूस त्याचा मानपान केल्या शिवाय राहत नाही. त्याला केळीच्या पानात तांदूळ, नारळ एक खण व म्हारवताचे पैसे मानाने देतात. लग्नाच्या चार दिवस अगोदर लग्नाला लागणारे मातीचे छोटे सुंदर रंगवलेले म्हणजे ' करे' किंवा मटके असे म्हणतात तर ते आणायला जातात. त्यासाठी शेजाऱ्यांना बोलवावे लागते. पाच सुहासुनींना घेऊन हे करे आणतात.

करे घरी आणल्यावर आत आणताना ते बाहेरच दारावर आणणाऱ्या बाईचे पाय धुवून व अगरबत्ती दाखवून घरात घेतात व जाणाऱ्यांना सगळ्या बायकांना हळद कुंकू लावून तोंड गोड करून घरी पाठवतात. जेणे करून लग्नाचे प्रत्येक काम गोड व्हावे असे समजायचे.

नवऱ्याच्या घरी आणखी एक काम म्हणजे भाशिंग आणण्याचे हे काम नवऱ्याच्या बहिणीचे असते. ती स्वतः भावासाठी भाशिंग आणते. पण तेव्हा हे भाशिंग लग्नाच्या घरात आणत नसे तर ते गावातल्या थोर घरात नेऊन ठेवायचे व लग्नाच्या दिवशी सकाळी ते वाजत जाऊन यजमान घेऊन घरी यायचे.

ज्याच्या घरात भाशिंग ठेवतात ती सुहासिनी त्या भाशिंगला अबोलीच्या फुलांचे पाच पाच फुले एकत्र बांधून गोंडे करून नवऱ्याच्या भाशिंगला तीन व नवरीच्या भाशिंगला दोन असे गोंडे बांधून मानाने द्यायाचे. हे गोंडे फक्त अबोलीच्या फुलांचे बांधतात आणखी कोणतीही फुले चालत नाही.

लग्नाला आठ दिवस अगोदर एक एक नातेवाईक नवरी मुलीला आपल्याघरी जेवायला नेतात व एक दिवस ठेवून दुसऱ्या दिवशी घरी पाठवतात. पण लग्नाला दोन दिवस अगोदर नवरीमुलीला त्याचा मामा, मामी तिला न्यायला येतात व आपल्या घरी घेऊन जातात व दोन दिवस ठेवून हिरवा चुडा व पायात जोडवे घालून हळदीच्या एक दिवस अगोदर घेऊन येतात. बहिणीच्या मुलीला चुडा घालण्याचा मान फक्त मामाचाच असतो. सक्का मामा नसला

तर चुलत मामा चुडा घालू शकतो. हा मामाचा अधिकार असतो. तेव्हा सारे नातेवाईक चार दिवस अगोदर यायचे व लग्नाच्या कामात मदत करायचे.

लग्न मुलीच्या घरी असल्याने घर, मंडप सजवायचे तेव्हा माडाच्या हिरव्या चूडीताने पुढचा प्रवेश गोलाकाराने सजवायचे. हळदीच्या आदल्या दिवशी गावचे सर्व शेजाऱ्यांना बोलवून 'लामण दिवा' लावायचा  तो लामण दिवा घरातल्या देवाच्या पुढे पेटवून त्याला गंध, फुले, अक्षता व पानाचा विडा ठेवून सांगणे करून नवऱ्याचे आईवडील व नवरा तसेच पाच सुहासिनी घरातून लामण दिवा बाहेर मंडपात लावतात व मंडपाचा मान करतात.

हा दिवा लग्न पूर्ण होईपर्यंत पेटत ठेवतात. मग असते दळण्याची विधी म्हणजे मांडवात साऱ्या बायका चटईवर जाती मांडतात व प्रत्येक जात्याजवळ पाच पाच अशा बायका दळायला बसतात. थोडे थोडे तांदूळ दळतात. त्या सर्व बायकांना यजमाणीन हळदकुंकू लावते व त्या लग्नला दळायला आले म्हणून त्याचा मान करते.

नवऱ्याच्या घरी हळदीच्या दिवशी सगळी घरची मंडळी आंघोळ करून देवपूजा करून घेतात. मग पुरोहिताची वाट पाहतात तेव्हा जास्त तर पुरोहित कुणाकडे जात नसत तेव्हा गावातला कर्ता जाणकार माणूस लग्नाचे कार्य स्वतःहून कसे करायचे ते सांगत असे व करून घेत असे. तुळशी जवळ नवरा व त्याच्या आईवडिलांना बसवायचे त्यापुढे सर्व देवाचे साहित्य ठेवायचे.

सर्व प्रथम गणेश पूजा करायचे व जे काही देवाचे असेल ते काम करायचे. नवऱ्याची आई चांगली नऊवारी नेसून असायची हे काम करताना त्या तिघांच्या हातात हळकुंड बांधायचे म्हणजे नवऱ्याला आणि आई वडिलांच्या हातात बांधतात .असे म्हणतात की, लग्नात नवऱ्याला छान छान कपडे घालावे लागते हळद लागलेली असते. त्याचा तोंडावर वेगळेच तेज असते व त्यासाठी त्याला दृष्ट लागू नये म्हणून हे हळकुंड त्याच्या हातात बांधतात.

लग्न होईपर्यंत ते तसेच ठेवतात. तुळशी जवळ अंगणात पुरोहिताचे देवकार्य झाले की मुलगा हा नवऱ्याच्या स्वरूपात होतो. मग त्याच्या हातून लग्नाचे प्रत्येक कार्य करून घ्यावे लागते.

सर्व प्रथम हळदीची विधी सुरु करण्यापूर्वी पुरोहित कुळ पूजन करतो . कुळ म्हणजे बांबूची घेऊन ठेवलेली दाली त्यात एक नारळ, तांदूळ, तांबडा कपडा, पाच पानाचा विडा, पाच केळी व त्याला हळदपिंजर लावून देवाजवळ ठेवतात. समोर एक पेटता दिवा ठेवतात. त्यात एक कलमाची फांदी पण असते हा घरच्या देवाचा मान असतो. हे काम यजमान करतो.

नंतर पुरोहित नवऱ्याच्या मामाला घराच्या दाराजवळ एक आंब्याची व एक सावरीची लांब फांदी रोवतात . हे काम मामा करतो तेव्हा घरातल्या बायका गंमत म्हणून त्याला पूर्ण तेलाने आंघोळ घालतात मग नवऱ्याच्या भावोजीने नवऱ्याची दाडी करण्याची रीत असते. त्याला 'रेग धरणे' म्हणतात. मग पुरोहित मातीचे दहा गोळे करून त्यावर केळ्याचे एक काप व पेटती कापसाची वात ठेवायला सांगतो व ते दहा गोळे मामाने रोवलेल्या सावरकांड्या जवळ ठेवतात.  बाकीचे पाच हळदीचे जेवण करण्यासाठी मांडलेल्या चुलीकडे ठेवायला सांगतो व चुलीत आग करायला सांगतो मग त्यावर हळदीचे जेवण बनवले जाते .

त्यानंतर  सर्व प्रथम घरची ओटी म्हणजे घरातली जी ओटी सासू असेल तर नाही तर चुलत सासू असेल तर पाच नारळाने नवऱ्याच्या आईची ओटी भरते व खण पीस देते व आई वडिलांना तांदूळ लावते. नवऱ्याला सुद्धा पिंजर तांदूळ लावते. त्यावेळी नवरा एकटा असायचा म्हणून त्याच्यासाठी एक दुसरा लहान मुलगा त्याच्या शेजारी बसवायचे व मुलगी असेल तर मुलीच्या बाजूला मुलगी बसवायचे व त्या तिघांबरोबर त्यांचा 'धेडी' म्हणून मान  करतात.

घरची ओटी भरून झाली की मग नवऱ्यच्या आईच्या माहेरची ओटी असायची. तिची आई नाही तर वहिनी पाच नारळाने ओटी भरायची. त्यानंतर एक एक करून सर्व गावातल्या बायका ओट्या भरायच्या. असे म्हणतात की मुले झाले की आई वडिलांना त्याच्या जन्माच्या वेळी व नंतर मुलाच्या लग्नात त्यांच्या मान मिळतो व मुलांना जन्माला आणण्याचे सार्थक झाले असे आई वडिलांना वाटते. हा दोन्ही वेळेचा मान ज्या आई वडिलांना मिळाला ते भाग्यवान आई वडील असे समजतात.

इथेच हळदीच्या वेळी पुरोहित नवऱ्याच्या बहिणीला बोलवून पाच कऱ्या मधला एक करा मान करून यात हळद, पिंजर, फुले, तांदूळ व पानाचा विडा घालून कऱ्याच्या वरती तोंडावर नारळ ठेवतो व त्याची पूजा करून नवरीच्या बहिणीच्या हातात देतो म्हणजे करवलीच्या हातात देतो.

लग्नाचा हा पहिला मानाचा करा बहिणीला देतात. म्हणून तिला करवली म्हणतात व तिचा हा मान ती मोठ्या आनंदाने स्वीकारते. हा मान आपल्याला दिला व तो असाच घेतला जाऊ नये तीने पुरोहितला स्वखुशीने आपल्याकडे जमेल ती दक्षिणा द्यायची असते व पाया पडून हा करा घेते.

नवऱ्याची बहीण करवली म्हणून मिरवत असते. नंतर हळद लावण्यासाठी हळद एका ताटात कालवतात व एक लांब काठीच्या टोकाला पाच आंब्याची पाने बांधतात व हीच काठी हळद लावायला वापरतात. सर्व प्रथम यजमान व नवरा दोघे मिळून कुळाला पाच वेळा हळद लावतात मग दाराजवळ रोवलेली खांबलीला हळद लावतात. मगच नवऱ्याला हळद लावतात व सर्वजण नवऱ्याला हळद लावून सगळी मिळून विहिरीवर करे भरायला जातात.

नंतर हळद लावलेल्या नवऱ्याला आंघोळीसाठी नेतात. तेव्हा अंघोळीसाठी चार दिण्याच्या काट्या रोवतात व पांढरे सुत चारही काट्याना बांधून चौरंग तयार करतात व त्याला माटुली असे म्हणतात व दुसरीकडे दिण्याच्याच काठ्याने त्रिकोण तयार करतात. त्रिकोणाच्या वरती एक नारळ, पानाचा विडा व सुटे पैसे नवऱ्याची नखे व एक केस असे एक पोटली बांधून वर ठेवतात. प्रथम त्या त्रिकोणात नवऱ्याला बसवतात व आई तांदूळ व वडील कऱ्यातले पाणी घालतात व पाच वेळा फिरतात व नंतर ते त्रिकोण कोयत्याने उघडून टाकतात व नवऱ्याला माटोळीत बसवतात त्यात नवऱ्याची बहीण व असलेली नातेवाईक एक एक तांबे पाणी घालतात व नवऱ्याला आंघोळ घालतात.

आंघोळ झाल्यावर नवऱ्याचा मामा नवऱ्याला नारळ व विडा देऊन माटोळीतून हात धरून बाहेर काढतो. तेव्हा नवरा मामाला आहेर म्हणून कपडा नाही तर टॉवेल देतो. असे करून मामा नवऱ्याला घरात आणतो. घरात येत असताना दारात बायका दारावर टॉवेलाचा अंतरपाट धरतात व नवऱ्याला विचारतात की निम केला? मग नवरा सांगतो आई वडिलांच्या पुण्याईने निम केला. नंतर नवऱ्याला आत घेतात. आत येऊन कपडे घालून नंतर नवरा व मामाला दोघांना गोड काही खायला देतात. मग नवऱ्याला केळवण करतात घरातली सर्व मंडळी नातेवाईक आपण आणलेले काही गोड पदार्थ पानावर ठेवतात व नवऱ्याच्या बाजूला धेडा बसवतात व नवरा पाहिजे ते खातो आणि बाकीचे सर्वांना वाटले जाते व हळदीचे जेवण करून आपल्या घरी जातात.

नवरीकडे मात्र तसे नसते. नवरीकडे नवऱ्याकडून साडी दिली जाते त्याला 'फुलसाडी' म्हणतात. नवऱ्याकडची उष्टी हळद आल्याशिवाय एकही रीत होत नाही . नवऱ्याकडची साडी आली की नवरीला केळीच्या पानावर तांदूळ पसरवतात व तिला त्यावर उभी करून साडी नेसवतात व तिच्या हाताने लामण दिवा लावणे, जाती मांडणे, देवकार्य सर्व नवऱ्याने पाठवून दिलेल्या साडी नेसून केले जाते. नवऱ्याची उष्टी हळद लावून नवऱ्याकडे ज्याप्रमाणे रीत असते त्याच पद्धतीने केले जाते.

लग्नाच्या दिवशी नवऱ्याच्या घरात नवरा लग्नाला जायला तयारी करतो. घरातले यजमान व चार पाच जण मिळून वाजत भाशिंग आणायला जातात व तयार करून ठेवलेले भाशिंग घेऊन येतात. नवऱ्याला

नवीन कपडे घालून डोक्यावर फेटा बांधतात, हातात एक नारळ व सुरीला सुपारी टोचून कपड्यात गुंडाळून तयार करतात. त्याला 'बाक 'असे म्हणतात तो बाक नवऱ्याच्या हातात देतात. तसेत नवऱ्याला दृष्ट लागू नये म्हणून नवऱ्याच्या गालाला लाल व काळा टिळा लावतात.

नंतर नवरा व सगळे लोक छान तयार होतात व लग्नाला निघतात. नवऱ्याची बहीण करेवाली आपला करा घेऊन नवऱ्या सोबतच असते. नवरा गाडीत बसण्या आदी गावच्या देवळात जाऊन देवीचा आशीर्वाद घेतात तसेच जी जाणती माणसे जी लग्नाला येत नाही जमत नाही त्यांना न चुकता पाया पडून आशीर्वाद घेतो व लग्नाला निघतात. घरात कुळ पूजून ठेवल्या कारणाने घराला कुलूप लावत नाही एक दोन माणसे घरात राहतात दार बंद  करत नाही. नवरा नवरीच्या गावात पोहचला की तो नवरीच्या गावात जिथे त्यांच्यासाठी आधीच तयार ठेवलेल्या घरात उतरतात. तिथेच त्यांना चहा - पाणी असते.  सगळे वराती तिथे थोडा वेळ बसतात. लग्नाचा मुहूर्त जवळ आल्यावर नवऱ्याची वरात मुलीच्या घरी येते.

नवरा दारात आला की नवरीचे आई वडील बाहेरच नवऱ्याचे पाय धुतात त्याला गंध लावून भाकरीचा तुकडा ओवाळून आत घेतात. आत  घेताना नवऱ्याला लामण दिवा पेटवून हातात धरून आई व वडील आत आणतात व पाठावर बसवतात. मग नवरीला बोलवतात नवरीला लग्नाला जाण्यापूर्वी घरात आई ओटी भरते व ती ओटी ती कपड्यात गुंडाळून पोटाला बांधली जाते व लग्न होई पर्यंत ही ओटी अशीच ठेवतात व भरलेल्या ओटीने लग्न  लागते. नंतर नवरी मांडवात येते आणि पुरोहित मंगलअष्टका सुरु करून लग्न लावतो . लग्नाच्या वेळी नवऱ्याचा मामा आणि नवरीचा मामा त्यांचा पाठीमागे बांबूचा टोपली त्याला ' यरवाण' असे म्हणतात ते घेऊन उभे राहतात. नंतर दोघेजण ऐकमेकांना ओवळीच्या फुलांची माळा घालतात.  नंतर कागदाचे हार घालायचे. तेव्हा कागदाचे हार घालत असे त्यामुळे मुद्दाम ओवळीच्या फुलांची माळा घालायची व त्याला वास चांगला यायचा व ते फुल देवाला पण चालते म्हणून ही माळा न चुकता घालतात. अजूनही कोणत्याही फुलांचा हार घालतात पूर्वीची प्रथा म्हणून ही ओवळीची माळा अजूनही घालतात.

फुलांचे हार नवरीकडूनच असतात. नवरी कडचेच वरमाळा घेऊन येते. हार घातले की मंगळसूत्र घालतात व दोघांना बसवतात नंतर नवऱ्याची आई पुढे येऊन असलेली ओटी सोडून नव्याने पाच नारळाची

सुनेची ओटी भरते. नंतर तिने नवऱ्याकडून आणलेला नवा शालू देते. शालू घेऊन नवरी नवा शालू नेसायला आत जाते तो पर्यंत नवरीकडचे सात शृंगार न्यायला येतात. तेव्हा त्यांना काही कपडे नाही आवडले तर ती परत करतात व करायचेनव्याने. काही कपडे मागतात.

त्यानंतर शालू नेसून बाहेर येते व येताना ओटीतला एक नारळ तसाच पोटाला बांधलेला असतो. त्यानंतर बाकीची विधी होतात.

अग्नीसमोर सात फेरे असतातफेऱ्यासाठी. होम घालतात त्या होमासाठी जी आग असते ती आग नवऱ्याची बहीण पेटवते. मग नवरीचा पदर आणि नवऱ्याचा शाल घेऊन नवऱ्याची बहीण गठबंधन करते. नवरी व नवरा सात फेरे घेतात व आई वडील मुलीचे कन्यादान करतात. त्यानंतर होमकांडात नवरीचा भाऊ लाया म्हणजे 'लाहयो' घातल्या जातात. नवरा त्याला आहेर देतो . असे सर्व विधी करून लग्न होते नंतर जेवण जेवतात. तेव्हा लग्नात पत्रावळीची पंगत असायची व लोक आवडीने सर्वांना जेवण वाढतात.

नंतर असते ते पाच पर्तवन त्याला आमच्या गावात ' हातीबोटी ' असे म्हणतात. तेव्हा लोक तिथल्या तिथेच मंडपात नवरा नवरी व त्याच्या बरोबर पाच जण असायचे ते मुलीच्या घरात जायचे व घरचे त्यांना काही गोड देतात व नवऱ्या नवरीची ओटी भरायची आणि आलेल्या माणसाना आहेर द्यायचे. नंतर सर्व लोक व नवरा नवरीचे जेवण झाल्यावर त्यांना जाण्यासाठी निरोप घ्यायचे.

तेव्हा नवरीकडचा कोणी गावचा माणूस नवऱ्याला व त्याच्या आई वडिलांना व त्याच्या घरच्यांना बोलवून सांगायचे की आपली मुलगी तुमच्या घरात दिली त्याच्या कडुन काही चूक झाली तर तिला माफ करा, तिला सांभाळा, तिची काळजी घ्या असे सांगायचे. हे ऐकून नवरी खूप रडायची व निरोप घायची.

ती निघत असताना तिच्या बरोबर पाठराखीण म्हणून छोटी बहीण किंवा नातेवाईकाला पाठवायचे. नाचत वाजवत वरात निघायची. नवरीला सोडायला नवरीचे आई वडील नातेवाईक व शेजारी त्याचा सोबत नवऱ्याच्या घरी जायचे. नवऱ्याच्या घरी पोहचल्यावर सर्व प्रथम वरात व सगळे लोक मंडपाच्या दारात थांबायचे. नवऱ्याची आई भरलेली दुड म्हणजे एक मोठा कळसा व कळशी घेऊन दोघांच्या पायावर ओततात.

भाकरीचा तुकडा ओवळायचे व दारात एक ओटी भरायची व लामण दिवा पेटवून घरात घ्यायची म्हणजे घरात प्रवेश करते आणि तीला देवघरात घेऊन जायची.

नंतर सगळे नवरीकडचे लोक पण घरात यायची घर लहान असल्यामुळे घरात सगळयांची गर्दी व्हायची. सगळयांना घरी बसवून चहा आणि फराळ द्यायचेआत. नवऱ्या व नवरीला नेले की देवाला नमस्कार करायचा व तेव्हा एक छोट्या प्लेट म्हणजे 'बशी' मध्ये खोबऱ्याचे तेल व त्यात खायचे पान ठेवायचे व ते पान नवरीकडे द्यायचे. नवऱ्याचा वडील पुढे येऊन आपल्या घरातल्या प्रत्येकाची ओळख करून सुनेला द्यायचे तशी नवरी प्रत्येकाच्या हातात ते पानाने तेल लावायची व नमस्कार करायची.

घरातले तसेच नातेवाईकांची पान ओळख करून द्यायची. नंतर नवऱ्याचे आई वडील व नवरा नवरी घरात असलेली धान्य किंवा भाताचे पोते ठेवून त्याच्यावर बसायचे त्याला ' कड्यामुड्यार' असे म्हटले जाते. त्या पोत्यावर आई वडील मागे बसायचे व सून व मुलगा पुढे बसायचे. पुढ्यात एक टॉवेल ची घडी करून पाण्याने भरलेला तांबा ठेवायचे. त्यात काही सुटे पैसे ठेवायचे व सुनेला त्यात हात घालायला लावायचे व जे पैसे मिळतील ते काढून सासूला द्यायचे असे पाच वेळा करायचे व शेवटी ते पैसे सासू सुनेला द्यायची हा खेळ सुंदर  असायचा नंतर त्या दोघांना बाहेर मांडवात आणायचे व नवरी मुलीच्या घरच्यांना जाण्यासाठी भेट करायचे.

घरी नवरा नवरी आत येताना सगळे लोक नवऱ्याच्या घरी यायचे. पण नवरीचे आई वडील मात्र दुसऱ्या कुणाच्या घरी थांबायचे ते जावयाकडे येत नसत. नंतर त्यांना वाजत जाऊव नवऱ्याचे आई वडील मानाने घरी बोलवायचे व घरी त्याचा खास मान करून त्यांना मुलीला भेटून पाठवायचे. त्यांना आणल्याशिवाय ते नवऱ्याकडे येत नसत. अशी सर्व मंडळी नवरीला भेटून घरी जातात.

रात्री सगळे मुलीकडचे घरी गेल्यावर सगळे दीर व शेजाऱ्याचे मुलगे जेवायला बसतात. त्यांना मांडवात चार पाच पत्रावळी एकत्र करून जेवायला बसवतात व नवरीला वाढायला लावतात. त्याला दिरांचे जेवण म्हणतात. जेवायला बसतात तेव्हा बाकीचे लोक गंमत म्हणून त्यांच्या जेवणात मीठ मध्येच सोजी, झाडाची पाने जेवणात टाकतात व त्यांना जेवायला देत नाही अशी ही गमंत करून नंतर सर्व लोक जेवण करून

घरी जातात. गावात एकाच्या घरी लग्न असले की गावातले सगळे लोक एकमेकांच्या घरी जातात व लग्नाचे सर्व कार्य पूर्ण होईपर्यंत राहतात.

नंतर नवऱ्याच्या घरी भाशिंग सोडवायचे पण भाशिंग सोडवत असताना नवऱ्याने व नवरीने ऐकमेकांच्या भाशिंगाला हात लावायचा असतो. पूर्वी हा असा प्रकार लग्नाच्या रात्री नवऱ्याच्या घरी दोघेजण न राहता शेजारीच्या घरी राहायचे त्याला वार्शी असे म्हणतात. ती रात्र तिथे काढली की दुसऱ्या दिवशी सकाळी चहा नास्ता करून त्या दोघांना तुळशी जवळ बसवायचे व अंगठी शोधणे हा खेळ खेळला जातो. खेळ खेळताना बाकीचे सर्व गावातले ऐकमेकांना पाण्याने भिजवतात या प्रकारला 'खळमळ' असे म्हटले जाते. अशा तरेने खेळ खेळायचे व मजा करतात. नंतर नवऱ्या व नवरीला आंघोळ करायला द्यायचे व सर्व लोक आंघोळ करून कपडे बदलून नवरी नवऱ्याला घरी पोहचवण्यासाठी तयार करायची. तेव्हा बांबूची व माडाच्या चुडिताची एक होडी तयार करतात व त्या होडीत परत भाशिंग व हार, तुरे घेऊन होडीत बसवायचे व त्यात काही नातेवाईक किंवा शेजारी तिला पोहचवायला एकजण डोक्यावर पाठला घेतो व त्यात काही फणस व बाकीची फळे घालतात. ही होडी पायाने व हाताने हलवत, डुलवत मस्करी करत संध्याकाळ होते. घरी पोहचल्यावर आणखी एक रीत म्हणजे दार फोडणे. तेव्हा नवऱ्याची बहीण दार धरून अडवायची गावातले काही लोक बहिणीच्या बाजूने दार घट्ट धरून उभे राहतात. तर कोणी नवऱ्याच्या बाजूने उभे राहतात व नवऱ्याला आत प्रवेश करण्यासाठी देत नाही ऐकमेकांना ढकलत व जोर लावून नवरा नवरीला सोबत घेऊन आत प्रवेश करतो. असा हा खेळ खेळळा जातो. अशा प्रकारे पूर्वी लग्न करण्याची पद्धत होती.

### ३.६ लग्न विधीचे बदलते स्वरूप

लग्नगीताचा स्वरुपाचा विचार केला तर पूर्वीचे लग्न आणि आताचे लग्नात खूप बदल दिसून येतात. स्वरूप बदलेले आहे. पूर्वी लग्न गीतांच्या निमित्ताने विधी, परंपरा आपल्या लक्षात येते. जरी आता ती विधी करत असली तरी त्यात खूप बदल दिसून येतो.

लग्नातील पहिली विधी म्हणजे माटवात लामण दिवा लावणे. याचे महत्व म्हणजे माटवाला मान देणे. ज्या प्रमाणे दिवा प्रकाश देतो तर असाच प्रकाश आपल्या या लग्न घरात व कार्यात पडो व संपूर्ण लग्नकार्य प्रकाशमय होऊ या समजुती मुळे माटवात दिवा लावला जातो.

दुसरी विधी म्हणजे 'जाते मांडणे' ही विधी करत असताना पाच बायका एकत्रित येऊन मिळून हळदीच्या आदल्या दिवशी करतात. पूर्वी पीठ दळण्यासाठी वैगरे गिरण नव्हती त्यामुळे जात्याचा वापर करत होते. भात, तांदूळ जात्यावर दळायचे. पूर्वी गावातील लोक शेती करायचे पीठाची वैगरे गिरणी नसायची तर जात्याच्या मदतीमुळे करत होते. दळत असताना ओवी गात असत. पूर्वी प्रत्येकाच्या घरी जाते असायचे परंतु आता आधुनिक काळात जास्तप्रकारे जाती दिसून येत नाही.

पूर्वी साखरपुड्या दिवशी फक्त देवासमोर गाराणे घालून तुळशी पुढे नवरीला आणि नवऱ्याला पुढे उभे करून त्यांचे गाराणे घालून नारळ फोडायचे व नारळाचे शिरनी करून त्यात साखर घालून सर्वांना वाटायची यालाच महत्व होते व झेपेल तो माणूस अंगठी घालायचा इतकेच होते. परंतु कालांतराने ताटात साखर घातली जायची व त्या मध्ये अंगठी ठेवायचे व ते ताट नवरीची बहीण आणि नवऱ्याची बहीण ते साखरीचे ताट घेऊन दोघांच्या हातावर ओतायचे व अंगठी घालायचे. परंतु आता या विधिला पूर्णपणे नवे रूप लाभलेले आहे. नवरीच्या व नवऱ्याच्या बाजूने साखरीचापुडा हा थर्मकोल, कागदाचे वेगवेगळया प्रकारचे पुडे तयार करून आणतात. काहीजण साखपुड्याला केक कापतात पण आपल्या संस्कृतीत केक कापणे वैगरे नाही परंतु आता ते करतात.

पूर्वीच्या वेळी मेथी वैगरे जास्ततर घालत नसे घातलीच तर पूर्वी लोक त्या मेथिच्या झाडाची पाने काडून फातरीवर वाटायची व घरातील एक बाई आपल्या हाताच्या बोटाने नवरीच्या हातावर जमेल त्या पद्धतीने मेथी घालायची. कालांतराने मेथीचे कोन बाजारात येऊ लागले त्याचा वापर करू लागले. फातरीवर वाटलेली मेथीचा रंग छान यायचा. आता मेथी घालण्यासाठी बाहेरून बोलवतात त्याचे काहीच गरज नसते आपण त्याच्यावर पैसे खर्च करतो. आता मेहेंदीचा कार्यक्रम ठेवतात. नवरीच्या घरी मेथी साजरी करतात

त्याला ' संगीत' म्हणतात खूप नाचतात, फोटो काढतात आपला वेळ नको त्या गोष्टीवर खर्च करतात व महत्वाच्या गोष्टीवर दुर्लक्ष करतात.

हळद ही विधी खूप महत्वाची मानली जाते . हळद ही औषधी असते. तोंडावर डाग, पुळया वैगरे असेल तर हळद लावल्याने थोड्या प्रमाणात जातात व एक सुंदर तेज चेहऱ्यावर येतो व सुंदर दिसण्यासाठी हळद लावली जाते. पूर्वीच्या वेळी मेकअप नव्हता तर त्याचे काम हे हळद लावल्याने व्हायचे परंतु. आता हळदीच्या दिवशी सुंदर सजावट केली जाते. नवरी असेल तर ती पिवळया रंगाचे कपडे घालून फुलांनी गुंतलेली माळा आणि बाकीचे दागिने घालायचे. एक फॅशन म्हणून आता प्लास्टिक फुलांचे दागिने घातले जाते . हळद लावल्या नंतर पूर्वी त्यांना आंघोळ घालण्यासाठी दिण्याच्या काठ्याचा चौवरंग करून त्यामध्ये आंघोळ घालायची व याला महत्वाची विधी मनाली जायची ' निंब करणे" असे म्हणतात. तीच आंघोळ घालण्यासाठी आता मंडपात एक मोठा सजवलेला कमळा सारखा तोप असतो त्यात त्यांना बसवतात हळद लावतात व तिथेच आंघोळ घातली जाते.

पूर्वीची रीत आता दिसून येत नाही पूर्वी कऱ्यामध्ये पाणी घालून आई वडील त्या चौवरंगच्या बाहेर फेरे मारत कऱ्यातले पाणी नवऱ्यावर किंवा नवरीवर घातले जाते. पण आता कळशी घेऊन त्यात पाणी घालून गुलाबाच्या पाखळया घातल्या जातात व त्या  पाण्याने त्यांना आंघोळ घातली जाते. ही विधी कुठेतरी कमी झालेली दिसून येते. हळदीच्या दिवशीचे जेवण करण्यासाठी शेजारी आवर्जून येत असे जेवण करायला मदत करायला येत असे. ऐकमेकांच्या घरी जायचे व त्यामुळे गावात शेजारीचे ऐकमेकांशी नातं चांगले असायचे. त्यानिमित्ताने ऐकमेकांच्या घरी येणे जाणे व भेट होत असे. सर्वाना एकत्र आणण्याचे काम हे लग्न सोहळा करत असतो. आताच्या काळात जेवण घरात न करतात बाहेरून मागवतात व नवीन नवीन पदार्थ बनवतात. काही लोकांना आवडते तर काहींना आवडत नाही काही जण नवीन पदार्थ म्हणून घेतात आणि टाकतात. पैसे आहे म्हणून खर्च करतात. परंतु बाहेरून मागवलेल्या जेवणाला पूर्वीची चव मात्र असलेली दिसत नाही. काहीजण आपल्याकडे किती पैसा आहे व दुसऱ्याशी स्पर्धा करण्यासाठी नको त्या गोष्टीवर पैसे खर्च करत असतो.

त्याचप्रमाणे 'हॉल' म्हणजे मंडप पूर्वी लग्न नवरीच्या घरातच केली जायची. आताच्या काळात लग्न म्हणजे मोठा सोहळा झाला आहे. ऐकमेकांकडे स्पर्धा  केली जाते. मंडपाची सजावट मोठ्या प्रमाणात करतात. फोटो काढण्यासाठी हॉल मध्ये स्पेशल जागा केलेली असते त्या जागेवर सायकल, बुलेट , फ्रेम वैगरे ठेवतात. मग नातेवाईक त्याच्यावर बसून फोटो काढतात.

त्यानंतर आता हॉल मध्ये संगीतकारांना बोलावले जाते व अनेक प्रकारची गाणे गातात, डान्स करतात. या अशा नको असलेल्या गोष्टीला आजकाल लोकांनी जास्त महत्व दिले आहे.

पूर्वी नवरी लग्नाला कापड नेसायची व नवरा बंडी व धोतर नेसायचा व पायात कोल्हापुरी चप्पल घालायचा एकदम विठ्ठल रुक्मिणी सारखी जोडी दिसायची. आता नवरा शेरवानी, सूट व पायात बूट घालतो. नवरी साडी, शालू, लेहेंगा, घालतात. आपल्या संस्कृतीत अशी एक रीत आहे की कोणती ही विधी किंवा पूजा असली कीं स्त्रीया कापड नेसते आणि पुरुष धोतर नेसतो. छान दिसायची आपली संस्कृती, परंपरा जपत होती. पूर्वीच्या कपड्यावरून त्याना जे एक तेज यायचे ते तेज आताच्या कपड्यावरून तितके दिसत नाही किंवा जाणवत नाही.

लग्न सोहळा हा पवित्र विधी व बंधनात येण्याचा व सर्वांना एकत्रित करण्याचा हा सोहळा आहे. त्याला मनोरंजन म्हणून काही समजतात किंवा समजू नये. यावरून लक्षात येते की नवीन पद्धती करतात तर काही पूर्वीची विधी नष्ट होताना दिसतात तर काही नवीन विधीचा समावेश झालेला दिसून येते.

आजचा काळ झालाच तसा आहे आपणच नवीन पद्धती करतो, नको त्या गोष्टीवर पैसे खर्च करणे सुरु केले आहे व याच्या नादात आपण मूळ परंपरा, विधी कुठेतरी विसरत आहे. लग्नगीते जास्त ऐकायला मिळत नाही.

लग्न म्हणजे अग्नीला साक्षी मानून पवित्र बंधनात बांधले जातात. कशा प्रकारे केले जाते हे आपण पाहिले पाहिजे आणि येणाऱ्या पिढीला कळण्यासाठी टिकवण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. नाही तर पुढे लोक आपल्याला हव्या त्या पद्धतीने लग्न लावणार पण मूळ विधी व त्याचे महत्व काय आहे हे समजणार नाही. बदल होणे म्हणजे वाईट नाही चांगले आहे परंतु त्याच बरोबर आपण सर्वांनी आपली संस्कृती, परंपरा,

लग्नगीते, ओवी या सारखे विधी जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लग्न हे मनोरंजन नसून पवित्र बंधन आहे आपण सर्व देवताचा मान सम्मान करून लग्न करतो त्याला महत्व दिले पाहिजे व हे लक्षात आपण ठेवले पाहिजे.

**३.७ लग्न गीतांचे महत्व**

१. लग्न म्हणजे हे हिंदू धर्मातील वेदानुसार १६ वा संस्कार मानला जातो. त्यातील लग्न हा १६ वा संस्कार मानला जातो. लग्नात केली जाणारी प्रत्येक विधिला महत्व दिले जाते.

२. लग्नात होणाऱ्या प्रत्येक विधी ही आपल्या प्रत्येकाच्या लक्षात राहण्यासाठी लग्न गीत महत्वाची ठरते.

३. पूर्वीची प्रथा कशाप्रकारे होती, असायची हे लग्न गीतांच्या माध्यमातून लक्षात येते.

४. विधीचे क्रम समजण्यासाठी लग्न गीते महत्वाची ठरतात. देव दैवतांना समजून घेण्यासाठी लग्न गीत महत्वाची ठरतात.

५. नात्यांचा मान, सन्मान करते व सर्वांना एकत्रित ठेवण्यासाठी महत्वाची ठरते व भाषिक स्वरूप समजून घेण्यासाठी महत्वाचे ठरते.

६. समाज संरचना कशी होती हे या लग्न गीताच्या माध्यमातून समजते त्यामुळे लग्न गीत महत्वाची ठरतात.

**३. ८ लग्न गीतांचा आशयनिष्ठ अभ्यास**

**१. लग्न गीतातील देवदेवतांचे आदरपूर्वक उल्लेख**

**उदा. पाच पुडाची सामळी बत्तीस पाना विडो**

**पयलो विडो थेया धर्तरी मातेकी**

**दुसरो विडो थेया केळबायी आईक**

**तिसरो विडो थेया महादेवा देवाक**

लग्न या विधिला महत्व असते व आपल्या हिंदू धर्मात कोणतेही कार्य करण्याआधी देवतांचे पूजन केले जाते. देवतांना सर्वप्रथम आपण आठवण करून कोणत्याही कार्याला सुरवात करतात. हे आपल्याला या लग्न गीताच्या माध्यमातून समजते. उदा. जात्यावरची गीत या गीतातून हे स्पष्ट होते की , ज्याप्रमाणे माणसांना बोलवले जाते त्याचप्रमाणे देवांनाही आमंत्रण दिले जाते. आमंत्रण देत असताना 'पान' आणि 'विडा' याला हिंदू धर्मात महत्व दिला जातो'. पान' व 'विडा' यांना देवाचे रूप मानून देवाला ठेवला जातो. सर्वप्रथम धर्तरी मातेला ठेवला जातो. म्हणजे आपण जिथे राहतो ज्या जमनीवर भूमीवर त्याला आदी मान दिला जातो. त्याचप्रमाणे देवी केळबायी, शांतादुर्गा देवी, महादेव त्याचप्रमाणे महादेवाची गवरीणी किंवा गौरी म्हणजे पार्वती , गिरीजा देवी, सीता इत्यादी अशा देवांची नावे घेऊन त्यांना मान दिला जातो. अशा या गीतातून दैवतांचा उल्लेख सापडतो.

### ३.८.१ लग्न गीतांच्या माध्यमातून दिसून येणारे अन्न विषयक उल्लेख

**२. उदा. साळी दाळीचे तानूळ**

**मुगाचे वरण**

**थोराचा जेवाण आमच्या भावोजीचे**..

लग्न गीताच्या माध्यमातून उदा. 'केळवण', ' दीर जेवण' या गीतातून अन्नाचा उल्लेख सापडतो. पूर्वी केळवण या विधित अनेक फळे नवऱ्याच्या ताटात ठेवायची त्यात आंबा, चिकू, केळी, गोड पदार्थ पेढे व लाडू इत्यादी. आता केळवण या विधित फळे, गुलाब जामून, पेढे, चिवडा, बिस्कीट अनेक प्रकारचे पदार्थ ताटात ठेवतात. दीर जेवण या गीतावरून अन्न विषयी स्पष्ट होते. साळी दाळीचे तांदूळ, मुगाचे वरण किंवा मुगाचे गोड त्याला 'गोडशे' म्हटले जाते ते करतात जास्त प्रमाणात 'सोजी' केली जाते. गव्हाचा कण त्याचे पीठ दळून त्याची सोजी करायचे. पूर्वी लोक शेती करत होती तर गहू वैगरे असायचे व जात्यावरील दळायचे. त्यानंतर तांदुळाचे बारीक कण असतात त्याला 'कणियो' म्हणतात तर त्याचे पीठ दळतात व त्या पिठाचे वडे करतात. त्याला 'तांदळाचे पीठ' असे म्हणतात. तांदुळाच्या पिठाच्या भाकऱ्या किंवा वडे पूर्वी लोक खायचे त्यामुळे त्यांचे आरोग्य ही चांगले असायचे. लग्नाच्या निमित्ताने का होहीना आपल्याला अनेक अन्नाचा

परिचय होतो तसेच चव घ्यायला मिळते. असा अन्नाचा उल्लेख लग्न गीतात आल्यामुळे आपल्या लक्षात येते.

**३.८.२ लग्न गीताच्या माध्यमातून कपड्यांचा परिचय**

**३. उदा. गिरजा गोरी जाताना दोशी दोन बाजार**

**आम्हा लागी गराज व्हाणाची**

**गिरजा गोरी जाताना दोशी दोन बाजार**

**आम्हा लागी गराज पैरिगेची**

**गिरजा गोरी जाताना दोशी दोन बाजार**

**आम्हा लागी गराज पाघड्याची..**

पूर्वी नवरा सूट, बूट न घालता चप्पल घालायचा त्याचा उल्लेख लग्न गीतात 'व्हाण'असा केला आहे. शाल व डोक्यावर पगडी घालायचे या लग्न गीतामुळे आपल्याला पूर्वीचे कपडे व त्यांना काय म्हणायचे याच उल्लेख सापडतो.

**३.८.३ लग्न गीतातील चित्रमय शैली**

**१. हळद लावताना**

नवऱ्याला तुळशीपुढे बसवले जाते व त्याला कुंकू आणि तांदूळ लावून त्याला काही आहेर दिले जातात व  नंतर पाचजण बायका एकत्र जमुन एका काठीला आंब्याची पाच पाने बांधून हळदीच्या ताटात बुडवून नवऱ्याला किंवा नवरीला लावली जाते नवऱ्याला. हळद लावताना खूप मज्जा केली जाते. नवऱ्याला मानाने पाच जणांनी हळद लावल्यानंतर सर्व लोक त्याचे मित्र वैगरे एकदम हळद लावतात. तोंडाला वैगरे लावली जाते. मस्करी केली जाते त्यानंतर घरातील प्रत्येकाला हळद लावली जाते. एक गंमत असते ती म्हणजे त्या घरात जर आणखी कोणी लग्नाचा झाला असेल तर त्याची पाठ सोडत नाही. त्यालाच जास्त हळदीत

बुडवतात. काहीजण आपल्याला हळद लावू नये म्हणून घरात लपून बसतात परंतु त्यांना घरात जाऊन  शोधून काढून

हळद लावली जाते. त्यानंतर प्रत्येकाला पाण्याने भिजवतात व नाचतात व मज्जा करत सगळ्यांची मस्करी करत करत हळद लावतात व त्यामुळे वातावरण एकदम छान होते

**उदा  .नक्षी तेल चढईल**

**मस्तकी तेल चढईल, चढईल राया रोहिणी**

**म्हादेवाच्या  गवरीणी**

आजच्या  काळात लोकांना आपल्या नोकरीच्या व्यापामुळे ऐकमेकांसाठी भेटायला मज्जा करायला वेळ नसतो. पण लग्नामुळे हे शक्य होते व मन मोकळे पणाने हळद ही विधी केली जाते.

**२.   दीर जेवण**

लग्नाच्या रात्री हा खेळ खेळला जातो. या खेळात नवीन आलेली नवरीची खोडी काढली जाते. जितके नवऱ्याचे भाऊ असतील म्हणजे सक्खे किंवा चुलत व सर्वजण एकत्र जमतात अंगणात बसतात पूर्णपणे जमीनीवर न बसता अर्ध्या पायावर (दिमियानी) म्हटले जाते. तर अशा प्रकारे ते बसतात. त्यांच्या समोर पत्रावळी ठेवल्या जातात व घरात जे काही जेवण असेल किंवा शिळे जेवण असेल तर ते त्यांना वाढले जाते व ते दीर असतात ते अशाप्रकारे जेवतात कीं काय सांगू किती दिवसापासून जेवले नाही किंवा जेवण मिळाले नाही अशा प्रकारे जेवतात. 'दीर जेवण' या लग्न गीतात त्यांना कोंबड्याची उपमा दिली आहे .कोंबड्यासारखे जेवतात असे.

**उदा. दीर जेईता...**

**कोमे.. कोमे**

**दीर जेईता...**

**कोमे.. कोमे..**

**वनी वाढीता थेमे थेमे..**

नवरी जी त्यांची वनी म्हणजे ' वहिनी 'असते ती दिरांना वाढत असते त्यावेळी तिची नवऱ्या समोर खोड काढली जाते. आम्ही जेवतात आणि वहिनीने कसले जेवण वाढले आहे. शिळे वैगरे त्यानंतर एक मज्जा म्हणून काही नातेवाईक त्याच्या जेवणात पाणी ओततात, मीठ घालतात जेवायला देत नसते. तेव्हा पिण्यासाठी रसना केली जायची तर त्याना पिण्यासाठी रसना न देता पाण्यात हळद घालून देतात त्याना पाहायला मज्जा येते. या सर्वांचा राग किंवा खोडी नवीन आलेली नवरीची करतात व मस्करी करतात. असाच हा प्रकार काही क्षणा पूरता केला जातो. शेवटी दीर त्या जेवणाला कंटाळून निघून जातात मस्करी करत करत जातात आणि सर्व नातेवाईक त्याना हसतात व असे हास्समय वातावरण तयार होते.

## ३.९ लग्न गीताचा सामाजिक अंगाने अभ्यास

गोमंतकात प्रत्येक भागात अनेक जातीचे लोक एकत्रित राहतात. आपल्या समाजात महार, ब्राह्मण, कुंभार अशा लोकांना महत्व असतो. यांना लग्न विधित बोलावले जातात. लग्न कार्यात महार जातीचे लोक महत्वाचे ठरतात. लग्न कार्यात 'म्हारवत' ही महत्वाचे असते म्हणजे बांबूपासून तयार केलेले साहित्य यरवण, दाली हे लग्नात महत्वाचे असते त्यामुळे महार हे महत्वाचे ठरते. 'कड्यामुड्यार' या लग्न गीतातून दिसून येते.

**उदा. 'हाड गे म्हारणी फुलया दाली'**

**तेजेर सोडी कमल साडी**

यावरून लक्षात येते की तीला मानाने बोलवतात. काही ठिकाणी राणे, देसाई सारखे लोक महार लोकांना स्पर्श वैगरे करत नाही त्या लोकांना जात ही जास्त लागते परंतु लग्न सोहळा इतका चांगला आहे की ते सर्व न मानता लग्न कार्यात महार लोकांना आवर्जून बोलवीले जातात आणि त्यांचा मान केला जातो.

त्यानंतर कुंभार यांचा उल्लेख लग्नाच्या विधिमध्ये ' करे भरणे' ही एक विधी असते. तर या गीताच्या माध्यमातून जाणवते की करे हे मातीचे असते व ते काम कुंभार लोक करतात. त्यामुळे कुंभारची गरज लागते.

त्यांना मान दिला जातो. त्यानंतर प्रत्येक विधी करण्यासाठी, सांगण्यासाठी भट महत्वाचा असतो. तर या गीतातून या महार, कुंभार, भट यांचा उल्लेख येतो. तर अशा जातीचे लोक एकत्र राहतात व एकत्र येऊन कार्य करतात. सर्व जातीच्या लोकांना स्वीकारून त्यांना मान देऊन लग्न विधी केली जातात.

समाजात लोकांची समजूत असते की 'एक लगीन बारा विग्न' अशी म्हण म्हटली जाते त्यामुळे कोणाचेही मन न दुखवता, जात -पात न मानता सर्व लोकांना मानून स्वीकारून त्यांचा मान करतात. कोणाच्याही मनात त्या विषयी राग, वाईटपण मनात येऊ नये कोणीही दुखावता जाऊ नये हा असा विचार करून सर्वजण एकच समान आहेत असा विचार करून प्रत्येकाला मानाने लग्न विधित आमंत्रण देतात व एकत्र कार्य पार करून घेतात.

लग्न गीतांच्या माध्यमातून आपल्याला अन्ना विषयी, देव दैवता विषयी, समाज भान या सर्वांचा परिचय होतो. अनेक गोष्टी आपल्या लक्षात येतात आणि समजतात.

**३.१० समारोप**

प्रस्तुत प्रकरणात सर्वात आदी लोकगीतांची संकल्पना, व्याख्या जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचप्रमाणे लग्न विधी आणि लग्न संबंधी लोकगीते याचे वर्णन केले आहे. लग्न विधीचे बदलते स्वरूप या सर्वांची चर्चा यात केलेली आहे. पुढील लग्न गीत का महत्वाचे असते याचा विचार केला आहे. त्यानंतर एकूण लग्न गीताचा आशयनिष्ठ अभ्यास केलेला आहे. त्यात लग्न गीतांच्या माध्यमातून दिसून येणारे देव दैवत, अन्न विषयक उल्लेख, चित्रमय शैली, नातेवाईकांचा उल्लेख या सर्वांचे वर्णन सविस्तरपणे केलेले आहे. लग्न गीताचा सामाजिक अंगाने अभ्यास केलेला आहे अशा प्रकारे विषयाचे वर्णन या एकूण प्रकरणात मांडले आहे.

## ३.११ निष्कर्ष

१. लग्न गीतात काही चरणाची पुनरावृत्ती असते .

२. पुनरावृत्ती हा लोकगीताचा विशेष असतो.

३. ही पुनरावृत्ती सर्वसाधारणपणे  धृवपदाची असते.

४. परंतु त्याशिवाय दुसरे पद समान ठेवून ते  पुन्हा पुन्हा म्हणण्याची प्रवृत्ती असते.

५. एवढेच नाही तर पहिल्या चरणातील सर्व शब्द तेच ठेवून फक्त वस्तूंची किंवा व्यक्तींची नावे बदलून ते चरण म्हटले जाते व दुसरे चरण समान ठेवतात.

## संदर्भ

खेडेकर विनायक विष्णू, गोवा लग्नख्यान -प्रकाशन, १९६६, तारा – भुवन, माडीवाले कॉलनी – सदाशिव पेठे, पुणे.

# प्रकरण – ४

# अडवई आणि पिसूर्ले गावातील फुगडी गीतांचा अभ्यास

**प्रास्ताविक**

**४.१ फुगडी गीत ;संकल्पना................................................ 51**

**४.२ फुगडी गीताचे स्वरूप.......................................................................................52**

**४.३ फुगडी गीताचे महत्व......................................................................................53**

**४.४ फुगडी गीतांचा आशयनिष्ठ अभ्यास ..........................................................................53**

**४.५ समारोप..............................................................................................................60**

**४.६ निष्कर्ष ................................................................................................................60**

## प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात फुगडी गीताची संकल्पना मांडून तसेच फुगडी गीताचे स्वरूप आणि व्याख्या मांडलेली आहे. त्याचप्रमाणे एकूण  फुगडी गीताचे महत्व सांगून आशयनिष्ट अभ्यास या प्रकरणात केलेले आहे .

## ४.१ फुगडी गीत ;संकल्पना

फुगडी हा एक कला प्रकार आहे जो गोव्यातील प्राचीन सांस्कृतिक परंपरेत दिसून येतो. फुगडी ही विविध धार्मिक आणि सामाजिक प्रसंगी केली जाते. फुगडी ही साधारणपणे भाद्रपद महिन्यात केली जाते, तेव्हा स्त्रियांना त्यांच्या सामान्य, नीरस दिनचर्येतून तात्पुरती विश्रांती घेण्याची संधी मिळते. फुगडी गीतातून स्त्रिया आपल्या मनातील भावना मांडत असतात. फुगडी घालत असताना स्त्रिया विविध प्रकारची रचना करतात, गातात व नृत्य करतात.

या रचना वर्तुळात असते. फुगडीची सुरवात देवतांना आवाहन करून सुरवात केली जाते. सुरवातीला मंद गती असते परंतु लवकरच तिची गती वाढते.

पूर्वी फुगडी घालत असताना वाद्याचा वैगरे वापर जास्त प्रमाणात करत नसत. बायका ते गीत गात असते आणि हातांच्या टाळीने लय पकडून फुगडी घालतात. जास्तीत जास्त वेगाने, नर्तक "फु" सारख्या आवाजात तोंडातून हवा फुंकून ताल जुळवतात. त्यामुळेच याला 'फुगडी' हे नाव पडले.

फुगडी ही धालो उत्सवामध्ये तसेच गणेश चथुर्थीच्या सणावेळी आणि सामाजिक कार्यक्रमातही खेळली जाते. पारंपरिक फुगडी नृत्याला वाद्याचा साथ नसते. परंतु अलीकडच्या काळात घुमट, म्हादळे, कासाळे, शामेळ या वाद्याचा सात संगत पाहायला मिळते. फुगडी ही फक्त दोघीमध्ये न घालता अनेकजणीचा सहभाग असतो.

### ४.२ फुगडी गीताचे स्वरूप

पूर्वी फुगडी ही धालोच्या मांडावर आणि चतुर्थीच्या दिवसात घातली जात असे. ग्रामीण भागात जास्त प्रमाणात फुगडी  घालतात. गावातील सर्व बायका नऊवारी नेसून चांगले शृंगार करून फुगडी घालतात. या फुगडीच्या निमित्ताने त्याना चांगल सजता येते , अनेक बायका एकमेका सोबत बोलता, भेटता येत. दैनंदिन कामातून सुटका मिळून स्वतःसाठी वेळ काढतात. खूप सुंदर दिसतात. फुगड्या या अनेक प्रकारच्या असतात आणि त्यात झेमाडो, बेडूक फुगडी इत्यादि .  आपल्या मनातील भावना, देवाची स्तुती ते त्या फुगडी गीतातून मांडतात. पूर्वी बायकांचा फुगडी हा प्रकार आवडीचा असायचा व आवर्जून ऐकमेकांच्या घरी फुगडी घालण्यात जातात. पूर्वी फुगड्या मध्ये वाद्याचा वापर केला जात नसे बायका स्वतः गीत म्हणतात त्यांचा आवाज मधुर असायचा आणि ताल, लय चांगल्याप्रमाणे धरून फुगडी गीत म्हणतात. वाद्याच्या ऐवजी आपल्या हातांच्या टाळ्या वाजवून ताल देत असतात. त्यानुसार फुगडी ही पुढे सर्कत असते. अलीकडच्या काळात 'फुगडी' हा प्रकार गणेश चतुर्थीच्या दिवशी घालत असला तरी आता सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम असला तर फुगडी घातली जाते. लय, ताल  पद्धत काही थोड्याप्रमाणात बदलेली दिसून येते. आताच्या फुगडी मध्ये वाद्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे फुगडी गीत ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी अधिक चांगले वाटते. अनेक ठिकाणी फुगडीची स्पर्धा ठेवली जाते. आधुनिकतेचा प्रभावही दिसून येतो. स्पर्धामध्ये फुगड्याचा समूह तयार होऊ लागले व मनोरंजन म्हणून फुगडीकडे पाहिले जाते. आताच्या फुगडी गीतात शब्दाचा उच्चार, लय बदलेली दिसून येते. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या चालीत फुगडी गीते गायली जातात. आताच्या काळातील बायका नोकरीला जातात त्यामुळे वेळ मिळत नसल्याने गावात फुगडी घालण्यासाठी वैगरे कमी जातात.

सकाळी लवकर उठून कामाला जायला पाहिजे या विचाराने काही बायका जात नाही फुगडी खेळायला तर पूर्वी सारखी मज्जा आताच्या काळात तितकी येत नाही. पूर्वी बायकांना उत्सुकता असायची कधी गणेश चथुर्थी येणार आणि चांगला शृंगार करून फुगडी घालण्यास  ऐकमेकांच्या घरी जातात. सगळयांना फुगडी गीत येत असायची एकटी विसरली तर दुसरी आठवण करून देत गात असत पण फुगडी थांबायला देत नसत. फुगडी गीताच्या माध्यमातून आपल्या मनातील भावना, दुःख, इच्छा व्यक्त करतात. गणपतीकडे आपल्या कुटुंबासाठी सतत मागत असते. स्त्रियांची सुख दुःख काही भावना, काही गोष्टी सांगायची असल्यास

ती फुगडी गीतातून व्यक्त करत असत. आता तस होत नाही कारण आता मोबाईल आल्यामुळे काही झाले तर लगेच आपण बोलू शकतो सांगू शकतो. त्यावेळी असं काही नव्हते त्यामुळे गावातील बायका गीताच्या माध्यमातून आपल्या मनातील भावना या फुगडी गीतातून व्यक्त करत होत्या.

**४.३ फुगडी गीताचे महत्व**

फुगडी गीताच्या माध्यमातून स्त्रीला आपल्या मनातील विचार, भावना व्यक्त करण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ऐकमेकांचे दुःख, भावना या गीतातून समजते.

**४.४ फुगडी गीतांचा आशयनिष्ठ अभ्यास**

फुगडी गीताच्या माध्यमातून बायका एकत्रित येऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करतात. आपल्या संसार करत असताना येणारे सुख दुःख, इच्छा त्या सगळ्यांसमोर फुगडी गीताच्या माध्यमातून व्यक्त करतात.

**१. उदा :- गणपती देवा कारीन तुझी सेवा**

**नवस वाहिनी रे देवा नवस वाहिनी रे...**

या फुगडी गीतातून लक्षात येते कीं पूर्वी लोक देवाकडे आपल्या सुखासाठी देवाकडे नवस करायचे. अपार श्रद्धा देवावर ठेवून नवस पूर्ण होणारच याच्यावर विश्वास पूर्वी लोकांचा होता. हे लक्षात येते त्याचप्रमाणे ' कपाळाचं कुंकू दे जन्मभर आणि काही मागीन रे' या फुगडी गीतातील ओळीतून लक्षात येते आपल्या नवऱ्याचे रक्षण कर जे नवऱ्याच्या नावाचे कपाळाला कुंकू लावते आणि गळयात मंगळसूत्र घालते त्याला सुखी ठेव आणि त्याची साथ मला जन्मभर लाभू दे किंवा मिळू दे अशी प्रार्थना ती या गीतातून देवाकडे व्यक्त करते.

यातून स्त्री कशी आहे हे जाणून येते म्हणजे स्त्री ही कशाप्रकारे सगळयांचा सांभाळ करते. जरी ती परक्या घरची असली तरी नवऱ्याच्या सुखासाठी कुटुंबाच्या सुखासाठी प्रार्थना करते. कधीच स्वतःचा किंवा स्वतःसाठी मागत नसते.इतरांच्या सुखात स्वतःच सुख मानत असते.

**उदा :- तेंडलिनीच्या माटवापोना बसून काडली रात गो**

**मावाच्या कुडीन गेल्यार सोऱ्याचो वास गे**

या फुगडी गीताच्या ओळी पाहिल्यावर आपल्याला लक्षात येते की , पूर्वी वृद्ध माणसे वैगरे पुरुष मंडळी दारू प्यायचे घरातील खोलीत वैगरे दारूच्या बाटल्या लपवून ठेवायचे. त्यामुळे घरभर किंवा त्याच्या कुडीत म्हणजे खोलीत दारूचा वास येत असायचा. त्याच प्रमाणे फुगडीच्या ओळीत आलेली 'माईच्या कुडीन पानाचो वास गे' आणि प्रत्येक स्त्रिया पान सुपारी खात असायची. आमच्या अडवई आणि पिसूर्ले गावात अजून काही वृद्ध माणसे दारू पितात आणि पान सुपारी खाताना दिसून येतात व खातात. परंतु पूर्वी सारखे दारू घरात घेवून येत नाही बाहेरच पिऊन येतात जेणे करून दारूचं वास खोलीत वैगरे येत नाही. गावातील काही माणसे शिकलेली असल्यामुळे दारूकडे जास्त वळत नाही काही प्रमाणात पितात तर काहीजण पीत नाही. परंतु पान सुपारी खाणे हे अजून काही भागात काही माणसे खातात . अशा प्रकारचे विचार किंवा गोष्टी या फुगडी गीताच्या माध्यमातून ऐकमेकांना सांगतात.

**२. उदा :- सकाळच्या पारी शंक वाजवीला**

**शंकाच्या नादाने गोविंद उठला**

**गोविंद उठोनी पाण्याशी गेला**

**पाण्याचा विटाळ माशांनी केला**

**कशी करू देव आता लिंगाची पूजा**

या फुगडी गीतातून आपल्याला हे लक्षात येते कीं, एक भक्त देवाची पूजा करण्यासाठी कळवळलेला दिसून येतो. लिंगाची पूजा म्हणजेच महादेवाची पूजा करण्यासाठी तो पाणी आणायला जातो परंतु पाण्याचा विटाळ माशांनी केला असे तो देवाला सांगतो. मी पूजा करण्यासाठी सकाळी उठलो परंतु तुझ्या पूजेला जे काही लागते त्याचा आधीच विटाळ माशाने केला आहे तर मी कशी तुझी पूजा करू हे तो देवाला सांगतो. सर्वप्रथम पाण्याचा विटाळ माशांनी केला, फुलांचा विटाळ पाख्यांनी केला, पिंजरीचा विटाळ भटांनी केला तर मी कशी करू तुझ्या लिंगाची पूजा ही तळमळ व्यक्त करताना दिसून येते. प्राचीन काळातील गावातील लोक अशाच

पद्धतीचे असायचे. सकाळी उठोन देवाची पूजा करायचे पूजा केल्याशिवाय त्यांचा दिवस जात नसे. लोकांची श्रद्धा, विश्वास आपल्याला दिसून येतो. परंतु आता अलीकडच्या काळात लोकांना जसा वेळ मिळतो त्यानुसार देवाची पूजा करतात. एका भक्ताची देवाची पूजा करण्यासाठी झालेली मनाची तळमळ या गीतातून व्यक्त होते व आपल्याला जाणवते.

**३. उदा :- शेत माझे डोंगरी ग तिथे माझे माहेरी**

**बाबा माझा चिंता करी धु माझी एकटी**

या गीतातून वडिलांची भावना व मुली विषयी असलेल प्रेम, काळजी दिसून येते. पूर्वी आई वडील सांगतात त्या घरात आणि सांगतात त्या मुला सोबत लग्न लावून द्यायची. पूर्वी लोकांची घरे एकदम डोंगरी भागात असायची डोंगर वैगरे चढून वर घरे असायची. चालत जायचे पडायचे. वडिलांनी मुलीला लग्न करून दिले खरे पण वडिलांना आता मुलीची चिंता सतावत आहे. चिंता त्यांना झालेली आहे. पण मुलगी इतक्या चांगल्या प्रमाणे बाबाला सांगते कीं, नाही बाबा मी एकटी आहे सोबत माझ्या सासू, सासरे सोबतीला असे आश्वासन ती आपल्या वडिलांना देते. त्यांची चिंता मिटवण्याचा प्रयत्न करते. त्याला तिची आई, भाऊ, वडील आपली चिंता व्यक्त करतात. असा या गीताचा आशय आहे.

परंतु प्राचीन काळात मुली आपल्या सासरी होणारा त्रास आपल्या आई वडिलांना सांगत नसे. मुलींना लग्नाआधीच सांगितलेले असते की तुझे लग्न झाल्यावर तेच तुझे घर आणि काहीही झाले तरी तुला सांभाळायला हवे. असेच सांगून त्यांना सासरी पाठवायचे. आपल्याला होणारा त्रास ती आई वडिलांना सांगत नसत आपल्यामुळे आपल्या आई वडिलांना त्रास नको या विचाराने ती स्वतः सगळे सहन करीत असते. आपल्या संसार, आयुष्य जगत असते. या कारणामुळे पूर्वीचे घर, संसार कुटुंब एकत्रित राहायचे कारण सून किंवा मुलगी आपल्याला झालेला त्रास कोणासोबत बोलत नसायचे. रागपण करत नसायचे म्हणून एकत्र कुटुंब आपल्याला दिसायची.परंतु आताच्या मुली काहीच सहन करत नाही साध्या गोष्टीवर राग करून आपल्या आई वडिलांना सांगतात व अशामुळे एकत्र कुटुंब तुटतात. ऐकमेकांच पटत नाही त्यामुळे एकत्र कुटुंब असलेला

दिसून येत नाही.आजकाल स्वतः त्रास सहन करत नाही म्हणून एकत्र कुटुंब टिकत नाही. या फुगडी गीतातून आपल्याला वडिलांचे मुलीविषयी असलेलं प्रेम, काळजी, चिंता या गीतातून व्यक्त होते. त्याचप्रमाणे पूर्वीचे कुटुंब कसे एकत्रित असायचे यावरून लक्षात येते.

**४. उदा :- कितली म्हारगाय गे सायबिणी**

**संवसार कसो करचो आम्ही**

**बाजारान गेल्यार दुडू पावाना**

या फुगडीतुन समाजात होत असलेल्या 'म्हारगाय ' म्हणजे वाढणारी  दर याची चर्चा गीतातून व्यक्त करताना दिसतात. पूर्वी जास्त पैसे लोकांकडे नसायचे परंतु इतकी म्हारगाय नसायची. सगळे काही कमी पैशात मिळायचे. परंतु आता प्रत्येक वस्तूची दर इतकी वाढली आहे कीं, समाजातील प्रत्येक माणूस चिंतीत पडलेला आहे.शंबर रुपयाला जास्त मोल असायचा पण आता शंबर रुपायला काहीच मोल नाही. याची खंत वाटते. त्यामुळे गरीब माणसांचे जीवन जगणे अवघड झाले आहे.

आजची स्तिथी कशी आहे समाजात प्रत्येक गोष्ट करण्यासाठी विकत घेण्यासाठी पैसे महत्वाचे ठरतात. परंतु १००-२०० रुपयांना देखील या काळात मोल नाही. बाजारात गेलो तर भाज्या खूप महाग असतात. पूर्वी लोक शेती करायची भाज्या लावत असायची तर पैसे खर्च कमी व्हायचे. पण आता प्रत्येक गोष्ट विकत घ्यावी लागते आणि ते घेण्यासाठी पैसे नाहीत किंवा कमी आहे. या फुगडी गीतात म्हारगायचा प्रश्न पडला आहे तर तो व्यक्त करतात. म्हारगाय किती वाढली आहे व त्यामुळे आम्ही संसार कसा करायचा हा प्रश्न यांना पडला आहे व ते गीताच्या माध्यमातून व्यक्त करतात.

**५. उदा :- पाऊस लागेता झिरीमिरी, पाऊस लागेता झिरीमिरी**

**वंडिक काडीली शेणा माती, वंडिक काडीली शेणा माती**

या फुगडी गीतातून असा आशय लक्षात येतो की गणेश चतुर्थीच्या वेळी पाऊस पडतो. तर 'पाऊस लागेता झिरीमिरी' या ओळीतून समजते की  गणेश चतुर्थीची तयारी करत असताना काय करतात ते या गीतातून मांडले आहे. पूर्वी गावातील घरे ही मातीची असायची तर एका बाजूला पाऊस पडतो आणि दुसऱ्या बाजूला मातीच्या घराला जसे आपण घराला रंगाने रंगवितो त्याचप्रमाणे मातीने घर रंगवायचे व शेणाने जमीन सावरायची. गणपती घरी येण्याआधी महिनाभर तयारी असते. नंतर चतुर्थीला दोन दिवस असताना माटोळीला नारळ, आंब्याच्या पानांचा ताळा बांधला जातो. त्याचप्रमाणे पूर्वी लोकांच्या घराच्या मागे बाग असायची आणि त्यात भेंडी, दोडगी, तंवशी वैगरे लावायची. तर ते नवीन फळ झालेले आमचा हिंदू धर्मात रीत आहे की कोणतेही धान्य किंवा फळ नवीन झालेले असेल तर त्याचा मान देवाला सर्वात आधी ठेवला जातो नंतर घरात वापरण्यात येते. तर अशा प्रकारे घरात असलेली भेंडी, दोडगी, तंवशी वैगरे काढून माटुलीला बांधतात. हे पाहून एक चमत्कार असल्या सारखे असते कारण आपण उगवलेल भाजी, फळ माटोळीला बांधून सजवले जाते. यालाच देव मानून पहिला नमस्कार त्याला केला जातो. नंतर गणपती आल्यावर गणपतीची पूजा केली जाते. एकूण या गीतातून गणेश चतुर्थीच्या दिवसांनी लोकांची चाललेली तळमळ, मनाची हुरहूर देवा विषयी दिसून येणारी श्रद्धा, विश्वास दिसून येतो. कशा प्रकारे पाऊसाच्या दिवसांनी घर सजवितात कशा प्रकारे गणपतीचे स्वागत करावे या विचारात किंवा चर्चा सुरु असते. हे सगळे या गीतातून आपल्याला समजते.

**६. उदा :- हातीन दांडा धपटी घेऊन खांद्यावरी**

**हरी दाखय म्हाका पंढरीची वाट..**

या फुगडी गीतात एक भक्त देवाकडे मागतो की, आपल्याला पंढरीला जायचे आहे आपल्याला पंढरीची वाट दाखव. एक वृद्ध माणूस किंवा भक्त त्याच्या हातात दांडा आणि धपटी (कांबळ ) घेऊन विठ्ठलाला भेटण्यासाठी किंवा त्याची वाट दाखव याची मागणी करतो. देवा विषयी असलेली ओढ, श्रद्धा दिसून येते.

**"पंढरी जाताना सापडली चिरा "**

**"विठोबाची नदार रुक्मिणीच्या चूड्यार "**

या ओळीत समजते कीं, तो वारीला जात असताना वाटेत त्याला विठ्ठल रुक्मिणी सापडली. चिरा म्हणजे वारीला जाताना अनेक लोक विठ्ठल रुक्मिणी सारखे कपडे परिधान करतात तर ते पाहून त्याला वाटते कीं आपल्याला भेटायला विठ्ठल रुक्मिणीच आली आहे. खूप सुंदर आहे व विठ्ठलाची नदर जणू काय रुक्मिणी च्या चूड्यावर आहे. वारीला जात असताना वाटेत विठ्ठलाचे दर्शन, रूप पाहून त्याच्या मनातील भावना तो यावरून व्यक्त करतो.

**७. उदा :- वयले वयले डोंगरी, जोता बांधिली पाड्याची**

**नांगराच्या ठसाला लागली एक पेटी**

या फुगडीतून आपल्याला रामायण याचा उल्लेख सापडतो. म्हणजे याचा आशय असा आहे कीं, शेतकरी बैलांना घेऊन शेत नांगरीत होता त्यावेळी त्याला एक पेटी सापडली त्या पेटीत जानकी सीता बाई सापडली त्यानंतर शेतकरी ती पेटी घेऊन गावातील प्रमुख राजाकडे घेऊन जातो. पेटी उघडताच छोट मूल होत. त्या राजाने मुलीला आपल्याकडे ठेवले. त्यानंतर सीताबायी सर्व दैवताना पत्र लिहिते कीं, पहिले पत्र सूर्याला, दुसरे पत्र चंद्राला तुम्ही सारे देवता. याहो सीतेच्या स्वयंयावर तर असा आशय या फुगडी गीतातून व्यक्त होतो. पूर्वी माणसाचे मन स्वच्छ होते. ते शेतकरीचा विचार केला तर आपल्या लक्षात येते कीं, पूर्वीचे लोक मनाने चांगले होते. पेटी मिळाल्यावर त्याने स्वतः उघडून न पाहता तो सरळ ती पेटी घेऊन राजाकडे गेला यातून त्याचा स्वभाव स्पष्ट होतो.

**८. उदा :- हातात पुस्तक घेऊनी, हातात पुस्तक घेऊनी**

**सासोऱ्याने उजात टाकले**

**हे सुख दुःख कोणाचे हे सुख दुःख कोणाचे**

या गीतातून स्त्री विषयक उल्लेख आला आहे. पूर्वी स्त्रीला कोणताच मान, सन्मान नसायचा हे लक्षात येते. या गीतात असे मांडले आहे कीं, घरची सून ती पुस्तक वाचत आहे आणि हे पाहून त्याचे सासरे ते पुस्तक काढून आगीत टाकून देतो. याचा अर्थ असा कीं, स्त्रियांना शिकण्याचा, स्वतःसाठी काही चांगलं करण्याचा हक्क नव्हता . स्त्रीचे जीवन हे फक्त चूल आणि मूल इतकच असायचं व हेच त्याच जग आहे अशी त्यांना वागणूक दिली जायची. स्त्री ही सगळं काही सहन करीत आयुष्य त्याच्या सोबत काढायची. परंतु आपले दुःख मात्र आपल्या आई वडिलांना सांगत नसायची. आई वडिलांना समजल्यावर त्यांना चिंता व्हायची. स्त्रीची अवस्था व त्याला कोणतेच हक्क नसल्या सारखे वागवणे हे पूर्वी चालत होते ते या गीताच्या द्वारे समजते. परंतु आताच्या काळात स्त्रियांना पुरुषा इतकाच हक्क समाजात आहे. पुरुषा पेक्षा स्त्रिया पुढे गेलेली आहे व ती अशीत जाणार प्रगती करणार. लोकांची मानसिकता बदलेली आहे. पूर्वी घरात स्त्रियांना बोलण्याचा देखील हक्क नव्हता. आता तस नाही प्रत्येक स्त्री पुरुषावर किंवा कोणत्याच माणसांवर अवलंबून नाही. आपली जीवन जगण्याची पद्धत, खाण्याची पद्धत सर्व काही समाजात चालत आहे त्याचप्रमाणे आपल्ये आयुष्य बदलत आहे आणि बदलण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करताना दिसून येतात. तर अशा प्रकारचा आशय या गीतातुन व्यक्त होतो व आपल्याला स्त्री जीवन कसे होते याची जाणीव होते.

**९. उदा :- सोप्यार बसतल्या ओ माझ्या मावा**

**बाबा म्हाका वरुंक येयला मी जाते माहेरी**

यातून असे आपल्याला जाणवते कीं, स्त्रियांना आपल्या माहेरी जाण्यासाठी देखील घरातल्यांची परवानगी घ्यावी लागायची. स्वतःच्या घरी जाण्याकरिता. परंतु स्त्री एक अशी व्यक्ती आहे जिला जन्मता तीच हक्काचं खरं घर नसत. स्त्रियांना मुळात हक्काचं घर कोणते असते? आईच्या घरी गेल्यावर ती म्हणतात कीं तू दिल्या घरची तर सासरी म्हणतात तू परक्याच्या घरची म्हणजे स्त्रीने जावे कुठे? असा स्त्रियांच्या मनात एकदा तरी प्रश्न निर्माण होतो. पण ज्या घरात ती नांदायला जाते त्या घराला मात्र घरपण करुन जाते हे मात्र खरं. स्वतःचा विचार कधीच करत नाही सगळी नाती जपण्यासाठी देवाकडे पार्थना करत असते. आपली इच्छा मनातल्या मनात दांबून ती इतरांच्या मनासारखी वागत असते. वागत आलेली आहे. या गीतात असे मांडले

आहे कीं, मुलीचा बाबा तिला माहेरी घ्यायला आला आहे आणि ती आपल्या घरातील सर्वांची परवानगी घेत आहे. सासऱ्याकडे जाते तो सांगतो सासूला विचार मग सासू सांगते तुझा दिराला विचार दीर सांगतो जावेला विचार जावू सांगते नणंदेला सांग नणंद सांगते तुझा नवऱ्याला सांग. परंतु मुळात त्यांना तिला माहेरी पाठवयाचे नाही असे जाणून येते. लक्षात येते कीं स्त्रीला स्वतःचा निर्णय देखील घेता येते नव्हता. त्यांना घरातील माणसांची भीती असायची व जीवन जगायची. आजकालच्या पिढीतील स्त्रियांना कोणतीच भीती नाही, स्वतः कमवून स्वतः आयुष्य जगत असते. स्वतःचा निर्णय स्वतः घेऊ शकते. हे खूप चांगले आहे.

पण पूर्वीच्या स्त्रियांमध्ये आणि आताच्या स्त्रियांमध्ये खूप फरक आहे. माझा मते स्त्रियांना त्यांना हक्क मिळाला हे चांगलीच गोष्ट आहे पण ऐकमेकांचे विचार जुळत नाही ऐकमेकांचे पटत नाही त्यामुळे घरात वाद निर्माण होतात आणि यामुळे एकात घरात दोन चुली करण्याची वेळ येते. पूर्वी सारखे जीवन आपल्याला नको आहे आपण या आधुनिक काळात बदलत्या जगण्याच्या पद्धतीत आपली पिढी सुखी आहे. पण आपल्याला या गीतावरून स्त्रियांचे जीवन लक्षात येते व अशा प्रकारे या गीताच्या माध्यमातून आपल्याला स्त्रीचे चित्रण आलेले दिसून येते.

**४.५ समारोप**

एकूण या प्रकरणात फुगडी गीतांचा अभ्यास केलेला आहे. सुरवातीला फुगडी या प्रकारची प्रस्तावना मांडलेली आहे. त्याचप्रमाणे फुगडी गीताचे स्वरूप स्पष्ट केले आहे . फुगडी गीत हे का महत्वाचे आहे हे आपण जाणून घेतले आहे. त्यानंतर फुगडी गीताचा आशयनिष्ठ अभ्यास केलेला आहे. यामध्ये प्रत्येक फुगडी गीताचे विवेचन केलेले आहे. स्त्रियांची भावना, त्यांना पडलेले प्रश्न या सर्वांचे वर्णन यात केले आहे. स्त्रीचे दर्शन आपल्यला या फुगडी गीतातून होते हे लक्षात येते. तर या सर्वांचा विचार या प्रकरणात केलेला आहे.

**४.६ निष्कर्ष**

१. एकूण या फुगडी गीतातून स्त्रियांच्या मनात घर करून असलेले प्रश्न, चिंता, दुःख मनातील भावना किंवा गीताच्या माध्यमातून प्राचीन जीवन कसे होते हे आपल्या लक्षात येते.

२. या फुगडी गीतातून अनेक प्रश्न व्यक्त होताना आपल्याला आढळते.

३. पूर्वी स्त्रियांचे जीवन कसे असायचे, कोणकोणते त्रास सहन करावे लागायचे हे या काही फुगडी गीतातून व्यक्त होताना दिसून येते.

४. आपल्या नवऱ्याच्या सुखासाठी मागणी गणपती देवाकडे करत असते.

५. त्यांची श्रद्धा, विश्वास, उत्सुकता आपल्याला समजून येते.

६. फुगडी हा स्त्रियांचा आवडता खेळ आहे.

७. उत्सकता असते कधी चतुर्थी येणार याची वाट पाहत असतात. कधी आपण या दैनंदिन कामातून वेळ काढून एकत्र बायका मिळून आपल्या मनातील भावना किंवा समाजात असलेले प्रश्न व्यक्त करतात.

उदा : कितली म्हारगाय गे सायबीणी यावरून लक्षात येते.

८. फुगडी गीतातून स्त्रिया आपल्या मनातील भावना व्यक्त करतात. असे या फुगडी गीताचा आशयनिष्ठ अभ्यास केल्यामुळे जाणवले.

**संदर्भ**

1 सायनेकर विशाखा अरविंद , स्त्रिवेद –लोकसंचित पाथेय , प्रकाशन श्री . मोहन कुलकर्णी –होंडा ,सत्तरी – गोवा

# प्रकरण ५

## अडवई आणि पिसूर्ले गावातील अंगाई गीताचा अभ्यास

**प्रास्ताविक**

**५. १ अंगाई गीत ........ 64**

**५.२ अंगाई गीताचे स्वरूप ........ 64**

**५.३ अंगाई गीताच्या माध्यमातून दिसून येणारे आईचे मातृत्व ........ 64**

**५.४ अंगाई गीताचे महत्व ........ 65**

**५.५ अंगाई गीत हे बाळाला आकर्षित वाटते ........ 66**

**५.६ अंगाई गीताचे फायदे ........ 66**

५.६.१ भावनिक विकास होतो ........ 66

५.६.२ आई बाबाकडे जवळचे नातं वाढते (बोडिंग) ........ 66

**५.७ अंगाई गीतांच्या अभावाची कारण मिमांसा ........ 67**

**५.८ अंगाई गीतांचा अश्यानिष्ठ अभ्यास ........ 68**

**५.९ समारोप ........ 69**

**५.१०. निष्कर्ष ........ 69**

## प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात अंगाई गीतांचा अभ्यास केला आहे तसेच अंगाई गीताची व्याख्या, स्वरूप व एकूण अंगाई गीत बाळांना का आकर्षित वाटते व अंगाई गीतामुळे मुलांना कोणता फायदा होतो याचे चित्रण यात केले असून एकूण अंगाई गीतांचा आशयनिष्ठ अभ्यास या प्रकरणात केलेला आहे .

## ५. १ अंगाई गीत

लहान मुलांना झोप लागण्यासाठी किंवा झोपवण्यासाठी जे गीत सादर केले जाते त्याला अंगाई गीत म्हणतात.

## ५.२ अंगाई गीताचे स्वरूप

अंगाई गीते ही बाळाला झोपविण्याच्या उद्देशाने गायीली जातात. अंगाई गीत ही गावापुर्तीच मर्यादित नसून जगभर प्रचलित आहे. बाळाची आई आपल्या बाळाला मांडीवर घेऊन झोपवते किंवा पाळण्यात घालून झोपवते त्यामुळे याला पाळणा गीत असेही म्हणतात. अंगाई गीताची रचना ही लहान आणि साधी असते. लयबद्ध व नादमधुर असते. वर्णनाची पुनरावृत्तीही केलेली असते. त्याचप्रमाणे आपल्या मुलाचे किंवा बाळाचे देवाने संरक्षण करावे म्हणून देखील अंगाई गीत म्हणत असताना देवाची नावे घेतली जातात.

त्याचप्रमाणे बाळाचे रूपवर्णन, त्याचा खेळ त्याचे छंद त्याचे आंघोळ घालणे, जेवण जेवणे अशाप्रकारे वर्णन अंगाई गीतातून व्यक्त केले जातात. एक एकदा बाळ झोपत नसल्याने त्याला कोणाची ना कोणाची भीती घालतात (हावू येतलो ) भीती घालण्याचा प्रयत्न आई करते. परंतु हा 'हावू' नक्की कोण हे माहित नसते ही एक गंमत असते. त्याचप्रमाणे कित्येक अंगाई गीतात काऊ, चिऊ, गाय यांनाही आमंत्रण दिले जाते. तर अशाप्रकारे अंगाई गीतात अनेकांचे वर्णन करतात.

## ५.३ अंगाई गीताच्या माध्यमातून दिसून येणारे आईचे मातृत्व

पूर्ण जगात देव सर्वासोबत किंवा सर्वत्र असू शकत नाही त्यामुळे देवाने 'आई' या शक्तीला निर्माण केले. आपल्या जागी आईला ठेवून तीला जास्त मान, महत्व देवाने स्त्रीला एका आईला दिले आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात देवाच्या जागी प्रत्येकाला आई दिली आहे. देवाने आपले एक रूप म्हणून आईला बनवले आहे. स्त्री असणे हेच एक मोठे वरदान आहे.

पृथ्वीवरील मुलगी होण्याचे सौभाग्य कोणीच अनुभवू शकत नाही. पण मुलगी जेव्हा आई होते तेव्हा ती मुलीचे सौभाग्य अनुभवते. मातृत्व हे प्रेमाचे शुद्ध रूप आहे आणि आई असणे हे स्त्रीला पूर्ण बनवत असते. आईची किंवा स्त्रीच्या चिंता, तणाव, वेदना थकवा हा त्या क्षणी नाहीसा होतो . जेव्हा ती आपल्या

बाळांना हसताना, चालताना, झोपताना पाहत असते.  सतत आपल्या बाळाची काळजी करत असते. कधी बाळ आजारी झाला तर आईचा जीव तळमळतो. रात्रभर जागत असते तिला रात्रभर झोप नसते तरी देखील ती सकाळी खंबीरपणे त्याची काळजी घेते.

बाळाला झालेला त्रास एका आईला बघवत नाही. आपल्या बाळासाठी, मुलांसाठी काहीही करायला ती खंबीरपणे तयार असते. जेव्हा पहिल्यांदा एखाद मुलं आई म्हणतो तेव्हा आईला खूप आनंद होतो कारण, पहिल्यांदा तिला कोणी आई म्हणून हाक मारलेली असते व याचित ती आतुरतेने वाट पाहत असते. हे एका स्त्रीसाठी सुख असते, समाधान असते.

त्याचप्रमाणे बाळासाठी स्तनपान हाच सर्वोत्तम आहार असतो. बाळाला सहा महिन्यापर्यंत दुसरे अन्न, पाणी न देता फक्त आईचे दूध दिले जाते. किंवा दिले पाहिजे कारण, नवजात बाळासाठी आवश्यक ते सर्व पोषण हे आईच्या दुधात असते व बाळाचे संरक्षण करते. आई ही आपल्या शरीराचा आपल्या सौदर्याचा विचार कधीच करत नाही. बाळासाठी काहीही करायला तयार असते व त्रास सहन करून बाळाला जन्म देते. हा एक चमत्काराची गोष्ट आहे. जेव्हा आई आपल्या बाळाला बाहेर घेऊन जाते आणि बाळाला भूक लागते तेव्हा ती मागे पुढे न बघता न लाजता व आजूबाजूचा विचार न करता ती बाळाला दूध पाजते. आपल्या मुलासाठी ती कोणत्याही परिस्थितीत ठाम उभी असते. म्हणूनच स्त्री ही दैवी शक्ती असते. ती सगळं काही न घाबरता सामना करते. कुटुंबाचा, मुलांचा रक्षण करते. त्याचसाठी मुलगी असणे हे सोपे असते परंतु तिच्या सारखं जीवन जगणे हे मात्र कठीण असते.

स्त्रिची नाती असतात अनेक पण आपल्या घरावर कोणतेच संकट येऊ नये म्हणून देवाकडे रोज करते ती प्रार्थना. स्वतःसाठी तिला कधीच वेळ नसतो पण आपल्या मुलाबाळासाठी ती सतत झिजत असते. जन्मापासून ते सर्णापर्यंत ती आपले आयुष्य घरासाठी मुलांसाठी जगत असते. आपली स्वतःची स्वप्ने विसरून ती घरातल्यांची स्वप्ने तीच  आपली  स्वप्न मानून जीवन जगत असते. म्हणून तिला देवाचे रूप मानले आहे. सर्व काही सहन करू शकते आणि तिच्याकडे माणूस घडवण्याची आणि जन्म देण्याची शक्ती फक्त आणि फक्त स्त्रीकडे असते. म्हणून स्त्री ही सर्वश्रेष्ठ असते. म्हणून तिला मातृत्वाचे रूप लाभले आहे.

### ५.४ अंगाई गीताचे महत्व

अंगाई गीत ऐकल्यानंतर बाळ पटकन झोपते कारण, बळावर सकारात्मक परिणाम होतो. अंगाई गीत ऐकल्यामुळे बाळाला वेदनेचाही विसर पडतो. इतर गोष्टीकडे लक्ष बाळाचे असल्यामुळे अंगाई गीत ऐकताच त्याचे लक्ष इतर गोष्टीवर जात नाही. बाळाला अंगाई गीत ऐकून असे वाटते कीं, आपण एकटा नसून आपल्यासोबत कोणीतरी आहे व अशा भावनेमुळे बाळाला सुरक्षित वाटते व त्यामुळे बाळ शांत झोपते. त्याचसाठी अंगाई गीत महत्वाची ठरते.

### ५.५ अंगाई गीत हे बाळाला आकर्षित वाटते

आईने  गायलेली अंगाई गीत ऐकून बाळ सुखाची झोप झोपत असतो. यातच आईचे सुख असते. बाळाला अंगाई गीत आकर्षित वाटते कारण, आई ही आपल्या बाळाला ९ महिने आपल्या गर्भात सांभाळते सर्व काही त्रास, वेदना ती ९ महिने सोसत असते. गर्भात असतानाच बाळाला आपल्या आईच्या आवाजाची, तिने गायिलेल्या गाण्याची सवय झालेली असते. आई जे काही खाते ते सरळ त्याच्या बाळाला मिळते. आईच्या श्वासात  बाळाचा श्वास असतो. ९ महिने ज्याप्रमाणे आईने त्याच्यावर संस्कार केले त्यामुळे तिचा आवाज तिच्या हाताचा स्पर्श हे सगळे काही तो बाळ गर्भात अनुभवत असतो किंवा त्याला जाणवत असते. त्यामुळे तो आईला किंवा आईची कूस ओळखतो. त्यामुळे आईच्या कुशीत त्याला झोपणे त्याला सुरक्षित वाटते.

गर्भात असतानाच आईचे आणि बाळाचे चांगले नातं बनलेले असते. त्यामुळे जन्म होताच तो आईच्या कुशीत येतात तो स्वतःला सुरक्षित समजतो व तिला सर्वात आदी ओळखतो. त्यानंतर आपल्या बाबाला ओळखतो या सर्व कारणामुळे आईशी जास्त जवळीक असतो. तर त्यामुळे जेव्हा आई अंगाई गीत गाते तेव्हा बाळाला वाटते कीं आपल्याला कोणतीच भीती नाही आई आहे माझ्याजवळ या विचाराने आणि मधुर अंगाई गीत ऐकून तो त्यात मग्न होतो व झोपतो. आईचा आवाज ओळखून सुरक्षित व शांतपणे झोपी जातो. यामुळे बाळाला अंगाई गीत आकर्षित वाटते कारण, त्याला आईच्या मांडीवर किंवा पाळण्यात त्याचप्रमाणे आवाज ऐकायला मिळतो म्हणून कदाचित अंगाई गीत आकर्षित वाटते.

### ५.६  अंगाई गीताचे फायदे

जेव्हा मुलं झोपेसाठी रडून चिडचिड करतात तेव्हा त्यांना झोपविण्यासाठी अंगाई गीत हा सोपा मार्ग असतो. मुलांवर अंगाई गीताचे चांगले फायदे होतात. मुलांचा शारीरिक, मानसिक विकास होत असतो.

#### ५.६.१ भावनिक विकास होतो

जेव्हा बाळ झोपण्यासाठी रडत असतो त्यावेळी बाळाला आई जवळ हवी असते आणि जेव्हा आई अंगाई गात असते तेव्हा बाळाला कुठेतरी आधार वाटतो मन शांत होते व तो आईकडे झोपते. बाकी कोणाकडे जास्त मुलं झोपत नाही कोणी कितीही प्रयत्न जरी केला तरी  तर अंगाई गीत हे बाळांचे मन शांत करण्याची ही शक्ती असते व भावनिक वातावरण तयार होते व हे भावनिक वातावरण बाळाला चांगले असते.

#### ५.६.२ आई बाबाकडे जवळचे नातं (बोडिंग) वाढते

आई ही आपल्या बाळाला दिवस रात्र आपल्या अंगावर खेळवत असते म्हणून त्याच नातं जवळचे असते, परंतु अंगाई गीत ही घरातील कोणीही बाळासाठी गाऊ शकतात जसे कीं, आजी, आजोबा, वडील. हे

जर त्याला आपल्या मांडीवर किंवा खांद्यावर घेऊन रोज अंगाई गाऊन झोपवत असेल तर ते बाळ  त्याचा मित्र होतो म्हणजे नातं वाढते.

त्याला जाणवते कीं आई प्रमाणेच इतरही घरात कोणी आहे जे काळजी करतात व आपण सुरक्षित वाटते त्याच्याकडे जातो नाहीतर जात नाही. बोलण्यावरून, अंगाई गाऊन दाखवत असताना त्याला सुरक्षित वाटेल तर तो शांत झोपतो.  तेव्हापासून तो त्यांना ओळखायला लागतो की ही आपलीच आहे व आपल्याला त्रास करणार नाही. जेव्हा त्याची झोप पूर्ण झालेली असते तर ते बाळ उठल्यावर चांगला खेळतो चिडचिड करत नाही व त्रास कमी करण्यासाठी बाळाला जास्तीत जास्त झोपेची गराज असते व अंगाई गाऊन झोपवतात तेव्हा ते शक्य होते.

एक एकदा बाहेरच्या वातावरणात बदल झाल्यामुळे, आवाजामुळे बाळ न झोपता चिडचिड करत असतो. त्यावेळी बाळाला अंगाई गीत ऐकताच व अंगाई गीत गायल्यामुळे बाळ शांत होतो.  हे फायदे या अंगाई गीतामुळे बाळाला होत असते.

### ५.७  अंगाई गीतांच्या अभावाची कारण मिमांसा

पूर्वीच्या कळी प्रत्येक आई आपल्या बाळाला अंगाई गीत म्हणत पाळण्यात झूलवत झूलवत झोपवत होती व त्या निमित्ताने आईला वेळ मिळत होता घरातील कामे करण्यासाठी. बाळ खूप तास शांत झोपायचा. अंगाई गीतामुळे लहान मुलावर चांगले संस्कार व्हायचे. अनेक चांगले शब्द, विचार त्यांच्या कानात पडायचे व ज्ञानात भर पडायची. त्याचप्रमाणे घरातील आजी, आजोबा त्यांना गोष्टी सांगायच्या, देवाचे श्लोक, देवाची नावे त्यांना झोपवत असताना गाऊन दाखवायचे. त्यामुळे त्याच्यावर त्याचा चांगला प्रभाव व्हायचा किंवा चांगली सवयी, गुण त्याच्यात यायचे किंवा असायचे.

परंतु आताच्या काळात पूर्वी सारखे राहिले नाही खूप बदलेल आहे. बायका नोकरीला जातात. खरं सांगायचं झालं तर काही बायका बाळ जन्मला आला कीं फक्त एक दोन महिने सुट्टी घेतात. नंतर परत नोकरीला जातात. मुलं मोठ होता होता आईची गरज असते. परंतु त्याला बघण्यासाठी घरात कामवाली ठेवतात. बाळाचं सगळं काही कामवालीच बघत असते. असे म्हणतात कीं, बाळाचं पहिल पाहुल आणि पहिला शब्द हा पाहण्यासाठी आणि ऐकण्यासाठी आई ही वाट बघत असते व याला प्रत्येक आई वडील भाग्य समजतात. परंतु आता नोकरी करत असल्यामुळे वेळ न मिळाल्यामुळे हे अनुभवणे त्यांना लाभत नाही. नोकरीमध्ये इतके व्यस्त असतात कीं मुलांवर लक्षत उरत नाही. काहीच्या घरात हे अशाप्रकारच वातावरण असलेले आपल्याला दिसून येते.  आई बाबांनी मुलांना वेळ दिला नाही तर त्यांना आई वडिलांविषयी तितकी माया, प्रेम वाटत नाही.

अशामुळे कुठेतरी आई वडिलांच्या आणि मुलांच्या नात्यात दुरावा निर्माण होतो. पूर्वी कुटुंब एकत्र राहत असल्यामुळे मुलांना सर्वांची सवय असायची. आता वेगवेगळे राहत असल्या कारणाने काहींना आजी आजोबांचे प्रेम लाभत नाही, हयात नसेल तर ती वेगळी गोष्ट. पण एकत्र कुटुंबात राहणे जास्त आता कोणाला आवडत नाही.  मुलांना आपली आजी कोण, त्यांची माया प्रेम त्यानं लाभत नाही. काही भागात किंवा काही ठिकाणी एकत्र कुटुंब दिसत नाही त्यामुळे मुलं घरात एकटीत असतात व चांगले विचार, चांगले संस्कार होताना दिसत नाही. मग मुलं आपल्याला हव्या त्या प्रकारे वागतात कारण त्यांचा घरातील वातावरण त्यांना चांगल मिळालेलं नसत त्यांनी आपले चांगले क्षण ऐकट्यानेच पाहिलेले असते आई वडील नोकरीच्या निमंत्ताने पाहण्यासाठी वेळ नसल्यामुळे असे होत जाते. नोकरी करणे वाईट नाही परंतु आपण जेवढा वेळ नोकरी करण्यास देतो तेवढाच वेळ आपल्या घरासाठी, मुलांसाठी प्रत्येकानी दिला पाहिजे. तरच प्रेम ऐकमेकांची माया ऐकमेकांसाठी वाढेल. अशी ही आजकालची स्तिती आहे. त्याचप्रमाणे आत्ताच्या काळात जास्त अंगाई गीत म्हटलेले ऐकू येते नाही किंवा दिसून येते नाही, कारण आता आईवडीलांना वेळ नसल्या मुळे व कामाच्या व्यापामुळे आपले फोन काढून मुलांना देतात. खात नसेल तर फोन देतात, झोपत नसेल तर फोन देतात पूर्वी सारखे चिऊ ताई काऊ, माऊ या पक्ष्याचा विसर पडला आहे तो फोन मुळे. जेवत असताना गोष्ट सांगायची व एक एक जेवणाचा घास हा प्रत्येकाच्या नावाचा असायचा उदा. एक घास मामाचा, एक घास आतुचा, एक घास आईचा अशा प्रकारे त्यांना आई भरवायची त्यामुळे त्यांना आपल्या माणसांची ओळख व्हायची व आपुलकी वाढायची. असे दृश्य आता दिसून येत नाही प्रत्येक मुलांना फोन देतात त्याच्यामुळे मुलांना कोणाची आपुलकी वाटत नाही. जास्त फोन बघणे हे वाईट आहे. फोनच्या अति वापरामुळे त्यांना डोळ्यांचा त्रास होऊ शकतो, त्यांना चष्मा लागू शकतो. असे वाईट परिणाम मुलांवर होऊ शकतो. फोनच्या ऐवजी आपण आजूबाजूचे वातावरण दाखवा, पुस्तक द्या, गोष्टी सांगा, जेणेकरून ते हुशार होतील आणि चांगले संस्कार मिळतील.

कोणत्याही स्त्रीला आईच्या मातृत्वाला दोष देत नाही परंतु सध्याची ही खरी परिस्तिथी आहे. पूर्वी ज्याप्रमाणे अंगाई गात असताना जे वातावरण तयार व्हायचे ते आज कुठेतरी नष्ट झालेले आहे.

**५.८  अंगाई गीतांचा अश्यानिष्ठ अभ्यास**

**१. उदा. कुरु कुरु काना म्हशी गेल्यो रानान**

**खाऊ हाड रे मामा दाटीसून**

या अंगाई गीतातून म्हशीचा तसेच मामाचा उल्लेख आलेला आहे. बाळाला झोपवताना त्यांना आपल्या मामाची ओळख करतात सांगतात कीं ज्या प्रमाणे म्हशी देखील आपल्या घरात म्हणजे रानात गेली आहे त्याचप्रमाणे मामा सुद्धा आपल्या घरी येणार आणि येत असताना खाऊ मात्र घेऊन ये असा आशय या

गीतातून व्यक्त होतो. मामाची आपुलकी त्याच्या विषयी प्रेम वाढते. त्याचप्रमाणे आपल्या आई, बाबा यांची ही नावे घेऊन त्याला आई बाबाची ओढ बाळाला लागते.

**२. उदा. आराड गे बेपके सान जावनी**

**बाबाच्या आईक घरा येवनी**

या गीतात देखील असे मांडले आहे कीं, बेपकी म्हणजे बेडूक. बेडूक जेव्हा ओरडते तेव्हा सान झालेली असते म्हणजे संध्याकाळ झालेली असते. बाळ हे आई, वडिलांच्या आठवणीने बेडूकाला सांगितले जाते कीं, लवकर ओरड त्यामुळे संध्याकाळ होईल आणि बाळाची आई, वडील घरी येईल. आईला भेटण्याची उत्सकता दर्शवली आहे. आई विषयी प्रेम, आईला बघण्याची किंवा भेटण्याची तळमळ या गीतातून व्यक्त होते**.**

**५.९ समारोप**

या प्रकरणात अंगाई गीतांचा अभ्यास केलेला आहे. अंगाई गीताची व्याख्या, स्वरूप, अंगाई गीताच्या माध्यमातून दिसून येणारे मातृत्व, अंगाई गीतांचे महत्व, बाळांना अंगाई गीत का आकर्षित वाटते हे आपण जाणून घेतले. त्याचप्रमाणे अंगाई गीतांचे फायदे कोणकोणते आहे व एकूण अंगाई गीतांचा आशयनिष्ठ अभ्यास व अशा विषयांची चर्चा या एकूण ५ प्रकरणात मांडलेले आहे.

**५.१०. निष्कर्ष**

१. एकूण या अंगाई गीतातून आपल्याला एका स्त्रीचे मातृत्व दिसून येते.

२. ९ महिने आपल्या बाळाला आपल्या गर्भात ठेवून होणारा सगळा त्रास सहन करीत असते व खंबीरपणे आपल्या कुटुंबासाठी, मुलांसाठी नेहमी उभी असते.

३. देव सर्वत्र असू शकत नाही म्हणून देवाने 'स्त्री' या शक्तीला निर्माण केले आहे व तिला ' आई' हे नाव त्या स्त्रीला दिले.

४. अंगाई गीताच्या माध्यमातून आपल्याला बाळाचे खेळणे, चालणे, दिसणे, रूप या विषयीचे वर्णन त्यात केलेले असते.

५. आपलं बाळ शांतपणे झोपावा म्हणून ती अंगाई गीत गात असते. बाळाला शांत झोपलेला पाहून हे प्रत्येक आईला सुख असते किंवा वाटते.

६. अंगाई गीत एखाद बाळ ऐकतो तेव्हा त्याला कोणतरी बाजूला आहे ही जाणीव होते व आईचे आणि बाळाचे नाते हे प्रेमळ आणि सुंदर बनते.

७. असे म्हणतात कीं प्रेम हे आंधळे असते याचे कारण फक्त एकच ते म्हणजे मुलं गर्भात असताना आपल्या बाळाला न पाहताच आई आपल्या बाळावर प्रेम करते काळजी करते.

८. मधुर अंगाई गीत आणि आपल्या आईच्या हाताचा स्पर्श म्हटला कीं बाळाला शांत व सुरक्षित वाटते.

९. अंगाई गीतामुळे तो इतर होणारी वेदना, त्रास या आईच्या हातांच्या स्पर्शाने दूर होतो व शांत झोपतात.

१०. पूर्वीसारखे अंगाई गीत गाताना पाहायला मिळत नाही व कोणाला ते तोंडी पाठ सुद्धा नाही.

तर हे आपण टिकवले पाहिजे त्यामुळे हा अंगाई गीतांचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

**संदर्भ**

अडवईकर लक्ष्मी सीताराम , वय ८५ , अडवई गावातील रहवासी

# प्रकरण – ६

# लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास

**प्रास्ताविक** .......... **72**

**६.१ भाषेचा विचार** .......... **72**

**६.२ अलंकाराचा शोध** .......... **73**

६.२.१ . अलंकार .......... **73**

६.२.२ अलंकाराचे प्रकार .......... **73**

**६.३ परिवर्तन झालेले शब्द** .......... **75**

**६.४ समारोप** .......... **77**

**६.५ निष्कर्ष** .......... **78**

**प्रास्ताविक**

प्रस्तुत प्रकरणात लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास केलेला आहे . त्यामध्ये एकूण लोकगीतांचा भाषेचा विचार केला आहे . तसेच लोकगीतात अलंकार शोधकण्याचा प्रयत्न करून लोकगीतात आलेले प्राचीन शब्द त्याचप्रमाणे परिवर्तन झालेले शब्दांचा विचार या प्रकरणात केले आहे .

**६.१ भाषेचा विचार**

लोकगीताची रचना आशयदृष्ट्या साधी, सरळ, असून आविष्कारदृष्ट्या लयबद्धता हे लोकगीताचे आकर्षणकेंद्र असते. लोकगीताची आवाहकता स्थलकालातीत असते, ती या लयीमुळेच. शिवाय त्याची आद्य रचना कितीही जुनी असली, तरी लोकाचारात ते गीत नित्य नव्याने आविष्कृत होते. लोकगीते मौखिक परंपरेने चालत आलेली असल्याने त्यांत अनेक उच्चार बदलही होतात. क्वचित काही भाग विस्मृतीत जातो. विविध परंपरांतील गीतांची क्वचित सरमिसळ होते आणि अर्थदृष्ट्या गीत दुर्बोध होत जाते. तरीही स्वर-लयीच्या आकर्षणाने आणि तत्संबद्ध कृतीमुळे ते लोकाचारात टिकून राहते

लोकगीतांची रचना बहुधा चारचरणी आणि सुगम असते. त्यांचा आविष्कार (गायन) सामूहिक असतो. निदान ध्रुवपदगायन सामूहिक असते व ते घोळून घोळून म्हणणे हे लोकगीताचे वैशिष्ट्य असते. दैनंदिन

श्रमाची कामे, एखादे विधिविधान किंवा क्रिडा अशांसारख्या कृतींबरोबर बहुधा लोकगीत येते. त्यामुळे कृतिसंबद्ध शारीरिक हालचालींशी गीताची लय बांधलेली असते. आविष्कार व शब्दरचना या दोन्ही दृष्टींनी लोकगीत  लवचिक असते. गायकाची कृती व भावावेग यांबरोबर ते आपले रूप थोडेफार बदलते.

लोकगीते लोकबोलीतच उत्स्फूर्तपणे रचली जातात. लोकगीतांचा प्रत्येक पाठ अधिकृत असून त्यांच्या चाली पारंपरिक असतात. लोकगीते कृतिसंबद्ध असल्याने ती प्रयोगरूप असतात. लोकजीवनाची व समूहमनाची अभिव्यक्ती, धर्मविधीचा एक भाग, श्रम हलके करणे अशा अनेक गरजांची पूर्ती लोकगीते करतात.

**६.२ अलंकाराचा शोध**

**६.२.१ . अलंकार**

अलंकार या शब्दाचा अर्थ 'दागिना' असा आहे. दागिने घातल्याने माणसाच्या शरीराला शोभा येते. त्याचे सौदर्यात भर पडते. जी गोष्ट व्यक्तीची तीच भाषेची असते. आपली भाषा अधिक परिणामकारक किंवा चांगली दिसावी म्हणून नेहमीच साधी भाषा न वापरता आपण वेगळ्याच पद्धतीने सादर करून ती अधिक आकर्षिक करण्याचा प्रयत्न करतो. त्यातूनच विविध शब्द -अर्थ अलंकार मनमोहक आकार घेऊ लागतात.

**६.२.२ अलंकाराचे प्रकार**

अनुप्रास, यमक, उपमा, रूपक, व्यतिरेक, भ्रातिमान, अतिशयोक्ती, सार,

,स्वभावोक्ती ,उत्प्रेक्षा, व्याजस्तुती, चेतनगुणोक्ती, दृष्टांत, पर्यायोक्ती, विरोधाभास, अन्योक्ती इत्यादी.

लोकगीतात जास्तप्रमाणे आपल्याला अनुप्रास, उपमा, रूपक, अतिशयोक्ती असे अलंकार असलेले दिसून येतात.

उपमा हा अलंकार लग्न गीतात जास्त प्रमाणात दिसून येतो. प्रत्येक विधित व्यक्तीला किंवा वस्तूला कुणाची ना कुणाची उपमा दिलेली दिसून येते.

घरातील नवीन लग्न झालेल्या मुलीला सासरी महालक्ष्मीची उपमा दिलेली आहे. ज्याप्रमाणे देवी लक्ष्मी घरात प्रवेश करताना सुख, समृद्धी घेऊन येते त्याचप्रमाणे नवरी त्या घरात सुख समृद्धी घेऊन येते यावरून तिला महालक्ष्मीची उपमा दिलेली आहे.

**उपमा अलंकार :-**

दोन वस्तुतील साम्य चमत्कृतीपूर्ण रीतीने जेथे वर्णन केलेले असते तेथे उपमा हा अलंकार येतो.

१. लग्नात नवरी नवरा ऐकमेकांना माळा घालत असताना त्या दोघांना राम आणि सीता यांची उपमा दिलेली आहे.
२. 'दिर जेवण' या गीतात दिरांना कॉमेची म्हणजेच कोंबड्याची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे कोंबडे जेवतात त्याच प्रमाणे दिर लग्नाच्या रात्री त्याची नवीन आलेली वहिनी जेवण वाढते तेव्हा तें कोंबड्या सारखे जेवतात त्यामुळे त्यांना कोंबड्याची उपमा दिली आहे.
३. एका फुगडी गीतात  सासूची चांगले गुण सांगितले आहे म्हणजे ती आपलीच सासू नसून आपली 'आई 'आहे अशी उपमा दिलेली आहे. तर आणखी एका फुगडी गीतात सासूला 'घूस' याची उपमा दिलेली आहे एका बाजूने चांगुलपणा व्यक्त करते तर एका बाजूने राग व्यक्त केलेला दिसून येतो.

**यमक अलंकार**

कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्य किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळया अर्थाने आल्यास 'यमक' हा अलंकार होतो.

'गणपती देवा' या फुगडी गीतात **'रे'** हा प्रत्येक ओळीत आलेले आहे. या गीतातून यमक हा अलंकार दिसून येतो.

'सकाळच्या पारी शंक वाजवीला ' या फुगडी गीतात शेवटी **'ला'** हा यमक आलेला आहे. त्यामुळे यामध्ये यमक हा अलंकार दिसून येतो.

**६.३ परिवर्तन झालेले शब्द**

गीतामध्ये अनेकदा शब्द तोच असतो परंतु ज्या गीतामध्ये येतो त्या त्या गीतात त्याचा अर्थ वेगळा होतो किंवा पूर्वी तो शब्द दुसरा होता तर त्याच शब्दाचा आता पर्यायी शब्द आपण दुसरा शब्द वापरतो.

१. पंगाराचे होडे - पंगाराचे हे एक प्रकारचे झाड व या झाडाच्या लाकडापासून होडे बनवले जाते.
२. इयाला - याचा अर्थ फुलला असा आहे.
३. बत्तीस पाना विडो- लग्न गीतात अशी ओळ आहे तर बत्तीस पाना विडो म्हणजे बत्तीस पाने आणि एक सुपारी देवासमोर ठेवतात. प्रत्येक देवाला प्रत्येक ठिकाणी आपण पानाचा विडा ठेवू शकत नाही तर यामुळे सगळ्या देवांचा मान या बत्तीस पाना विडो यांचावर केला जातो. काही एखादा राहिला असेल तर या बत्तीस पानात त्याचा मान काढला आहे हे अभिप्रेत ठरते.
४. वायना - घाणा भरत असताना म्हणजे आपण हळदीच्या दिवशी हळद कुटली जाते तर हळद कुटत असताना ज्या दांड्याचा वापर करतो त्या दांड्याला वायना असे म्हणतात.
५. त्याचप्रमाणे वायना याचा दुसरा अर्थ म्हणजे हळदीकुंकूवाच्या दिवशी सुहासिनीचा मान करून त्यांना भेट दिली जाते त्याला वायना म्हणतात. या एकच शब्दाचे दोन अर्थ निगतात.
६. व्हाण - याला आता चप्पल म्हटले जाते. काही ग्रामीण भागात चप्पल याला अजून व्हाण म्हटली जाते. आता त्यात परिवर्तन झाले असून ती व्हाण या शब्दाचे चप्पल असे झाले आहे.
७. पाघड - शाल नवरा नवरी ते वापरतात जेव्हा गठबंधन असते तेव्हा या नवऱ्याची आणि नवरीची शाल घेऊन गठबंधन केले जाते त्याला पूर्वी पाघड म्हणायचे आता परिवर्तन झाल्या कारणाने आपण त्याला 'शाल' म्हणतो.
८. थाम - हळदीची पाने त्याला आपण थाम म्हणतो. हा थाम गणेश विसर्जनच्या वेळी घरातून गणपती बाहेर काढतात तेव्हा अंगणात राहून हातात थाम व तांदूळ घेऊन चार वेळा घरासमोरून वर खाली करून पाचव्या वेळा घरावर फेकले जाते. म्हणजे देवाचा आशीर्वाद आपल्या घरावर असू दे असा समज त्यावेळी होता व अजून ते केले जाते. त्याचप्रमाणे हळदीच्या पानावर आपण नागपंचमीला 'पातोळया ' करण्यासाठी देखील या हळदीचे पान वापरले जाते.

९. थालीथमाट - प्रमाणभाषेत त्याला आपण भांडी म्हणतो. पूर्वी त्याला थालीथमाट असे म्हणायचे.

१०.सामळी – बांबूपासून बनवलेली छोटीसी टोपली.

११.वाकर – पुरुष आपली दाडी मिशी कापण्यासाठी कातरीचा वापर करतात त्याला पूर्वी वाकर म्हणत होते.

१२.उलासला - हुलागला म्हणजे 'संपला ' असा त्याचा अर्थ होतो.

१३.यल्लमती - याचा अर्थ रुजणार असा होतो.

१४.बंधू - म्हणजे आपला ' भाऊ ' असे म्हटले जाते.

१५.वायीली - याचा अर्थ 'अर्पण' करणे असा आहे.

१६.धाशी - याचा अर्थ लेक

१७.भाके - शब्द जपणारा, शब्दाला पोहोचणारा या अर्थाने आहे.

१८.बंगऱ्यांनी - बंगऱ्यांनी म्हणजे भांडीवाला त्याला आपण बोली भाषेत आयदानकार असे म्हणतो.

१९.थोरला -म्हणजे मोठा भाऊ त्याला आपण मोठा भाऊ न म्हणता थोरला म्हणतो.

२०.थंयसर - म्हणजे त्या ठिकाणी असा आहे.

२१.इस्तारला - याचा अर्थ मोठा झाला असा होतो. हे आपण झाडांच्या बाबतीत हा शब्द वापरतो. म्हणजे जी बी आपण पेरली आहे त्याला कोंब आला आहे रुजून आला आहे असा त्याचा अर्थ होतो.

२२.जल्मजूगी -आयुष्यभर असा आहे.

२३.आमो - आंब्याचे झाड त्याला आपण आमो म्हणतो.

२४.दहिशांनी - भट, पुरोहित

२५.येर्थ - अर्थ असा आहे.

२६.सोपे - याचा एक अर्थ म्हणजे 'सोपे' याला बोली भाषेत आपण सोप्यार असे म्हणतात गॅलरी असे म्हणतो व तिथे पूर्वीच्या घरात बसण्यासाठी सिमेंटचा बसण्यासाठी बाक कसा केला जायचा तर त्याला आपण पूर्वी सोपे असे म्हणायचे. आताच्या घरात ते दिसून येत नाही आता सगळेजण सोफाचा वापर करतात. दुसरा अर्थ 'सोपे' म्हणजे नवीन नवरी हिला दोन्ही हाताने एका वाटीत तेल घालून

त्यात पान बुडवून देवाकडे दोन्ही हाताने केळीच्या पानावर पसरवते पण दिमियानी बसून कुळ देवाकडे मागणे मागते कीं आज पासून या घरची झाली आहे तर या घरातील माणूस आहे असे देवाला सांगितले जाते याला देखील 'सोपे' मागणे असे म्हणतात.

२७.फुगडी गीतात काही शब्द आहे त्यांचे पर्याय शब्द आहे त्यात ही परिवर्तन झालेले दिसून येते.

२८.वंडिक - भिंत असा आहे. पूर्वी लोक भिंतीला ' वळत ' असे म्हणायचे पण त्यात परिवर्तन होऊन भिंत असे झालेले आहे.

२९.धपटी - कांबळ

३०.विटाळ - स्पर्श करणे, त्याचा वापर आदीच कोणी केलेला असतो तर हा शब्द वापरला जातो.

३१.हयसर - इथे ये असा अर्थ आहे.

३२.दुडू - पैसे

३३.एका फुगडी गीतात आगगाडी, विमान, होडी यांचा उल्लेख आलेला आहे.

३४.अनेक शब्दाचे अर्थ हे परिवर्तन झालेले आहे. परंतु पूर्वीचे शब्द कसे होते उच्चार कसा होता हे आपल्या लक्षात येते. त्याचप्रमाणे त्यात परिवर्तन झालेले आहे.

३५.अंगाई गीतातील शब्द

३६.दाटीसून -याचा अर्थ दुकान

३७.आराड -याचा अर्थ ओरडणे

३८.बेपके - बेडूक हा एक प्राणी आहे

**६.४ समारोप**

एकूण या प्रकरणात लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास केलेला आहे. यात तिसरे, चौथे आणि पाचवे या सर्व प्रकरणात केलेला लग्न गीतांचा अभ्यास, फुगडी गीतांचा अभ्यास, आणि अंगाई गीतांचा अभ्यास या सर्व गीतांचा वाङ्मयीन अभ्यास केलेला आहे. प्रत्येक प्रकारच्या गीतातील भाषेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे या सर्व गीतात अलंकार शोधण्याचा प्रयत्न केला आहे. परिवर्तन झालेल्या शब्दांचे

अर्थ किंवा आधुनिक काळात त्या शब्दाला पर्यायी शब्द कोणता याचा शोध  या ६ व्या प्रकरणात केलेला आहे.

**६.५ निष्कर्ष**

१. लोकगीताच्या माध्यमातून आपल्याला अनेक गोष्टीचा परिचय झालेला आहे.

२.  फुगडी गीतातून स्त्रीचे मन, भावना, प्रश्न ते फुगडी गीतातून व्यक्त करतात.

३.  त्याचप्रमाणे लग्न गीताच्या माध्यमातून लग्नाच्या विधी आपल्याला समजून येतात.

४. श्रम कमी करण्यासाठी दळण, कांडण करताना ओव्या म्हटली जातात हे आपल्याला या अभ्यासातून जाणवते. त्याचप्रमाणे विधीचा क्रम या लग्न गीतामुळे आपल्याला समजते.

५. अंगाई गीतामुळे स्त्रीचे मातृत्व लक्षात येते.

६.  स्त्रीचे जीवन ती गरोदर असल्यापासून ते बाळाचा जन्म झाल्या नंतर सुद्धा झालेला सगळा त्रास सहन करून आपल्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभी असते.

७.  बाळासाठी ती कोणतेही दुःख, त्रास भोगायला पाठी राहत नाही. हे या अंगाई गीतातून समजते.

८.  एकूण या गीतातून आपल्या समाजात घडत असलेल्या लग्न विधीच्या संदर्भात त्याचप्रमाणे फुगडी गीत आपल्याला स्त्रीचे जीवन अधोरेखित होते.

# प्रकरण -७

# समारोप , निष्कर्ष

**समारोप**

‘ सत्तरी तालुक्यातील अडवई आणि पिसूर्ले गावातील लोगीतांचा विवेचनात्मक अभ्यास’ असा विषय मी संशोधन करण्यास निवडला आहे. यात एकूण ६ प्रकरणे केलेली आहे. पहिल्या प्रकरणात एकूण लोकसाहित्य म्हणजे काय, संकल्पना, व्याप्ती, लक्षणे व अभ्यासकांनी मांडलेली लोकसाहित्याची व्याख्या या सर्वाचा अभ्यास या पहिल्या प्रकरणात केलेले आहे.

त्याचप्रमाणे दुसऱ्या प्रकरणात अडवई आणि पिसूर्ले गाव : सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास केलेला आहे. त्यामुळे आपल्याला या गावात होणारे सण, उत्सव, लोकांचे आचार विचार आपल्याला स्पष्ट होतात. तसेच तिसऱ्या प्रकरणात लग्न गीतांचा अभ्यास केलेला आहे. त्यामुळे लग्न गीतातून अनेक विषय म्हणजे देव दैवतांचा उल्लेख, अन्ना विषयी उल्लेख, चित्रमय शैली, लग्न गीताचे महत्व, स्वरूप यामध्ये मांडले आहे. लग्न गीतांचा एकूण आशयनिष्ठ अभ्यास केलेला आहे.

चौथ्या प्रकरणात फुगडी गीताचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये फुगडी गीताचे स्वरूप, महत्व आणि आशयनिष्ठ अभ्यास केलेला आहे. आपल्याला फुगडी गीतातून स्त्रीचे जीवन कसे आहे याबद्दल समजते व स्त्री स्वतःचा विचार न करता कुटुंबासाठी आपले आयुष्य जगत असते. पाचव्या प्रकरणात अंगाई गीताचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये देखील अंगाई गीत म्हणजे काय? मुलांना हे गीत का आकर्षित वाटते या संबधित माहिती दिलेली आहे. अंगाई गीतांचे महत्व सांगितले आहे. आशयनिष्ठ अभ्यास केलेला आहे. एक एक अंगाई गीताचे विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे यातून आपल्याला स्त्रीचे मातृत्व दिसून येते.

सहाव्या प्रकरणात लोकगीतांचा वाङ्मयीन अभ्यास केलेला आहे. या अभ्यासामुळे आपल्याला पूर्वीचे अनेक प्राचीन शब्दाचा परिचय झाला. शब्दाचे परिवर्तन झालेले आहे. काही कठीण शब्दाचा परिचय होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक गीतात अलंकार शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे आपल्याला समजते की लग्नगीतात फुगडी गीतात, अंगाई गीतात उपमा हा अलंकार जास्त दिसतो. या सर्वाचा अभ्यास या सहा प्रकारणांद्वारे केलेले आहे आणि लोकगीताचा विवेचनात्मक अभ्यास करण्याचा इथवर प्रयत्न केलेला आहे.

अडवई आणि पिसूर्ले सारख्या गावात आजवर संकलन झालेले नव्हते तर हे भाग्य मला लाभले आहे. उधिष्ट व गृहीतक ज्याप्रमाणे मांडले आहे त्यानुसार अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास करण्याकरिता मी काही अभ्यास पद्धतीचा वापर केलेला आहे क्षेत्रीय अभ्यास पद्धती या पद्धतीमुळे संकलन करण्यासाठी सोपे झाले होते. त्याचप्रमाणे वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचा वापर करून लोकगीतांचा वर्णनात्मक अभ्यास केलेला आहे. अशा काही अभ्यास पद्धतीमुळे संशोधन करणे सोपे आणि सुलभ झाले आहे व एकूण संशोधन केलेले आहे.

**निष्कर्ष**

१. अडवई आणि पिसूर्ले गावात महार जातीचा उल्लेख जास्त सापडतो.
२. गावातील सण, उत्सव, कशाप्रकारे साजरे करतात आणि प्रथा, परंपरा टिकविण्याचा प्रयत्न या गावातील लोक करतात.
३. लग्न गीतात काही चरणाची पुनरावृत्ती असते.
४. पहिल्या चरणातील सर्व शब्द तेच ठेवून फक्त वस्तूंची किंवा व्यक्तीची नावे बदलून ते चरण म्हटले जाते व दुसरे चरण समान ठेवतात.
५. एकूण फुगडी गीतातून आपल्याला स्त्रियांच्या मनात घर करून असलेले प्रश्न, चिंता, दुःख मनातील भावना या फुगडी गीतातून व्यक्त होते.
६. पूर्वीचे स्त्रियांचे जीवन कसे होते हे या फुगडी गीतातून आपल्याला समजते.
७. स्त्रीची देवावरील असलेली श्रद्धा, विश्वास, उत्सुकता आपल्याला दिसून येते.
८. अंगाई गीतातून आपल्याला एका स्त्रीचे मातृत्व दिसून येते.
९. देव सर्वत्र असू शकत नाही म्हणून देवाने स्त्री या शक्तीला निर्माण केले आहे व तीला आई हे नाव स्त्रीला दिले गेले आहे.
१०. अंगाई गीतातून बाळाचे खेळणे, चालणे, दिसणे, रूप या विषयीचे वर्णन त्यात केलेले असते.
११. अंगाई गीतामुळे बाळाला इतर होणारी वेदना, त्रास हा आईच्या हाताच्या स्पर्शाने विसरतो व बाळ शांत झोपतो.
१२. त्याचप्रमाणे पूर्वी ज्या प्रमाणे अंगाई गीत गात असत त्याप्रमाणे आता अंगाई गीत जास्त गात असताना आपल्याला दिसून येते नाही.

१३.लोकगीताच्या माध्यमातून आपल्याला अनेक गोष्टीचा परिचय होतो.

१४.फुगडी गीतातून स्त्रीचे मन भावना, प्रश्न फुगडी गीतातून व्यक्त होते.

१५.लग्न गीताच्या माध्यमातून लग्नाच्या विधी आपल्याला समजून येतात

१६.श्रम कमी करण्यासाठी दळण, कांडण करताना ओवी म्हणतात.

१७.विधीचा क्रम या लग्न गीतामुळे समजते.

१८.बाळासाठी स्त्री दुःख वेदना स्त्री भोगायला तयार असते हे अंगाई गीतामुळे समजते.

१९.लोकगीताच्या माध्यमातून लोकजीवनाचे दर्शन घडते.

२०.लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते.

२१.लोकगीतात वाङ्मयीन मूल्य दडलेले आहे.

२२.लोकगीतामधून धार्मिक, कुटुंबिक, सामाजिक विषयाचे विवेचन दिसून येते.

२३.लोकगीतातून लोकसंकृतीचे समालोचन करतात.

२४.लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या व प्रचलित असलेल्या सर्व बाबींचा समावेश लोकसाहित्यात होते.

# परिशिष्टे

## लग्नगीते

(जात्यावरची गीते  दिवा लावल्यावर गायले जातात )

१. हाड गे खाणी माणया जाती

देवाच्या देव रम्माक हाडूक चला

तेने महुर्त दिला जाती माणयाला

पाच पुडाची सामळी बत्तीस पाना विडो

पयलो विडो थेया धर्तरी मातेक

धर्तरी माता गे भोवण्याने येई

एक सात देई कार्यवारी

पाच पुडाची सामळी

दुसरो विडो थेया केळबायी आईक

तिसरो विडो थेया गे म्हादेवा देवाक

**दळीली पिठाखुटा भाजीले वडे**

**मामाक हाडूक गेले**

**मामाचे न्हयीक पंगाराचे होडे**

**मामा येईना जालो...**

**दळीली पिठाखुटा भाजीले वडे, शियळीले घोडे**

**बहिणीकहाडूक गेले**

**बहिणीचे घाटियेर कोवडो इयाला**

**खर्चाक भियालो बहीण मेव्हणो येयना जालो**

**येना जाल्यार बरो जालो अयाराचे शले कार्याक जाले**

**हडीलो शेलो उडायलो दालीयेर**

**अयाराक बस गे बहीण मेव्हणो**

**अयार घे गे बहिणी**

**२. घाणो भरताना गीत**

खानार कुराडी गे खय चालले वावरवाडी

रानानी वसुन चंदन सोदी

फूडले लूण सोडा आणि फाटले लूण सोडा

आणि मधल्या लुणाची खोडी जोडा

वायना खोलयी मुसळ झेलयी

देवाच्या देव रम्माक घाणो भरुक बोलाई

तिने महुर्त दिला घाणो भरियाला

घाणो गे भरीला खाणीया भाताचा

सूर्याच्या किरणी घाणो उलासला

**३. हळद लायताना**

पाऊस लागेता सोनियाचा

थाम रुजला हळदीचा

आल्यालो पाल्यालो

नारलाचे गे तेल

कुळाक तेल चढई राया रायी म्हादेवाच्या गौरी

**४. नवऱ्याक हळद लायताना**

नक्षी तेल चढईल

मस्तकी तेल चढईल, चढईल राया रोहिणी

म्हादेवाच्या गवरीणी

**५. रॅग गीत**

सोनेची गुळाली सोनेचो वाकर

मेव्हणो चाकर नवऱ्याची रॅग धरी

वाकर खरखरीन काळीज थरथरीन नवऱ्या मेव्हण्याचे

**६. करे भरताना**

खण खण कुढळी खणीची माती

आंबो लायला रातीर

महूर्ताच्या कऱ्यांसाठी

**७. निबं करताना**

गंगेचे गे पाणी, गंगेचे गे पाणी

बाय बांधली बानावळी, तळी बांधली चिरेबंदी

असं आई बाप गियाणी पुत्राक पाणी घाली

पाच जाणा पुत्राची नवऱ्याची आई

तिने लायीला सारंगी पाठ

पाणियेच्या पाठाला माड याल्लमती

माडाच्या नारळ कारणांक जातीत

**८. नवरो भितन सरताना (निबं करून )**

अरेरे पुता काय मागशी

मागान धाशी म्हशी

**९. केळवण**

केळवणीच्या मधी केळवण गे

केळवाणिक झाली रात

मामाचे केळवाणिक झाली रात

केळवाणीच्या मधी केळवण गे

बहिणीचे केळवाणिक झाली रात

केळवाणीच्या मधी केळवण गे

आत्याच्या केळवाणिक झाली रात

**१०.भाशिंग वरश्याच्या घरातून आणत असतानाचे गीत**

गिरजा गोरी जाताना दोशी दोन बाजार

आम्हा लागी गराज गे व्हणाची

आम्हा लागी गराज पैरिगेची

गिरजा गोरी जाताना दोशी दोन बाजार

आम्हा लागी गराज गे पाघड्याची

आम्हा गराज गे पघडीची

गिरजा गोरी जाताना दोशी दोन बाजार

आम्हा लागी गराज गे भाशिंगाची

११.**भाशिंग बांधताना**

थोराचा नवरा बसला आळीयेर

रुसला बाळीयेर

सांगुनी धाडा गे लेकीच्या बापाला

देईन देईन धाशी का म्हशी गे

दिल्याल्या सहित्याक येर्थ ना

थोराचा नवरा बसला आळीयेर

रुसला बाळीयेर

वसोनी सांगा गे लेकीच्या आईला

देईन देईन थालीथमाण

थोराचा नवरा बसला आळीयेर

रुसला बाळीयेर

जाऊनी सांगा लेकीच्या बंधुला

देईन देईन पाठीची बहीण

**१२.नवरो लग्नाक भायर सरताना**

लग्नाक बाळ जाता

कोणा गे सजणीचा

तीजा पेहराव गे व्हाणाचा

तीजा पेहराव पेरिंग, शालो, पाघडी, भाशिंग चा

बाळ लग्नाक जाता

**१३.लग्नाक मांडवात भितर सरताना**

नवरो बसलो घोडेवरी

नवरी बसली हत्तीयावरी

उठ गे सीते गुंत गे माळा

लग्नाची झाली येळा

घटका घालून महुर्त दिला दहिशांनी

सीतेन माळा वायीली रामा पाशी

रामान माळा वायीली सीते पाशी

**१४.लायो घालताना**

आवय बापायचे लाडकी धु

भोव भोव गे भवरू ले

बापायन वाडईली देशी माशी

आवयन वाडईली खानी केशी

बंधून दिली परक्याच्या हातीन

आवय बापायचे लडकी धु

भोवन ये गे चौकडी

सानी पाय लायी

**१५. कन्यादान**

भट करी भटपान

बप्पा करी कन्यादान

काय पुतरा मागशी

घालीन अंगठी

भट करी भटपान

मेव्हणो करी कन्यादान

काय मेव्हण्या मागशी

काय भावजी घालीन

घालीन सरपळी

मावशी करी कन्यादान

काय पुतरा मागशी

देईन देईन

देईन थाली मनानं

१६. **घर भरताना**

लामण दिवो उजवो पाय

घरान यो गे महा लक्ष्मी

कुळाच्या कुळ देवा

ये सोपे मानून घे गा

आयचान गावलो गे भाके कुळ देवाचे

कुळाच्या कुळ देवा

ये सोपे मानून घे गा

आयचान गावलो गे भाके म्हादेवाचे

कुळाच्या कुळ देवा

ये सोपे मानून घे गा

आयचान गावलो गे भाके शांतादुर्गाचे

**१७.कडेमुड्यार**

हाडगे म्हारणी फुलंया दाळी

तेजेर सोडी कमल साडी

तेजेर सोडली जमखणा

तेजेर बसली चौगाजाणा

पुता घे गे उजव्या मांडीयेर

काणियेन हात घाल गे सुने

काणीयेन घाले रतन

ते दिगे मावापाशी

मावान पारकिले दिया जोतिर

ते घाल गे जल्मजुगी

काणीयेन हात घाल गे सुने

काणीयेन घाले रतन

ते डी गे मायी पाशी

मायन  पारखीले दिया जोतिर

ते घाल गे जल्मजुगी

काणीयेन हात घाल गे सुने

काणीयेन घाले रतन

ते डी गे दीरा पाशी

दिरान परिखिले दिया जोतिर

ते घाल गे जल्मजुगी

**१८.दीर जेवाण**

साळी दाळीचे तानूळ

मुगाचे वराण

थोराचा जेवाण आमच्या भावोजीचे

दीर जेईता...

कोमे कोमे..

वनी वाडीता थेमे थेमे

साळी दाळीचे तानूळ

मुगाचे वराण

थोराचे जेवाण आमच्या भावोजीचे

दीर जेईता..

कोमे कोमे...

वनी वाडीता थेमे थेमे..

**१९. आमो शिपणे (शिपताना**

मोठ्याने घराचा कैर काढला बाहेर

तेथून मेळला आंब्याची पायीर

मारा एक कुदळ काढा एक धेप

तेतुन लाया रोपा आमियाचा

कडाचे धाकणे दुधाचे शिपणे

आमिया कोमयाला

आमी या राजा इस्तराला

आमो शिपा गे सुंदरे

आमो नायी आतळी

आमो नायी पातळी

आमे पैदा झाले

नन्ना रे नन्ना नन खेळे गोपी

कृष्णान खेळ मांडला

राधा का बिती

लोकांच्या चेडवाक लायता बोटी

नन्ना वो नन्ना नंन खेळे गोपी

**२०. दार धरताना**

सात समुद्र बाहेर झिळमीळ पाणी जायी गे

थंयसर बंधूबा तोंड धुयी गे

खबर कळली सुभेद्र बहिणीक

घाटी डोंगर काढुनी कशे बहिणी आलय गे

काय सांगू बंधूबा लेकी कारण

दरातली केळी गे ना तुका बोणी गे

सात समुद्र बाहेर झिळमीळ पाणी जायी गे

थंयसर बंधूबा लगीन न्हायी गे

खबर कळली सुभद्रे बहिणीक

घाटी डोंगर चढूनी कशे बहिणी आलय गे

काय सांगू बंधूबा लेकी कारण

दरातल्या माड गा ना तुका हिट बा

चेडू मागता बहीण ना...

## फुगडी गीते

**१. गणपती देवा कारीन तुझी सेवा**

नवस वाहिन रे.. देवा नवस वाहिन रे..

पाच फुलांनी, पाच फळांनी दुर्वा वाहिन रे..

देवा दुर्वा वाहिन रे..

कपाळाचा कुंकू दे जन्मभर आणि काही मागीन रे...

देवा आणि काही मागीन रे..

गणपती देवा कारीण तुझी सेवा

नवस वाहिन रेदेवा.. नवस वाहिन रे..

पाच फुलांनी, पाच फळांनी दुर्वा वाहिन रे..

गळ्यातला मणी दे जन्मभर आणि काही मागीन रे..

देवा आणि काही मागीन रे...

**२. पाऊस लागेता झिरीमिरी...**

वंडिक काडीली शेणामाती, वंडिक काडीली शेणामाती

वंडिक पूजीला गणपती, वंडिक पूजीला गणपती

येगे माटूले दिगे नारळ, येगे माटूले न्हींगे नारळ

काही दिसेचा चमत्कार काही दिसेचा चमत्कार..

तेका पहिला नमस्कार, तेका पहिला नमस्कार..

वंडिक काडीली शेणामाती, वंडिक काडीली शेणामाती

वंडिक पूजीला गणपती, वंडिक पूजीला गणपती..

येगे माटूले न्हींगे ताळो, येगे माटूले न्हींगे ताळो

काही दिसेचा चमत्कार, काही दिसेचा चमत्कार..

वंडिक काडीली शेणामाती, वंडिक काडीली शेणामाती..

येगे माटूले न्हींगे भेणो, येगे माटूले न्हींगे भेणो..

काही दिसेचा चमत्कार.. काही दिसेचा चमत्कार...

वंडिक काडीली शेणामाती, वंडिक काडीली शेणामाती

वंडिक पूजीला गणपती, वंडिक पूजीला गणपती..

येगे माटूले न्हींगे दोडगे, येगे माटूले न्हींगे दोडगे

काही दिसेचा चमत्कार.. काही दिसेचा चमत्कार...

**३. हातीन दांडा, धपटी घेऊन खांद्यावरी,**

हातीन दांडा धपटी घेऊन खांद्यावरी..

हरी दाखय म्हाका पंढरीची वाट, हरी दाखय म्हाका पंढरीची वाट..

पंढरी जाताना उभी रावली चिरा, पंढरी जाताना उभी रावली चिरा..

विठोबाची नदर रुक्मिणीच्या तीळयार,

विठोबाची नदर रुक्मिणीच्या तीळयार

हातीन दांडा, धपटी घेऊन खांद्यावरी,

हातीन दांडा, धपटी घेऊन खांद्यावरी..

हरी दाखय म्हाका पंढरीची वाट, हरी दाखय म्हाका पंढरीची वाट..

पंढरी जाताना उभी रावली चिरा, पंढरी जाताना उभी रावली चिरा

विठोबाची नदर रुक्मिणीच्या चूडूयार,

विठोबाची नदर रुक्मिणीच्या चूड्यार....

४. वयले वयले डोंगरी जोता बांधीली पांढ्यांची

जोता बांधीली पांढ्याची...

नागराच्या ठसाला, ठसा लागली एक पेटी

ठसा लागली एक पेटी

पेटी उघडून पाहिली, भितर जानकी सीता बाई,

भितर जानकी सीता बाई..

सीताबायी पत्र लिही, पहिले पत्र कोणाला

पहिले पत्र कोणाला..

पहिले पत्र सूर्याला, तुम्ही सारे देवता..

याहो सीतेच्या स्वयंवारा, याहो सीतेच्या स्वयंवारा...

५. आंब्या तुझो ताळो, ताळो मोडून रत घडवीला..

रत घडवीला शांतादुर्गा आईन, रत घडवीला शांतादुर्गा आईन

शांतादुर्गा आईची झाली करुणा, शांतादुर्गा आईची झाली करुणा..

शांतादुर्गा आई आता ये चरणां..

६. तेंडलिनीच्या मटवापोना बसून काडली रात गो..

मावाच्या कुडीन गेल्यार सोऱ्याचो वास गो..

सोरो गेला संपून बाटल्याचो राशी गो..

तेंडलिनीच्या माटवापोना बसून काडली रात गो..

माईच्या कुडीन गेल्यार पानाचो वास गो..

पाना गेला संपून चूमळाचो राशी गो..

तेंडलिनीच्या माटवापोना बसून काडली रात गो...

७. हारशी मोडून खुर्ची केली माझ्या बाबाला बसायला

माझ्या बाबाला बसायला..

बाबा बसे खुर्चीवरी त्याचा फोटो काढूया सुटावरी..

हारशी मोडून खुर्ची केली माझ्या आईला बसायला

माझ्या आईला बसायला..

आई बसे खुर्चीवर तिचा फोटो काढूया शालवावरी

तिचा फोटो काढूया शालवावरी..

८. हातात पुस्तक घेऊनी, हातात पुस्तक घेऊनी ..

सासोऱ्याने उजात टाकयाले, सासोऱ्याने उजात टाकयाले

हे सुख दुःख    कोणाचे, हे सुख दुःख कोणाचे.

हे सुख दुःख  आई बाबांचे, हे सुख दुःख आई बाबांचे

हातात पुस्तक घेऊनी, हातात पुस्तक घेऊनी..

दिराजीने उजात टाकयाले, दिरोजीने उजात टाकयाले

हे सुख दुःख कोणाचे, हे सुख दुःख कोणाचे..

हे सुख दुःख दादा वहिनीचे, हे सुख दुःख दादा वहिनीचे..

९. सकाळच्या पारी शंक वाजवीला

सकाळच्या पारी शंक वाजवीला

शंकाच्या नादाने गोविंद उठला..

शंकाचे नादाने गोविंद उठला...

गोविंद उठोनी पाण्याशी गेला..

पाण्याचा विक्टल माश्यानी केला..

कशी करू देवा आता लिंगाची पूजा..

सकाळच्या पारी शंक वाजवीला

शंकाच्या नादाने गोविंद उठला

गोविंद उठोनी फुलांशी गेला

फुलांचा विक्टल पाख्यांनी केला.

कशी करू देवा आता लिंगाची पूजा..

सकाळच्या पारी शंक वाजवीला..

शंकाच्या नादाने गोविंद उठला..

गोविंदा उठोनी पिंजरशी गेला...

पिंजरीचा विक्टल भटांनी केला...

कशी करू देवा आता लिंगाची पूजा

कशी करू देवा आता लिंगाची पूजा...

१०.झेम झेम झेमाडो..

माझ्या पोरसान आमाडो

शेजारनी बाय हयसर ये

तुझी मातशी सारन दि

माझी सारन झरतली

सासू माका बोलतली

झेम झेम झेमाडो

माझ्या पोरसान आमाडो

शेजारनी बाय हयसर ये

तुझो मातसो राजू दे

माजो राजू झरतलो

माव माका बोलतलो..

**११.**हातीक मेथी पायाक मेथी

नाच गो भारती..

फाल्या येतलो गणपती , दाखय आरती..

**१२.**उठली सीता बसली राथान, रथ चालेता घडाघड

रथ चालेता घडाघडी

सीतेचा भाऊ विचार करी सीते सुने तु कधी येशील सीते सुने कधी येशील

राम धाडीता वनवाशी माझी येण्याची नाही ख़ुशी

माझी येण्याची नाही ख़ुशी..

उठली सीता बसली रथान, रथ चालेता घडाघडी...

रथ चालेता घडाघडी..

सीतेची सासू विचार करी सीतेसूने तु कधी येशील

सीते सुने तु कधी येशील

राम धाडीता वनवाशी माझी येण्याची नाही ख़ुशी..

माझी येण्याची नाही ख़ुशी..

**१३.**कितली म्हारगाय गे सायबीणी,

कितली म्हारगाय गे सायबीणी

संवसार कसो करचो आम्ही,

संवसार कसो करचो आम्ही..

बाजारान गेल्यार दुडू पावाना

बाजारान गेल्यार दुडू पावाना

शंभराचे नोटीक मोल ना, शंभराचे नोटीक मोल ना..

कितली म्हारगाय गे सायबीणी

संवसार कसो करचो आम्ही...

**१४.**शेत माझे डोंगरी ग तिथे माझे माहेर..

बाबा माझा चिंता करी धु माझी एकटी

नाही बाबा एकटी मी, भाऊ आहे संगती..

शेत माझे डोंगरी ग तिथे माझे माहेर

आई माझी चिंता करी धु माझी एकटी

नाही आई एकटी मी माय आहे संगती..

शेत माझे डोंगरी ग तिथे माझे माहेर

भाऊ माझा चिंता करी बहीण माझी एकटी

नाही भाऊ एकटी मी दिर आहे संगती...

**१५.** चंदन कापीला, चंदन कापीला रानात ग, रानात ग

वासनी सुटला, वासनी सुटला, वनात ग वनात ग

जसे विमान चालले विमान चालले, आकाशात ग आकाशात ग

चंदन कापीलाचंदन, कापीला रानात ग रानात ग

वासनी सुटला, वासनी सुटला वनात ग वनात ग

जसे आगगाडी चालली, आगगाडी चालली रुळात ग रुळात ग

चंदन कापीला, चंदन कापीला रानात ग रानात ग

वासनी सुटला, वासनी सुटला ग वनात ग वनात ग

जशी होडी चालली, होडी चालली पाण्यात ग पाण्यात ग

**१६.** सोप्यार बसतल्या ओ माझ्या मावा

बाबा म्हाका वरुंक येयला मी जाते माहेरा

गुणाचे गुण सुने मला काही सांगते, सांग तुझ्या मायीपाशी

सांग तुझ्या मायीपाशी..

कामधंधो करतल्या ओ माझ्या मायी

आई म्हाका वरुंक येयला, मी जाते माहेरा

गुणाचे गुण सुने मला काही सांगते, सांग तुझ्या दिरापाशी

सांग तुझ्या दिरापाशी

ऑफिसान काम करतल्या ओ माझ्या दीर

भाऊ म्हाका वरुंक येयला, मी जाते माहेरा

गुणाचे गुण वहिनी मला काही सांगते, सांग तुझ्या जावेपाशी

सांग तुझ्या जावेपाशी

शिवण काम करतले ओ माझे जावे

वहिनी म्हाका वरुंक येयला, मी जाते माहेरा

गुणाचे गुण जावे मला काही सांगते, सांग तुझ्या नणंदेपाशी

सांग तुझ्या नणंदेपाशी

कॉलेजात वयतले ओ माझे नणंदे,

बहीण म्हाका वरुंक येयला, मी जाते माहेरा

गुणाचे गुण वहिनी मला काही सांगते, सांग तुझ्या पतीपाशी

सांग तुझ्या पतीपाशी..

**अंगाई गीते**

१. कुरु कुरु काना म्हशी गेल्यो रानान

खाऊ हाड रे मामा दाटीसून

कुरु कुरु काना म्हशी गेल्यो रानान

खाऊ हाड रे पापा दाटीसून

कुरु कुरु काना म्हशी गेल्यो रानान

खाऊ हाड गे मम्मा दाटीसून

२. आराड गे बेपके सान जावनी

बाबूच्या मम्माक घरा येवनी

आराड गे बेपके सान जावनी

बाबूच्या पापाक घरा येवनी

३. निंबोणीच्या झाडा मागे चंद्र झोपला ग बायी

आज माझ्या पाडशाला झोप का ग येते नाही

निंबोणीच्या झाडा मागे चंद्र झोपला ग बायी...

४. इति इति नाच रे मोरा

बाळ घाली चारा

पाणी पी खाऊ खा

आणि भर्र झा...

**'म्हारवत '** लग्नासाठी बांबू पासून बनवलेले साहित्य



## कन्यादान



## सात फेरे



# फुगडी



## संदर्भ सूची


- मांडे प्रभाकर - लोकसाहित्याचे स्वरूप, प्रकाशन : गोदावरी प्रकाशन ‘ मंगलप्रभा’
- सौ. सायनेकर विशाखा अरविंद – स्त्रिवेद लोकसंचित पाथेय, प्रकाशन : श्री. मोहन कुलकर्णी -होंडा, सत्तरी -गोवा
- प्रा. श्री. मडगांवकर विनय – संतसाहित्य सींहावलोकन
- श्री. बर्वे नारायण विष्णू – सत्तरीचे लोकसाहित्य, प्रकाशन : श्री. गणपती ल. दांडेकर दुर्गाप्रसाद, दुर्गानगर, बोरी, फोंडा, गोवा.
- कोमरपंत सोमनाथ – गोमंतकीय लोकसाहित्य,
- खेडेकर विनायक विष्णू – गोमंतकीय लग्नाख्यान, प्रकाशन : पद्मगंधा प्रकाशन, १९६६, तारा – भुवन, माडीवले कॉलनी, सदाशिव पेठे, पुणे.
- डॉ. कुबल रमेश – लोकसाहित्याचे अंतरंग, प्रकाशन : मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि सुमती लांडे शब्दालय प्रकाशन.
- सुरेश आत्माराम अडवईकर, माहिती दिली
- लक्ष्मी सीताराम अडवईकर, सर्व गीताची माहिती दिली
- सुचिता सुरेश अडवईकर लग्नाबद्दल माहिती दिली.
-